मनुष्याणाम् वृत्तिरर्थ:।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थ:।

भारतीय सौर आषाढ–आश्विन शके १९४४

जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर २०२२/खंड ४६, अंक २

# ‘अर्थसंवाद’च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **संशोधनपर लेखाची प्रत अथवा सीडी पोस्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **संशोधनपर लेखाची एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाईल व त्याचीच PDF केलेली फाईल अशा दोन फाईल्स्) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल ॲड्रेसवर पाठवावी.** लेखासोबत संपादकांना लेख पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. संशोधनपर लेख पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. संशोधनपर लेख खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून तज्ज्ञ परिक्षकांनी केलेल्या सर्व सूचनांची पूर्तता केल्यानंतरच त्याची प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया संशोधनपर लेख टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, २०१०, (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

# अर्थसंवाद

(तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२२/ खंड ४६ / अंक २

**प्रमुख संपादक**
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय, वारणानगर)

**सल्लागार मंडळ**
(२०२२-२५)
जे. एफ. पाटील
संतोष दास्ताने
मुक्ता जहागिरदार
के. के. पाटील

**संपादकीय पत्रव्यवहार**
राहुल शं. म्होपरे
'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२,
प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी,
दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे,
उजळाईवाडी, ता. करवीर,
जि. कोल्हापूर - ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

## अ नु क्र म णि का

१. **श्रीनिवास खांदेवाले**
२१व्या शतकातील भांडवलशाही आणि मानव विकास ............. ८३

२. **वसंतराव जुगळे**
अर्थशास्त्रीय सिद्धांतांचा आधुनिक चेहरा .......................... ८९

३. **अविनाश कुलकर्णी**
राष्ट्रीयीकरण ते खाजगीकरण भारतातील बँकींग व्यवस्थेचे संक्रमण ................................................ ९७

४. **धनश्री महाजन**
युरोपातील प्रादेशिक एकत्रीकरणाची फलनिष्पत्ती .................. १०७

५. **राजकुमार आण्णासो वाईंगडे**
बहुआयामी दारिद्र्य - दारिद्र्य मापनाचा नवा दृष्टिकोन .......... ११३

६. **सी. आर. जाधव, राहुल शं. म्होपरे**
आर्थिक उदारीकरणा नंतर भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापार तुटीची समस्या: एक चिकित्सक अभ्यास ............................... ११९

७. **शि. ना. माने** - अर्थ शब्दांची वाट पाहे...
होमो ड्युस (Homo Deus) ........................................... १२८

८. **जे. एफ. पाटील** - अर्थ शब्दांची वाट पाहे...
मूनलाईट - चोर रोजगार, हायडोपोनिक्स - जलशेती, एरोपोनिक्स - वातशेती ......................................... १३०

९. **सुभाष पाटील** : पुस्तक परिचय
मुस्लीम विमेन इन इंडिया : एज्युकेशन अँड एक्सपोजर टू मीडिया........................................... १३२

१०. **माधव शिंदे** : पुस्तक परिचय
पूर्वसुरींचे अर्थचिंतन : आर्थिक विचारांचा समृद्ध मागोवा ........ १३६

११. **संजय दादासाहेब ठिगळे** : पुस्तक परिचय
कोरोनाच्या महामारीचा चित्तथरारक वेध घेणारे पुस्तक : कोरोनायन ..................................................... १४२

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### कार्यकारी मंडळ २०२१-२२

- **अध्यक्ष**
  **राजेंद्र बी. भांडवलकर (यवतमाळ)**
- **कार्याध्यक्ष**
  **अविनाश रा. निकम (शहादा)**
- **कार्यवाह खजिनदार**
  **मारोती वि. तेगमपुरे (अंबड)**
- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**
  **राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर)**
- **विश्वस्त**
  **रामकृष्ण टाले (नागपूर)**
  **अजय दरेकर (बारामती)**
  **विकास सुकाळे (नांदेड)**
- **सदस्य**
  **बळवंत कोरे (कराड)**
  **गणेश मांगडे (दापोली)**
  **माधव शिंदे (अहमदनगर)**
  **सुरेश ढाके (भुसावळ)**
  **अरुण पिसे (धुळे)**
  **राजाराम पाटील (सोलापूर)**
  **दयाळू राठोड (अकोला)**
  **मनीषकुमार कायरकर (बल्लारपूर)**
  **संजय धनवटे (कारंजा)**
  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **दिलीप अर्जुने (जालना)**
- **स्वीकृत सदस्य**
  **वनिता चौरे (चांदूरबाजार)**
  **विलास खंदारे (औरंगाबाद)**
- **स्थानिक कार्यवाह**
  **दिलीप अर्जुने (जालना)**



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, 'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना. पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७


**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य | : रु. ३०००/- (एकरकमी) |
| इमारत निधी | : रु. २०००/- |
| सदस्य सूची | : रु. १००/- |
| एकूण | : रु. ५१००/- |

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

| | |
|---|---|
| शैक्षणिक संस्था<br>व्यावसायिक संस्था<br>ग्रंथालये | रु.२०००/-(त्रैवार्षिक)<br>रु.३०००/-(पंचवार्षिक) |

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.


**'अर्थसंवाद'साठी अनुदानाबद्दल आभार:**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


टीप : म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.


हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# २१व्या शतकातील भांडवलशाही आणि मानव विकास

**श्रीनिवास खांदेवाले** †

मानवी समाजाच्या विकासाचा एक निकष म्हणजे मानव आपले सामूहिक जीवन अधिकाधिक संघटित करीत आपल्या भौतिक जीवनाला विकसित करीत जातो. आतापर्यंत झालेली भौतिक प्रगती हा त्याचा पुरावा आहे. त्या न्यायाने आर्थिक व तांत्रिक व्यवहार अधिकाधिक संघटित होऊन त्यात सहभाग घेणाऱ्यांना न्याय्य जीवनमान मिळेल असे वाटणे नैसर्गिक आहे. प्रत्यक्षात काय घडेल ते उत्पादन प्रणालीचे स्वरूप आणि संपत्ती वाटप प्रणालीच्या संघटनाच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. म्हणून प्रत्येक काळात या दोन्ही प्रणालींचे सूक्ष्म विश्लेषण आवश्यक आहे.

भारताच्या प्राचीन इतिहासाकडे पाहिल्यास असे आढळते की, दास प्रथा ही एक अन्याय्य सामाजिक अवस्था एका घटनेपासून (किंवा एका तारखेपासून) सुरू न होता एक विशाल व विस्तारित सामाजिक प्रक्रिया म्हणून आकार घेत राहिली. श्रीपाद अमृत डांगे त्यांच्या 'India: From Primitive Communism To Slavery' या ग्रंथात म्हणतात की, गुलामगिरीबद्दल बऱ्याच गोष्टी अस्पष्ट आहेत. काहींना वाटते की, टोळी समाजातून ग्रामसमाज निर्माण झाला. नातेसंबंधांतून गण निर्माण झाले. काही जातींना हीन जाती म्हणून त्यांच्यावर गुलामगिरी लादली गेली. बुद्धाच्या काळाच्या आसपास तिचा उदय झाला. बौद्ध आणि जैन धर्मांनी दासप्रथेचा विरोध केला.[१] सुरुवातीला दास हे नागरी श्रीमंतांना घरगुती सेवा देण्यासाठी वापरले जात. पण नंतर त्यांचा उपयोग शेतीकामासाठी केला जाऊ लागला. गौतम बुद्धाने श्रेष्ठींनी दासांना चांगली वागणूक द्यावी, अशा सूचना केल्याचे उल्लेख आहेत.

आधुनिक काळात (सुमारे १६१९ पासून) अमेरिकेत शेतमजूर कमी पडू लागल्याबरोबर आफ्रिकेतून, दलालांचा उपयोग करून, नागरिकांना पकडून गुलाम म्हणून त्यांची खरेदी-विक्री केली गेली, गुलामांचा धर्म, भाषा बदलवून टाकले गेले, खरेदी करणाऱ्या मालकांचीच आडनावे त्यांना दिली गेली. जेणेकरून पळून जाणाऱ्या गुलामांना पकडल्याबरोबर त्यांच्या आडनावावरून मालकाचे नाव आपोआप कळे. हे सर्व फक्त प्राचीन काळी किंवा सरंजामशाहीतच घडले असे नव्हे, तर औद्योगिक भांडवलशाहीच्या पहिल्या पर्वात घडले आहे.

१७व्या शतकापासून सुरू झालेल्या औद्योगिक भांडवलशाहीने कच्च्या मालाचे स्रोत व पक्क्या मालासाठी आश्वस्त मागणी निर्माण करण्यासाठी साम्राज्ये

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. : १०९, भ्रमणध्वनी : ७४४७५६१५४४ ई-मेल : shreenivaskhandewale12@gmail.com

निर्माण केली. भांडवलशाही विकास ज्या देशाला करावयाचा असेल, त्याने जमतील तेवढ्या वसाहती काबीज करणे ही पूर्वअटच बनली व युरोपमध्ये त्याबाबत चढाओढच लागली. त्यामुळे इंग्लंड, फ्रान्स, इटली, जर्मनी, स्पेन, पोर्तुगाल, हॉलंड इत्यादी देशांचा त्या प्रक्रियेत समावेश होता. याच प्रक्रियेचे ग्रथन लेनिनने त्याच्या 'Imperialism: The Highest Stage of Capitalism' या पुस्तकात केले. भारत या वसाहतीवर ताबा मिळविण्यासाठी हॉलंड, ब्रिटन, पोर्तुगाल आणि फ्रान्स या देशांची सैन्ये भारताच्या भूमीवर आपसात लढत होती, हे सर्वांना ठाऊक आहे. अमेरिकेने लॅटिन अमेरिकन व कॅरिबियन देश अंकित केले. पहिले व दुसरे विश्वयुद्ध युरोपच्याच भूमीवर लढले गेले. कारण साम्राज्यवादी शक्तींना स्वतःचे अजिंक्य पद स्थापन करून एकमेकांच्या वसाहती बळकावयाच्या होत्या. राज्यशास्त्राच्या भाषेत जगातील वसाहतींची (म्हणजे जगाची) पुनर्रचना एकमेकांवर लादण्याचा तो अट्टाहास होता.

तत्कालीन साम्राज्यवादाने वसाहतींकडून साधने व संपत्ती राज्यकर्त्या देशांकडे वळविली. त्यामुळे पहिल्या टप्प्यातील वाटणी दारिद्र्य हे वसाहतींमध्ये आणि सुबत्ता साम्राज्यवादी देशांकडे अशी झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर साम्राज्ये नष्ट झाली. त्या काळात वसाहती देशांमध्ये जे दैन्य व दारिद्र्य 'निर्माण' झाले ते दूर करण्यासाठी सुमारे ७५ वर्षे प्रयत्न सुरूच आहेत. पण साम्राज्यवादी देशांमध्ये गेलेली संपत्ती दुसऱ्या टप्प्यात त्यांच्याच नागरिकांमध्ये समानतेने वाटली गेली का, याचे उत्तर 'नाही' असेच आहे. डेव्हिड कॉर्टन, ब्रिटिश अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांच्या पुस्तकाचा हवाला देऊन म्हणतात की, ''१८५० ते १९१४ या काळात ब्रिटनमधील कठीण आर्थिक परिस्थितीमुळे ३२ दशलक्ष लोकसंख्येपैकी ९ लक्ष लोकांनी (२८.१२%) देशातून, मुख्यतः अमेरिकेकडे, स्थलांतर केले'',[२] साम्राज्याचा लाभ कोणाला झाला याबद्दल कॉर्टन म्हणतात की, "...Commonly held idea that colonialism benefitted the people of the colonizing countries is largely a myth--- its benefits went to the monied classes, not to the average citizen... imperialism can best be viewed as a mechanism for transferring income from the middle to the upper classes... Economic globalization is largely a modern phenomenon and it carries much the same sequence."[3] (म्हणजे, वसाहतवादामुळे वसाहती करणाऱ्या देशांतील लोकांचा फायदा झाला असा सामान्य समज आहे, तो मोठा भ्रम आहे... त्याचे फायदे श्रीमंतांना झाले, सामान्य नागरिकांना नाही. साम्राज्यवादाकडे फार तर मध्यम वर्गांकडून उच्च उत्पन्नाच्या वर्गांकडे उत्पन्न हस्तांतरित करण्याची यंत्रणा म्हणून पाहाता येईल. आर्थिक जागतिकीकरण हे त्याचेच आधुनिक रूप आहे आणि ते त्याच क्रमाने चालते).

भारतात साम्राज्यवादाबद्दलचे जे समज आहेत ते व त्यातील, जगभराच्या अभ्यासातून दृष्टीस पडलेले नवे निष्कर्ष यांची नोंद घेणे आवश्यक आहे. (१) भारतात अजूनही बहुसंख्य लोकांना बाजार ही केवळ वस्तू खरेदी-विक्रीची व्यवस्था नसून (अदृश्य अशी) राजकीय व्यवस्था आहे, याची पूर्ण जाणीव नाही. (२) तीच अदृश्य शक्ती देशातील आर्थिक कायदे प्रभावित/नियंत्रित करते, हेही ज्ञात नाही. (३) औद्योगिक भांडवलशाही देशांना सततच्या विकासाकरिता (संसाधने व उत्पादित वस्तुला हमखास मागणीसाठी) वसाहतींची गरज भासते व त्यातूनच नफा मिळतो, म्हणजे साम्राज्यवाद हे भांडवलशाहीचे अभिन्न अंग असते, हे समजून घेतले जात नाही.[४] (४) साम्राज्यवादी अधिकार असूनही राज्यकर्त्या देशांतील उत्पन्न विषमता कमी होत नाहीत. कदाचित त्या अधिक तीव्र होतात व मानव विकासाकडे दुर्लक्ष होते. (५) त्यामुळे

भांडवलशाही व्यवस्थेत एकूण आर्थिक विकास झाला, तरी मानव विकास (आवास, आरोग्य, शिक्षण, कौशल्य प्राप्ती, बेरोजगारीतून मुक्तता, फुरसत व सांस्कृतिक विकास इत्यादी) घडून येत नाही, याचे भान आढळत नाही.

**२१व्या शतकातील भांडवलशाही**

इ.स.२००० उजाडताना जग इ.स.च्या तिसऱ्या सहस्रकात व २१व्या शतकात पदार्पण करणार होते. भविष्यकाळच्या सर्व आशा-आकांक्षा पल्लवित झाल्या होत्या. संयुक्त राष्ट्रसंघाने पुढील सहस्रकाची उद्दिष्ट्ये (Millennium Goals) म्हणून शाश्वत विकासाचा कार्यक्रम जगापुढे मांडला. ज्यांना समाजवाद अभिप्रेत होता अशा अर्थशास्त्रज्ञांनी २१व्या शतकातील समाजवाद अशी मांडणी केली. मोठ्या प्रमाणावर अर्थशास्त्रज्ञांनी २१व्या शतकातील भांडवलशाही या अंगाने मांडणी केली. आतापर्यंत आपण २१व्या शतकातील पहिली २२ वर्षे अनुभवली आहेत. आताच्या क्षणी उरलेल्या २१व्या शतकात भांडवलशाहीचे व त्यातील मानव विकासाचे स्वरूप कसे असेल, हे चितारणे प्रबोधनकारी होईल.

२१वे शतक उजाडताना जागतिक व्यापार करार अंमलात आला. त्याच्या उद्दिष्टांमध्ये व्यापाराला विकासाचे इंजिन म्हटले गेले. त्यानुसार कोणतेही उद्योजक कोणताही माल (सगळेच देश सदस्य झाल्यामुळे) कुठेही विकू शकत असल्यामुळे माल व व्यक्तींचे परिवहन वाढले. त्याबरोबर ऊर्जास्रोत म्हणून तेलाचा उपभोग वाढला. कारसाठी मागणी वाढून पेट्रोल-डिझेलचा खप वाढला. दोन्हीमुळे प्रदूषण वाढले. काही प्रमाणात उत्पादन वाढले, त्याप्रमाणात प्रदुषणाची भर पडू लागली. आज प्रदूषण पातळीत इतकी वाढ झाली आहे की, त्यामुळे पर्जन्यमान बिघडून शेती उद्ध्वस्त होण्याची वेळ झाली आहे. सध्याची जीवनशैली, शहरे, ऊर्जाव्यवस्था इत्यादी सर्व प्रदूषणकारी आहेत आणि त्या व्यवस्था एकदम टाकून देणे किंवा बदलविणे शक्य नाही. त्यामुळे बहुसंख्य जनतेचा विकास होण्यासाठी जी नागरी संरचना आवश्यक असते ती नाही. उलट प्रदूषण, हवामान बदल, तंत्रज्ञानामुळे निर्माण होणारी बेरोजगारी, प्रतिकूल कायदेप्रणाली, समानता मान्य न करण्याची मानसिकता इत्यादींमुळे, मानव विकास हा जो प्रधानतम निकष आहे, तोच साध्य होताना दिसत नाही. अर्थव्यवस्थेच्या पातळीवर स्थूल उत्पन्न वाढत असतानासुद्धा तळागाळापर्यंत मानव विकास पोचत नाही, असे विधान करणेसुद्धा अपर्याप्त आणि यांत्रिकी आहे. कारण शासन (विशेषतः भांडवलदारधार्जिण) गरजू जनतेला मानव विकासाच्या किती सुविधा देईल याला मुळातच मर्यादा असतात व सरकारच्या विशिष्ट दृष्टिकोनामुळे अधिकच मर्यादा पडतात. सध्या देशभरात प्रधानमंत्र्यांनी २०१७ मध्ये दिलेल्या आश्वासनाचा व्हिडिओ वेगाने प्रसारित होत आहे. त्यावर्षी १५ ऑगस्टला त्यांनी देशाला उद्देशून असे आश्वासन दिले होते की, पाच वर्षांत म्हणजे ऑगस्ट २०२२ पर्यंत देशातील प्रत्येक गरिबाला वीज, पाण्यासह सिमेंट-काँक्रिटचे घर मिळेल. २०२२ पर्यंत त्या आश्वासनाची नगण्यपूर्ती झाल्यामुळे निवडणुकीतील आश्वासने तर सोडाच; पण स्वातंत्र्यदिनी दिलेली आश्वासनेसुद्धा पाळली जात नाहीत, असे जनतेला वाटत आहे. मग त्या स्वातंत्र्याचा अर्थ काय? या मुद्द्यावर भांडवलशाही व समाजवादी नियोजनाची पद्धती यामधील फरक तत्कालीन सोव्हियत संघातील विकासाच्या आधारे स्पष्ट होऊ शकेल. माईक डेव्हिडो न्यूयॉर्क टाईम्सचे पत्रकार (प्रतिनिधी) म्हणून मॉस्कोमधील अमेरिकन वकिलातीला जोडलेले होते. त्यांनी न्यूयॉर्कमध्ये असताना तेथील घरांच्या प्रश्नावर लिहिले होते. मॉस्कोत त्यांच्या चार वर्षांच्या वास्तव्यात त्यांनी सुमारे १४ गणराज्यांमध्ये फिरून त्या प्रश्नाचे अमेरिकन भांडवलशाही व सोव्हियत समाजवादी नियोजनाचे तुलनात्मक आकलन केले व

१९७४ मध्ये 'Cities Without Crises' ही पुस्तिका प्रकाशित केली. त्यांचे म्हणणे असे की, घरे व नगररचना याबाबत तत्कालीन मॉस्कोचे उल्लेखनीय यश आणि तत्कालीन न्यूयॉर्कमधील अल्पयश ह्यात फरक हा सामाजिक प्रणालीचा आहे (त्यांनी रात्री रस्त्यांवरील सुरक्षा, श्वासोश्वासासाठी हवेची गुणवत्ता आणि शाळांमधील शिक्षणव्यवस्था यांचाही विचार केला). घरांविषयी ते म्हणतात :

"When I left New York… candidate Lindsay for Mayor in 1965, promised to build 1,60,000 low and middle income apartments in four years… the city started only 34,167 apartments and just 8,920 of those were for low income families. Moscow's plan, on the other hand, called for 1,20,000 apartments a year and 1,20,000 were constructed… The difference goes to the root of the two contrasting social systems[5]… Soviet cities face problems. Ours face crises… Many Americans are beginning to learn it is a diseased social system and not geography that is at the bottom of urban crisis[6]… My experience in Soviet city living has convinced me that while the crisis of our cities can be to some extent lessened… the vast and complex problems of urban existence cannot be adequately met under capitalism. Big cities like big industry, or large scale agriculture can no longer function in the interest of mass of the people in an antiquated, outmoded social system based on private gain and profit rather than the common welfare."[7]

(म्हणजे : ''मी जेव्हा न्यूर्याक सोडले तेव्हा… १९६५ मध्ये महापौर पदाचा उमेदवार लिंडसेने मतदारांना अल्प व मध्यम उत्पन्नाच्या लोकांसाठी १,६०,००० घरे चार वर्षांत बांधण्याचे आश्वासन दिले. त्यापैकी फक्त ३४,१७६ घरांचे काम सुरू झाले, त्यापैकी केवळ ८,९२० घरे अल्प उत्पन्नाच्या कुटुंबांसाठी होती. उलट मॉस्कोच्या योजनेमध्ये दरवर्षी १,२०,००० घरे बांधणे संकल्पित होते, ती बांधली गेली. या अंमलबजावणीतील फरकाचे मूळ एकमेकींपासून भिन्न असलेल्या सामाजिक प्रणालींमध्ये आहे. सोव्हियत शहरांपुढे प्रश्न असतात, तर आपल्या (अमेरिकन) शहरांपुढे संकटे असतात. अनेक अमेरिकनांना आता जाणवू लागले आहे की, नागरी संकटांच्या मुळाशी भौगोलिक परिस्थिती नसून, आजारी असलेली सामाजिक प्रणाली आहे. माझ्या सोव्हियत शहरातील वास्तव्यात मला हे पटले आहे की, आपल्या शहरांपुढील संकट (काही उपायांनी) काही प्रमाणात कमी करता येईल; पण शहरांमधील लोकांच्या शहरी जगण्याचे विशाल आणि गुंतागुंतीचे प्रश्न भांडवलशाहीने पुरेसे सुटणारे नाहीत. खासगी नफ्याच्या तत्त्वावर काम करणाऱ्या जुनाट व मोडकळीस आलेल्या सामाजिक व्यवस्थेत मोठे उद्योग, मोठी शेते; तसेच मोठी शहरे ही सामान्य लोकांच्या हितासाठी कार्य करू शकत नाहीत.'')

**श्रमिकांचे प्रश्न -२०२२**

मोठे उद्योजक आणि भांडवल बाजार हे नफा वाढावा म्हणून सतत उत्पादन आणि किंमती वाढविण्याच्या प्रयत्नात असतात. अनेक वेळा अशा अपेक्षा आणि प्रयत्न, मागणी वाढत नसल्यामुळे, बुडबुड्यांसारखे अल्पजीवी ठरतात. मग हे जास्त झालेले उत्पादन खपेपर्यंत छोटी मंदी येते. पण तेजीत अपुऱ्या क्रयशक्तीमुळे आणि मंदीत अपुऱ्या रोजगारामुळे श्रमिक वर्ग सतत खालच्याच स्तरावर राहातो. गेल्या दीडशे वर्षांत (सध्याच्या डिजिटलसहित) तांत्रिक प्रगती व उत्पादनाचे वाढते स्वयंचलन यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाच्या प्रमाणात श्रम या घटकासाठी मागणी वाढत नाही आहे. त्याला ''रोजगारविहीन वृद्धी'' (जॉबलेस ग्रोथ) असे

म्हटले जात आहे. त्यामुळे वार्षिक वेतनवाढ, बढती, कायम नोकरी, निवृत्ती वेतन व इतर लाभ यांपासून तो वंचित राहून सतत केवळ पोट भरण्याच्या चिंतेत राहातो. भारताच्या संदर्भात पाहिल्यास सगळ्याच सार्वजनिक क्षेत्राचे खासगीकरण करण्याचे धोरण सरकारने अवलंबिल्यामुळे श्रमिक वर्ग रोजगारासाठी पूर्णपणे परावलंबी झालेला आहे व श्रमिक संघटनाही हतबल होत आहेत. अशा भयावह परिस्थितीत मानव विकास अनिश्चित, अस्थिर होत आहे हे आपण प्रत्यक्ष पाहात आहोत. हे भांडवलशाही प्रणालीचेच दोष असल्यामुळे थोड्याफार फरकाने जगातील सर्वच देशांमध्ये ही परिस्थिती आहे. अशा स्थितीत विशेषतः श्रमविषयक धोरण काय असावे, असा प्रश्न अभ्यासकांपुढे आहे.

नीती आयोगाच्या आधी जो योजना आयोग होता त्याचे भूतपूर्व सदस्य अरुण मैरा यांनी नुकताच 'Labour and Its Discontents' असा लेख प्रकाशित केला आहे.[८] त्यांचे प्रतिपादन येथे संक्षेपाने मांडून मग ते एक प्रातिनिधिक मत म्हणून परीक्षण करू.

मैरा म्हणतात: ''(सध्या) भारताचा सगळ्यात गंभीर आर्थिक, सामाजिक प्रश्न येथील बहुसंख्य लोकांना चांगले जीवनमान मिळत नाही, हा आहे. त्यात निम्न प्रतीचा रोजगार, अपुरे व अनिश्चित उत्पन्न, काम करण्याच्या जागेतील निकृष्ट स्थिती इत्यादींचा समावेश आहे. केवळ उद्योग चालविणे सोपे केले म्हणजे रोजगाराची परिस्थिती सुधारेल असे नव्हे. कायदे बदलवून औद्योगिक विवाद कायदा ३०० पेक्षा अधिक मजूर असलेल्या प्रतिष्ठानांना लागू करण्याची दुरुस्ती केल्यामुळे त्यापेक्षा जी लहान प्रतिष्ठाने आहेत त्यात रोजगार केवळ तात्पुरता (कंत्राटी/इन्फॉर्मल) होत आहे. पूर्वीचे श्रमिक कायदे बऱ्याचअंशी श्रमस्नेही होते. २०१४ पासून ते बदलवून उद्योजकस्नेही केले गेले. त्यालाच श्रम-सुधार म्हटले गेले. 'दि व्ही.व्ही. गिरी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ लेबर स्टडीज' या संस्थेने 'इम्पॅक्ट ॲसेसमेंट स्टडी ऑफ दि लेबर रिफॉर्म्स अंडरटेकन बाय द स्टेट्स' असा अहवाल प्रकाशित केला. त्यात श्रम कायद्यातील बदलांसंबंधी उद्योजकांच्या संघटनांची मते उद्‌धृत केली आहेत; पण बदललेल्या कायद्यांमुळे श्रमिकांना काय लाभ झाले व होत आहेत याबद्दलची श्रमिक संघटनांची मते मात्र समाविष्ट केलेली नाहीत. १९८० ते १९९० या दशकात राष्ट्रीय स्थूल उत्पन्नातील (जीडीपी) दर एक टक्का वाढीबरोबर सुमारे दोन लाख रोजगार निर्माण होत होता; १९९०-२००० या दशकात ते प्रमाण एक लाखावर आले. २०००-२०१० मध्ये ते प्रमाण केवळ अर्ध्या लाखावर आले आहे म्हणून आर्थिक विकासाच्या सिद्धांतनात मूलभूत बदल होणे आवश्यक आहे. नुसते स्थूल राष्ट्रीय उत्पन्न वाढल्याने तळाशी असलेल्या लोकांच्या उत्पन्नात आपोआप वाढ होत नाही. रोजगार आणि श्रम धोरणे संयुक्तपणे भारतातील सर्वच नागरिकांना चांगले जीवनमान देतील, अशी सूत्रे (पॅराडाईम) तयार केली पाहिजेत.'' मैरांच्या प्रतिपादनाचा हा आढावा पूर्ण झाला.

**समारोप**

वरील संक्षिप्त आढावा दर्शवितो की, भांडवलशाही अर्थव्यवस्था (व त्यावर आधारित समाजव्यवस्था) बहुसंख्य असलेल्या श्रमिकांना (शेतकरी, शेतमजूर, शहरी मजूर, छोटे उद्योजक, घरकाम महिला, आदिवासी इत्यादी) सन्मान्य रोजगार व जीवनमान देऊ शकलेली नाही. तशी-श्रमस्नेही-मानसिकताही निर्माण झालेली नाही. उलट अधिक संघटित, अधिक सुशिक्षित समाज अधिक श्रम-विरोधी धोरणे शोधून काढीत आहे. अनेक अर्थशास्त्रज्ञांनी काही जुजबी बदल करून भांडवलशाही टिकू शकेल, असे प्रतिपादन केले आहे. त्यापैकी एक पॉल कोलियर हे ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ आहेत.[९] त्यांच्या एकूण लिखाणाकरिता त्यांना 'सर' हा किताबही मिळाला आहे. ते मार्क्सवाद व अतिउजवेपण टाळून

सर्वसमावेशकतेची आचारसंहिता विकसित करून भांडवलशाही टिकवावी व टिकू शकेल या मताचे आहेत. त्यांच्या (दि फ्युचर ऑफ कॅपिटॅलिझम्) पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणात ते त्यांच्यापुढील चिंता अशी मांडतात: "Capitalism is generating divided societies in which many people lead anxious lives... what has happened recently is not intrinsic to capitalism; ... it is a damaging malfunction that must input right... during the era following the Great Depression, pragmatic policies put capitalism on track; they can do it again. Yet our political system is not generating such policies. It has become as dysfunctional as our economies. Why is it no longer capable of thinking pragmatically about solutions to problems?"[१०] (म्हणजे ''भांडवलशाही विघटित समाज निर्माण करीत आहे ज्यामध्ये बरेच लोक चिंतामय जीवन जगत आहेत. हे जे आताचे झालेले बदल आहेत ते भांडवलशाहीचे अंगभूत नाहीत. ते अयोग्य, हानीकारक कार्यकलापांमुळे आहेत, ते दुरुस्त केले पाहिजेत. महामंदीनंतरच्या काळात व्यावहारिक धोरणे अमलात आणून भांडवलशाही रुळावर आणली गेली; ते धोरण ठरविणारे पुन्हा भांडवलशाहीला रुळावर आणू शकतात. परंतु आपली राजकीय व्यवस्था अशी धोरणे निर्माण करीत नाही आहे. राजकीय व्यवस्थासुद्धा अर्थव्यवस्थांसारखीच अकार्यकारी झाली आहे. ती प्रश्नांची उत्तरे सुचविण्याकरिता व्यावहारिक विचार करण्यास सक्षम का राहिलेली नाही?'')

सारांश, भांडवलशाही केवळ उत्पादन वाढविण्यास सक्षम आहे; परंतु सर्व लोकांना चांगले जीवनमान देऊन मानव विकास घडवून आणण्यास अपर्याप्त आहे. त्यामुळे आपल्या सगळ्यांनाच पर्यायी व्यवस्था शोधण्यासाठी प्रयत्न करावे लागतील असे दिसते.

**संदर्भ, टिपणे :**


१. Dange S.A. : India From Primitive Communism To Slavery (A Marxist Study of Ancient History in Outline), Peoples Publishing House, New Delhi, Fourth Edition, 1961, pp. x-xiii.
2. Korten David C., When Corporations Rule The world, (Mapusa, India, The other India Bookstore, second Impression, 2000), p. 27.
३. तत्रैव पृ. २८.
४. १९९२-९३ च्या काळात जागतिक मुक्त व्यापाराच्या कराराचा मसुदा 'डंकेल प्रस्ताव' या नावाने विचाराधिन चर्चेत होता. प्रस्तुत लेखकाने त्यावेळी त्यावर एक पुस्तिका लिहिली होती. तिचे शीर्षक होते 'डंकेल प्रस्ताव: साम्राज्यवादाचे एक औजार' ती १९९३ मध्ये लोकवाङ्मय प्रकाशन गृह, मुंबई यांनी प्रकाशित केली होती.
५. Davidow Mike, Cities Without Crises (The Soviet Union Through the Eyes of an Amerian), Moscow, Novosty Press Agency Publishing House, 1974, p.11.
६. Ibid., p. 13.
७. Ibid., p. 14.
८. Maira Arun, Labour and its discontents, Mumbai, Indian Express, 13-08-2022, p. 15.
९. Collier Paul, The Future of Capitalism (Facing the New Anxieties), Great Britain, Allen Lane, 2018.
१०. Ibid, p. 201.


◆

# अर्थशास्त्रीय सिद्धांतांचा आधुनिक चेहरा

**वसंतराव जुगळे** [†]

**प्रस्तावना**

आर्थिक विचारांचा उगम मानवी जीवन जगण्याच्या प्रयत्नांमध्ये होतो. पृथ्वीवरील इतर प्राण्यांच्या तुलनेत मानवी प्रतिभा प्रशंसनीय आहे. प्रतिभेचा, तर्काचा आणि बुद्धिमत्तेचा वापर माणसात होताना दिसतो. मनुष्य सकारात्मक आणि आदर्श दोन्ही विचार करू लागला. पुढील हालचालींमध्ये काय असावे याचा विचार मानवाने केला आहे. सुरुवातीच्या टप्प्यावर मनुष्य फक्त अन्न, निवारा आणि वस्त्राचा विचार करू लागला. त्यानंतर इतर सर्व गरजा निर्माण झाल्या.

निसर्ग हा मानवी विचारांचा अविभाज्य भाग होता. एका बेटावर एक माणूस ही विचारधारा घेऊन रॉबिन्सन क्रूसोच्या गरजा आणि एकत्रितपणे स्थायिक झालेल्या स्थानिक अधिवासातील मानवी समाजाच्या गरजा वेगवेगळ्या आहेत. अर्थशास्त्रातील बहुतेक साहित्य आपल्याला असे सांगते की, आर्थिक विचार व्यापारीवादातून पुढे आले आहेत. पण मुळात आर्थिक विचार निसर्गवादातून उदयास आले आहेत. म्हणून आपण हे मान्य केले पाहिजे की, आर्थिक विचारांचा उगम निसर्गवादातून होतो. पुढे औद्योगिक क्रांतीतून व्यापारवाद अस्तित्वात आला. शास्त्रीय, नव-शास्त्रीय, नवीन शास्त्रीय आणि केनेशियन, नव-केनेशियन, नवीन केनेशियन विचारधारा आधुनिकतेकडे विस्तारित पुढे नेण्यात आलेली आहेत. विश्लेषणाच्या प्रत्येक टप्प्यात अर्थशास्त्रीय सिद्धांतांमध्ये आधुनिकता आलेली आहे. या विश्लेषणामध्ये त्यासंबंधीचेच मूल्यमापन आम्ही करणार आहोत.

आर्थिक समस्या अर्थशास्त्राच्या सिद्धांतांना जन्म देतात. समस्येचे निराकरण ही यापैकी एक धोरणात्मक दृष्टी आहे. प्रथम समस्या कशा उद्‌भवतात आणि त्या कशा सोडवल्या जातात ते पाहू या. कारण आर्थिक विचारधारा ही समस्यांमध्ये उद्‌भवते जी विद्यमान आणि अनुभवी तथ्यांवर आधारित आहे. म्हणूनच सिद्धांत आणि तथ्य एकमेकांशी जोडलेले आहेत.

**आर्थिक समस्या**

आर्थिक समस्येची संकल्पना संसाधनांच्या तुटवड्याशी जोडलेली आहे. तंत्रज्ञान समस्येचे गांभीर्य कमी करण्यासाठी मदत करते. जेव्हा मानवाने त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांची प्रतिभा, साधन आणि श्रम वापरले, तेव्हा तंत्रज्ञान उदयास आले. जेव्हा कामाची पुनरावृत्ती होते, तेव्हा सर्व प्रकारच्या नव-कल्पनांमधील मानवी अनुभव नियमित केले गेले. ज्ञान

[†] अर्थशास्त्राचे निवृत्त वरिष्ठ-श्रेणी प्राध्यापक आणि संचालक, वाय.सी.एस.आर.डी., शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. आजीव सभासद क्र. : ५६८, भ्रमणध्वनी : ९४२२०४०६८४. ई-मेल : vbjugale@gmail.com

पुढच्या पिढीला शिकवले गेले. नव-कल्पना सातत्याने विकसित होत राहिल्या; कारण मानवी जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर समस्या निर्माण झाल्या. असा संघर्ष अजूनही सुरू आहे. त्याला अजिबात अंत नाही. वस्तुस्थिती एवढीच आहे की, मानवी वर्तनात विकृती असू नये. कारण विकास अशा विकृतीला जन्म देतो.

चांगल्या जुन्या कालावधीत सिद्धांत आणि तथ्य यांच्यात अंतर्निहित दुवा होता. तथ्ये बहुतेक निसर्ग, समाज आणि मानवी वर्तनाशी संबंधित होती. सिद्धांत म्हणजे अर्थव्यवस्थेचे कार्य कसे चालते किंवा कसे कार्य करावे याबद्दल आदर्श/तत्त्वे/कायद्यांचा संच आहे. पुरवठा स्वतःची मागणी निर्माण करतो, हा अर्थशास्त्रातील जुना सिद्धांत आहे. जेव्हा काही वस्तू किंवा वस्तूंचा पुरवठा होतो, तेव्हा मागणी प्रदर्शित केली जाते. अशा गोष्टी व्यक्तींनी अनुभवल्या आहेत आणि त्यांच्या प्रयत्नांनी त्याचे भांडवल केले आहे. अशा वस्तूंचा मानवी जगण्याच्या प्रक्रियेसाठी वापर करण्यास शिकवले जाते. भांडवल भांडवलाला जन्म देते. त्याचप्रमाणे समस्या ही अर्थशास्त्र आहे; तसेच अर्थशास्त्र ही एक समस्या आहे. आर्थिक विचारांचा मुख्य स्रोत ही समस्या आहे. सर्व मानवी समस्या आर्थिक तत्त्वज्ञानाभोवती केंद्रित आहेत.

**मागणी आणि पुरवठा**

एकंदरीत अर्थव्यवस्थेत, आपण नेहमी मार्केटची यंत्रणा अचंबित करते. जेव्हा प्रत्येक गोष्ट बाजाराद्वारे निर्धारित केली जाते, तेव्हा अर्थव्यवस्था कशी व्यवस्थापित केली जाते, हे उघड रहस्य आहे. पुरवठा नेहमीच स्वतःची मागणी निर्माण करतो. ते नेहमी बाजार अर्थव्यवस्थेत जुळतात. सरकारी नियंत्रण काहीवेळा त्याच्या हस्तक्षेपाने समतोल जुळत नाहीत. पुरवठा नेहमी आटोपशीर असतो; पण मागणी व्यवस्थापित करता येत नाही. हा मानवी वर्तनाचा एक भाग आहे, जो व्यक्ती, स्थान आणि काळानुसार बदलतो. म्हणूनच जगभरातील सरकारांकडून पुरवठा धोरणांना प्राधान्य दिले जाते. ही विचारधारा शेकडो वर्षांपासून अर्थशास्त्रात वर्चस्व गाजवत आहे. अर्थशास्त्रातील शास्त्रीय संकल्पना अजूनही एक वैज्ञानिक पुरवठा अर्थशास्त्र आहे. १९३६ मध्ये जेव्हा बाजाराच्या अर्थव्यवस्थेत अडचण आली, तेव्हा मागणीची बाजू प्रथम पद्धतशीरपणे पसंत केली गेली आणि स्पष्ट केली गेली. अर्थशास्त्रातील सापेक्ष आणि निरपेक्ष संकल्पनांचा आर्थिक साहित्यात प्रवेश झाला. पुरवठा आणि मागणी या सापेक्ष घटना आहेत. वस्तू किंवा सेवांच्या किंमती, हा खुल्या बाजारातील सापेक्ष क्रिया आणि प्रतिक्रियेचा परिणाम आहे.

किंमत ही एक परिपूर्ण घटना आहे का? ते पाहाणे आवश्यक आहे. खुल्या अर्थव्यवस्थेत किंमती कशा ठरवल्या जातात हे पुन्हा उघड गुपित आहे. यावर संशोधन अजून चालूच आहे. बाजार कोण साफ करतो? (Who clears the market?) याचा शोध घेतला जात आहे. मजुरी, व्याजदर, पैशांचा पुरवठा, अर्थसंकल्पीय उद्दिष्ट्ये ही काही वेळा नियंत्रित समग्रलक्षी आर्थिक चल किंवा उपकरणे आहेत. खुल्या अर्थव्यवस्थेत प्रत्येक गोष्ट बाजाराद्वारे नियंत्रित केली जाते. अशा परिस्थितीत बाजार व्यवस्था अदृश्य हात म्हणून कार्य करते. अशा मुद्द्यांवर अजूनही चर्चा सुरू आहे. प्रत्येक टप्प्यावर आपल्याला आर्थिक सिद्धांतांचा नवा चेहरा सापडतो, हा आर्थिक विचारांचा इतिहास आहे. बहुतेक देशांमध्ये मागणीच्या बाजूची धोरणे तयार केलेली नाहीत. भारतातही असेच आहे. परंतु अर्थव्यवस्थेत अशा धोरणांचा मागच्या दाराने प्रवेश होत आहे. काही वर्षांपूर्वी अर्थव्यवस्थेत अन्नसुरक्षा (Food security) आणली गेली, जेव्हा भारताला सुरक्षित अन्न व्यवस्थेची (Secured food system) आवश्यकता होती. कोविड-१९ नंतर, आम्ही नैसर्गिक शेतीकडे कूच करत आहोत; जे मागणीच्या बाजूचे धोरण आहे. न्यूट्रास्युटिकल फार्मिंग सिस्टम (पौष्टिक

शेतीप्रणाली) विकसित होत आहे, हा त्याचा प्रकार आहे.

कोणत्याही किंमती, सापेक्ष किंमती (Relative prices) आणि परिपूर्ण किमतींमध्ये वर्गीकृत केलेल्या आहेत. नव-शास्त्रीय अर्थशास्त्रज्ञ निरपेक्ष किंमतींवर (Absolute prices) विश्वास ठेवतात. शास्त्रीय अर्थशास्त्रज्ञ, सापेक्ष किंमतींवर विश्वास ठेवतात. याला शास्त्रीय द्विविधा (Classical Dichotomy) म्हणून ओळखले जाते. नंतर ही द्वंद्वात्मकता अर्थशास्त्रज्ञांनी काढून टाकली, कारण किंमती ठरवण्यासाठी दोन्ही सापेक्ष आणि निरपेक्ष तत्त्वांची आवश्यकता असते.

१९९०च्या दशकात जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये मागणी आणि पुरवठा बाजूचे आर्थिक तत्त्वज्ञान वेगळे केले गेले. जागतिक बँकेने सप्लाय साइड इकॉनॉमिक्सला पाठिंबा दिला, जिचा आधार शास्त्रीय शालेय दृष्टिकोन (Classical School Approach) होता. मागणीच्या बाजूच्या अर्थशास्त्राचे वर्चस्व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये होते. दोन्ही जागतिक संघटनांच्या नेतृत्वाखालील कर्ज-अटी (Conditionalites) त्यांच्या आर्थिक तत्त्वज्ञानात भिन्न होत्या; परंतु लादलेल्या कर्ज-अटी आर्थिक विचार आणि धोरणनिर्मिती व्यवसायाचे स्त्रोत बनल्या. हा मतभेद वॉशिंग्टन कॉन्सेन्ससने (Williamson) दूर केला. ही परिस्थिती उदारीकरणाच्या काळात होती. जागतिक व्यापार संघटनेने खुल्या आणि जागतिकीकृत अर्थव्यवस्थांवर सहमती दर्शविली. त्यामुळे प्रत्येक आर्थिक क्रियाकलाप सरकारी नियंत्रणातून मुक्त झाला. परंतु नंतर असे वाटले की, काही मॅक्रो-इकॉनॉमिक व्हेरिएबल राज्याच्या नियंत्रणाखाली असावेत. सँटियागो एकमताने काही मॅक्रो व्हेरिएबल्सवर सहमती दर्शवली की, ते सरकारच्या नियंत्रणाखाली राहिले पाहिजेत. परिणामी, आर्थिक विचारधारेत नव-उदारीकरणाचा दृष्टिकोन उदयास आला. तथापि, मागणी आणि पुरवठ्यातील संघर्ष सुरूच आहे. जगाच्या अर्थव्यवस्थांमध्ये जास्त पुरवठा किंवा जास्त मागणीमुळे उद्भवणाऱ्या अर्थव्यवस्थेतील असमतोल कसा दूर करायचा यावर अर्थशास्त्रात अजूनही चर्चा केली जाते. या तत्त्वज्ञानाने आर्थिक व्यवस्था बदलते किंवा तत्त्वज्ञानच आर्थिक व्यवस्था बदलते. प्रत्येक टप्प्यावर आर्थिक विचार बदलत आहे. परिणामी, अर्थशास्त्र गतिमान होत आहे. एक प्रकारच्या मिश्र तत्त्वज्ञानाची जगात चर्चा होत आहे. याला बाजार समाजवाद (Market Socialism) म्हणतात. ही एक प्रकारची मिश्र अर्थव्यवस्थाच आहे. भारताने स्वातंत्र्यानंतर लगेचच हे स्वीकारलेले आहे. त्यामुळेच भारतीय आर्थिक तत्त्वज्ञानाची जगभरात प्रशंसा झाली आहे. जगातील महाकाय अर्थव्यवस्थांमध्ये भारत सध्या पाचव्या क्रमांकावर आहे.

**सामान्यांची शोकांतिका**

वाढीच्या मर्यादांचा (Limits to Growth) नव-माल्थुशियन दृष्टिकोन १९७०चे उत्पादन आहे. आर्थिक वाढीच्या विरोधात क्लब ऑफ रोमचा उदय झाला. औद्योगिक वाढ पर्यावरणाला हानी पोहोचवते. हा दृष्टिकोन वाढीच्या विरोधात लोकप्रिय झाला आहे. परिणामी, वाढीची संकल्पना अधिक मानवीय अशी बदलली आहे. विकासाच्या प्रक्रियेत नैतिक कल्पनांचा प्रवेश झाला आहे. सामान्यांची शोकांतिका काढून टाकणे, हा विकास प्रक्रियेतील एक अविभाज्य भाग बनत आहे. सामान्यांची शोकांतिका अशा परिस्थितीला सूचित करते, ज्यामध्ये सार्वजनिक संसाधनात प्रवेश असलेल्या व्यक्ती (ज्याला सामान्य देखील म्हणतात) त्यांच्या स्वत:च्या हितासाठी कार्य करतात आणि असे केल्याने शेवटी संसाधन कमी होते. हा आर्थिक सिद्धांत ब्रिटिश लेखक विल्यम फोर्स्टर लॉयड यांनी १८३३ मध्ये प्रथम मांडला होता. काही विशिष्ट उदाहरणांमध्ये जंगलतोड हे समाविष्ट आहे. जंगलाच्या अतिशोषणामुळे

पृथ्वीच्या पर्यावरणावर खूप मोठे परिणाम झाले आहेत. प्राणी विलुप्त होणे, अतिमासेमारी आणि जास्त शिकार करणे ही एक सामान्य पूल संसाधने त्यांच्या स्वतःच्या स्वार्थासाठी काम करणाऱ्या व्यक्तींद्वारे कमी होत असल्याची उदाहरणे आहेत. परिणामी, आर्थिक विकासाची संकल्पना बदलली आहे. यातून नवीन मार्ग शोधण्यासाठी वर्तुळाकार अर्थव्यवस्था (Circular Economy), एकसंध अर्थव्यवस्था (Solidarity Economy or Social and Solidarity Economy (SSE)) यासारख्या अर्थव्यवस्थेचे नवे रूप आर्थिक चर्चेत येत आहेत. गोलाकार अर्थव्यवस्थेसाठी प्रतिमा परिणाम हे मॉडेलमध्ये बदल आहे, ज्यामध्ये संसाधने उत्खनन केली जातात, उत्पादने बनविली जातात आणि नंतर कचरा बनतात. वर्तुळाकार अर्थव्यवस्थेमुळे साहित्याचा वापर कमी होतो, साहित्य, उत्पादने आणि सेवांची रचना कमी संसाधने होण्यासाठी होते आणि नवीन साहित्य आणि उत्पादने तयार करण्यासाठी संसाधन म्हणून कचरा पुन्हा ताब्यात घेते. या आधारे आर्थिक विकासाची संपूर्ण विचारसरणी बदलत आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ, वास्तविक उत्पन्न, दरडोई उत्पन्न, यापुढे वाढीच्या दृष्टिकोनाचे संकेतक राहिलेले नाहीत. १९७० च्या दशकात बेरोजगारी, आर्थिक असमानता आणि गरिबी दूर करणे, हे विकास प्रक्रियेचे संकेत होते. आता क्षमता, सामर्थ्य आणि सामाजिक निवड हे विकासाचे सूचक आहेत. क्षमता हा मनुष्य आणि त्याच्या कार्याचा क्रम किंवा निवड्याचा गुणांक आहे. शैक्षणिक व्यवस्थेने क्षमता निर्माण करण्यावर भर दिला पाहिजे. यामुळे लोकशाही बळकट होईल. 'आम्ही बॉस नव्हे तर प्रतिभांचा मेंदू' विकसित करणे अपेक्षित आहे. ही, खरे तर, आधुनिक अर्थव्यवस्थेतील वाढीची प्रक्रिया आहे. खरं तर हेच विकासाचे स्रोत आहे.

## भविष्यातील सामाजिक तणाव

सामाजिक तणाव (Social tensions) ही आपल्या समाजाची अविभाज्य घटना बनली आहे. आर्थिक वंचितता, व्यावसायिक स्पर्धा आणि अस्मितेची भावना, दहशतवाद, जातीयवाद, राज्ययंत्रणेचे राजकारणीकरण, भाषिक समस्या, जातीय हिंसाचार आणि इतर अनेक कारणांमुळे तणाव निर्माण होऊ शकतो. यापुढे भविष्यात सामाजिक तणाव वाढण्याची अपेक्षा आहे. त्यातून उत्पन्नातील असमानता, गरिबी आणखी वाढेल. हवामान बदल, आर्थिक अस्थिरता, राजकीय गोंधळ, मानसिक दबाव यामुळे भविष्यात सामाजिक तणाव वाढतील. या पार्श्वभूमीवर अर्थशास्त्राचे सिद्धांत बदलत जातील. धोरणात्मक उपक्रमदेखील बदलत जातील.

साथीच्या रोगाच्या पहिल्या वर्षात अलोकप्रिय निषेधाला विराम दिल्यानंतर लोक रस्त्यावर परतत आहेत. यावर्षी, कॅनडा आणि न्यूझीलंडसारख्या अशांती तुलनेने दुर्मिळ असलेल्या काही प्रगत अर्थव्यवस्थांमध्ये मोठ्या आणि दीर्घकाळ चालणारी सरकारविरोधी निदर्शने झाली आहेत आणि अनेक उदयोन्मुख आणि विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये, सत्तापालट आणि घटनात्मक संकटांनी व्यापक निषेध केला आहे. IMFच्या नुकत्याच झालेल्या कार्याचे उद्दिष्ट अशा अशांततेचे आर्थिक चालक आणि खर्च समजून घेणे आहे. सामाजिक अशांतता सातत्याने मोजणे कठीण आहे. IMFच्या अहवालात सामाजिक अशांतता निर्देशांकाने १३० देशांमध्ये अशांततेशी संबंधित घटक मोजून अहवाल तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. या निर्देशांकात मोठ्या वाढीचा अनुभव घेणाऱ्या देशांचा अंश, जे सामान्यतः मोठ्या अशांततेच्या घटनांना प्रतिबिंबित करतात, फेब्रुवारीमध्ये सुमारे ३ टक्क्यांपर्यंत वाढले. येत्या काही महिन्यांत, दोन महत्त्वाच्या घटकांमुळे भविष्यातील अशांततेचा धोका वाढू शकतो. प्रथम, सरकार निर्बंध शिथिल करतात. कोविडबद्दलच्या सार्वजनिक चिंता कमी झाल्यामुळे, साथीच्या रोगाशी

संबंधित निषेध कमी होऊ शकतात आणि दुसरे, अन्न आणि इंधनाच्या वाढत्या किंमतींमुळे लोकांची निराशा वाढू शकते. नागरी विकृतीची आर्थिक कारणे गुंतागुंतीची असली आणि अशांततेचा अंदाज बांधणे अपवादात्मकपणे कठीण असले तरी, अन्न आणि इंधनाच्या किंमतीत वाढ भूतकाळात वारंवार निदर्शनास आली आहेत.

सामाजिक अशांततेतील कोणत्याही वाढीमुळे जागतिक अर्थव्यवस्थेच्या पुनर्प्राप्तीसाठी धोका निर्माण होऊ शकतो. कारण, त्याचा आर्थिक कामगिरीवर कायमस्वरूपी परिणाम होऊ शकतो. गेल्या वर्षी एका पेपरमध्ये, IMF कर्मचाऱ्यांनी दर्शविले आहे की, अशांततेचा नकारात्मक आर्थिक परिणाम होऊ शकतो. कारण ग्राहक अनिश्चिततेने घाबरतात आणि उत्पादन आणि सेवांमध्ये उत्पादन गमावले जाते. परिणामस्वरूप, सर्वात गंभीर अशांततेच्या घटनांनंतर १८ महिन्यांनंतर, सकल देशांतर्गत उत्पादन सामान्यत: १ टक्के बिंदूपेक्षा कमी आहे.

**एकसंध अर्थव्यवस्था**

एकसंध अर्थव्यवस्था (सहकारी आणि परस्पर सहाय्य अर्थव्यवस्थेसह) ही एक पर्यायी चौकट आहे; जी वेगवेगळ्या संदर्भांमध्ये विविध स्वरूपांना अनुमती देते, सतत बदलासाठी खुली असते. हे फ्रेमवर्क खालील तत्त्वांवर आधारित आहे:

१. एकता, परस्परवाद (परस्पर सहाय्य) आणि सहकार्य
२. सर्व परिमाणांमध्ये समानता
३. सामाजिक कल्याण
४. टिकाऊपणा
५. सामाजिक आणि आर्थिक लोकशाही
६. बहुवचनवाद

एकसंध अर्थव्यवस्थेतील उत्पादक आर्थिक प्रक्रिया विकसित करतात की, ज्या त्यांच्या वास्तवाशी, पर्यावरणाचे रक्षण आणि परस्पर सहकार्याशी घनिष्ठपणे संबंधित असतात.

सॉलिडॅरिटी इकॉनॉमी किंवा सोशल अँड सॉलिडॅरिटी इकॉनॉमी (SSE) आर्थिक क्रियाकलापांच्या विस्तृत श्रेणीचा संदर्भ देते, ज्याचे उद्दिष्ट पूर्णपणे आर्थिक नफ्याऐवजी सामाजिक नफ्याला प्राधान्य देणे आहे. अलीकडच्या जागतिक आर्थिक आणि राजकीय अस्थिरतेने आपल्या सध्याच्या विकास व्यवस्थेतील त्रुटी अधोरेखित केल्या आहेत आणि पर्यायी किंवा पूरक विकास प्रतिमानाची आवश्यकता पुष्टी केली आहे. सामाजिक आणि एकसंध अर्थव्यवस्था (SSE) आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय उद्दिष्ट्ये पुन्हा संतुलित करण्यासाठी एक व्यवहार्य उपाय आहे. सॉलिडॅरिटी इकॉनॉमी (SE) ही एक पोस्ट कॅपिटॅलिस्ट फ्रेमवर्क आहे, जी लॅटिन अमेरिका आणि युरोपमध्ये १९९०च्या दशकात उदयास आली. हे राज्य-प्रबळ हुकूमशाही स्वरूपाचे समाजवाद नाकारते, त्याऐवजी सहभागी लोकशाहीसाठी मुख्य वचनबद्धतेची पुष्टी करते. शिवाय, हे स्पष्टपणे स्त्रीवादी, वर्णद्वेषविरोधी आणि पर्यावरणीय आहे आणि आर्थिक परिवर्तनाचे समर्थन करते जे केवळ वर्गच नव्हे, तर सर्व प्रकारच्या दडपशाहीच्यापलीकडे जाते. यामुळे सामूहिक कृती आणि सहकाराचे तत्त्वज्ञान बदलले आहे. ही विचारधारा झपाट्याने पसरत आहे. परिणामी, सहकारी व्यवस्थेत बदल होणे अपेक्षित आहे. संस्थात्मक अर्थशास्त्र भविष्यात आणखी विकसित होऊ शकते.

**भांडवलशाहीची रूपे**

जगात फक्त एकच भांडवलशाही व्यवस्था नाही. भांडवलशाहीचे तीन प्रकार आहेत. नवउदारवाद, नवीन करार भांडवलशाही आणि सामाजिक लोकशाही. हे स्पेक्ट्रमच्या बाजूने स्थित आहेत, जेथे उजवे मुक्त बाजार, लहान सरकार, भांडवलशाहीचे स्पर्धात्मक स्वरूप दर्शविते आणि डावीकडे सक्रिय सरकारचे प्रतिनिधित्व करते जे स्त्रीवादी, वर्णद्वेषविरोधी आणि पर्यावरणीय तत्त्वांसह लोक आणि ग्रहाचे संरक्षण करण्यासाठी नियम आणि पुनर्वितरण प्रदान करते. १९९०च्या दशकात ज्ञान भांडवलशाही अस्तित्वात होती. सध्या व्यावसायिक

व्यासपीठ भांडवलशाही आढळते, जी व्यावसायिक प्लॅटफॉर्म कंपन्यांचा विस्तार करत आहे. ते संपूर्ण व्यवसायाचे मार्ग व्यापत आहेत.

निओ-लिबरलिझम (नवउदारवाद), सध्या यू.एस. आणि बऱ्याच जगामध्ये प्रबळ आर्थिक प्रतिमान आहे. नवउदारवाद ही विचारधारा म्हणून काटेकोरतेला (म्हणजे शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक खर्च कमी करणे), प्रो-कॉर्पोरेट नियमन आणि खाजगीकरण यांना प्रोत्साहन देण्यासाठी वापरले गेले आहे. नवउदारवादाच्या आधी, भांडवलशाहीवर न्यू डील (New Deal) कॅपिटलिझमचे वर्चस्व होते (कधीकधी कीनेसिअनिझम म्हणून संबोधले जाते). ज्यामध्ये सरकारने सामाजिक सुरक्षा जाळे तयार करण्याचा, बाजारातील अपयशांना दूर करण्याचा, अनैतिक व्यवसायांचे नियमन, मक्तेदारी मोडून काढणे आणि किमान नाममात्र मोठ्या आर्थिक समानतेला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला. नवीन डील भांडवलशाही १९७० च्या दशकात चालू राहिली. अलीकडच्या वर्षांत, न्यू डील भांडवलशाही पुनरागमन करत आहे. बर्नी सँडर्सच्या २०१६ मधील अध्यक्षीय मोहिमेमुळे बर्नी सँडर्सची नवीन डीलसारख्या प्रतिमानकडे परत स्नोबॉलिंग चळवळ सुरू केली आहे. सामाजिक लोकशाही, जसे की स्कॅन्डिनेव्हियन अर्थव्यवस्थांचे प्रतीक आहे, ही न्यू डील भांडवलशाहीची एक मजबूत आणि अधिक उदार आवृत्ती आहे (किंवा कदाचित स्कॅन्डिनेव्हियन लोक असे म्हणतील की, नवीन डील सामाजिक लोकशाहीला पाणी दिलेली होती). सामाजिक लोकशाही पोस्ट-भांडवलशाहीच्या दिशेने एक संक्रमणकालीन टप्पा म्हणून काम करू शकते, तरीही ती भांडवलशाही आहे; कारण भांडवलदार कॉर्पोरेशन आर्थिक आणि राजकीय परिदृश्यावर वर्चस्व गाजवत आहेत.

हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, कोणतेही आर्थिक प्रतिमान प्रबळ असले तरी, इतर प्रणालींचे घटक नेहमीच अस्तित्वात असतात. तर, नवउदार भांडवलशाहीमध्ये, पूर्व-भांडवलशाही (उदा. मानवी तस्करी, जो गुलामगिरीचा एक प्रकार आहे) आणि उत्तर-भांडवलवाद (उदा. कामगार सहकारी संस्था)चे घटकदेखील अस्तित्वात असू शकतात.

**सामाजिक लोकशाही**

सामाजिक लोकशाहीचे वर्णन लोकशाही समाजवादाचे उत्क्रांत स्वरूप म्हणून केले गेले आहे; ज्याचे उद्दिष्ट क्रांतिकारी समाजवाद्यांनी सुचविलेल्या सामाजिक क्रांतीऐवजी प्रस्थापित राजकीय प्रक्रियेद्वारे हळूहळू आणि शांततेने समाजवाद प्राप्त करणे आहे. तथापि, अनेक राष्ट्रीय आणि प्रादेशिक राजकीय पक्षांनी लोकशाही समाजवादाचे समर्थन करून भारतीय राजकारणावर त्याचा प्रभाव कायम आहे. रशियन राज्यक्रांतीनंतर भारतात छोटे समाजवादी क्रांतिकारी गट निर्माण झाले. सामाजिक लोकशाहीचा धोरणात्मक शासन आणि तिसऱ्या मार्गाच्या विकासामुळे सामाजिक लोकशाही जवळजवळ केवळ भांडवलशाही कल्याणकारी राज्यांशी निगडित झाली, तर लोकशाही समाजवादात साम्यवादी आणि क्रांतिकारी प्रवृत्तींचा समावेश झाला.

औपचारिक राजकीय लोकशाहीच्या सिद्धांतांच्या तुलनेत सामाजिक लोकशाहीचे सिद्धांत, मूलभूत हक्कांच्या प्राप्तीमध्ये अडथळा आणणाऱ्या पार्श्वभूमीतील असमानतेची दखल घेतात. पुनर्वितरणात्मक न्यायाद्वारे सामाजिक दुर्बलतेच्या तटस्थतेला प्राधान्य देतात आणि प्रतिष्ठेच्या पुनर्प्राप्तीवर लक्ष केंद्रित करतात; यावर सामान्यतः सहमत आहे. मानवाचे देय आहे प्रत्येक नागरिकाने समाजाच्या अनेक व्यवहारांमध्ये आत्मविश्वासाने भाग घेतला पाहिजे आणि तिच्या 'आवाज'ला तिच्या शेजाऱ्याइतकेच वजन आहे; याची खात्री देणे हे अंतिम उद्दिष्ट आहे. म्हणजे, दुर्बल करणारी गरिबी आणि निरक्षरता, कुपोषण, भूक आणि बेघरपणापासून लोकांची मुक्तता झाली तरच विषयातून एजंटकडे संक्रमण होऊ शकते. लोकशाही जीवनात नागरिकांच्या सहभागाची ही अत्यावश्यक अट आहे. एके काळी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील नेत्यांना

लोकशाहीने काय साध्य करायचे होते: स्वातंत्र्य, समता, प्रतिष्ठा आणि न्याय याची काही दृष्टी होती. कालांतराने राजकीय कल्पनाशक्ती कोमेजली आहे, लाखो लोक निराशाजनक आणि आनंदी जीवन जगू लागले आहेत आणि आमचे नेते गैर-मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करतात. अलीकडील आर्थिक सिद्धांत आणि धोरणे या सामाजिक लोकशाही प्रणालीवर अनुक्रमे विकसित आणि तयार केली जात आहेत. या प्रणालीने भारतीय स्वातंत्र्यसैनिकांकडून त्वरित लक्ष वेधले. उत्पन्न आणि सामाजिक विषमता, रोजगार आणि गरिबी निर्मूलन योजना या तत्त्वांवर तयार केल्या आहेत. हळूहळू आपल्या सामाजिक-आर्थिक व्यवस्थेची या संदर्भात आणि पैलूंमध्ये पुनर्रचना केली जात आहे.

**थॅलरचा नज** (Nudge) **सिद्धांत**

रिचर्ड थॅलर यांनी वर्तणुकीच्या अर्थशास्त्रावरील कामासाठी यावर्षीचे अर्थशास्त्राचे नोबेल मिळवून 'नज थिअरी'वर प्रकाश टाकला आहे. थॅलर आणि कॅस सनस्टीन यांच्या २००८ मधील पुस्तक 'नज: इम्प्रूव्हिंग डिसीजन्स' बद्दल आरोग्य, संपत्ती आणि आनंदाचा काही सरकारांवरही व्यापक परिणाम झाला आहे; हे याच्याशी संबंधित आहे. नज म्हणजे कोपरखळी. आम्ही नज तंत्राने संबंधितांना सावध करतो. थॅलरने इतरांना कोपरखळी (धक्का) देऊन आरोग्य, संपत्ती आणि आनंदाचे विश्लेषण केले आहे. हे वर्तनात्मक अर्थशास्त्र आहे किंवा ते न्यूरो-इकॉनॉमिक्स आहे. या सिद्धांतामध्ये मानवी निर्णय घेण्याची प्रक्रिया आणि त्याचे परिणाम तार्किक आहेत. वृद्ध व्यक्ती नेहमी चांगल्या शेजाऱ्यांकडे जा किंवा हुशार वर्गमित्रांशी मैत्री करा, असे सांगून चांगल्या वागणुकीबद्दल धक्काबुक्की करतात. ते काही प्रोत्साहनदेखील देतात. कोणताही पैलू, जो कोणत्याही पर्यायांना प्रतिबंधित न करता किंवा त्यांच्या आर्थिक प्रोत्साहनांमध्ये लक्षणीय बदल न करता, लोकांच्या वागणुकीत अंदाजानुसार बदल करतो. निव्वळ धक्काबुक्की म्हणून मोजण्यासाठी, हस्तक्षेप टाळणे सोपे आणि स्वस्त असणे आवश्यक आहे. नज हे आदेश नाहीत. नजच्या उदाहरणांमध्ये लोकांना डॉक्टरांच्या भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी स्मरणपत्र पाठवणे, कॅफेटेरियामध्ये निरोगी अन्न अधिक लक्षात येण्यासारखे आहे याची खात्री करणे, लोकांना ते किती वीज वापरतात याविषयी माहिती प्रदान करणे आणि प्रेक्षक ते काय पोस्ट करणार आहेत याची लोकांना आठवण करून देणे यांचा समावेश होतो. नज तीन परिभाषित वैशिष्ट्ये सामायिक करतात.

१. नज अर्थशास्त्रीय निर्णय फ्रेम लागू करणे टाळतात. ते लोकांच्या आर्थिक प्रोत्साहनांवर परिणाम करत नाहीत.
२. नज मानव-केंद्रित आहेत. ते लोकांना त्या दिशेने नेण्याचा प्रयत्न करतात ज्यामुळे त्यांचे जीवन चांगले होईल.
३. नज ऐच्छिक आहेत. ते निवडीचे स्वातंत्र्य जपतात.

विमानतळांवरील उपभोग्य वस्तूंचे व्हेंडिंग मशीन, शहरांतील डी-मार्ट ग्राहकाला त्याची आवड निवडायला लावते. तत्सम, फटाके वाजवू नका, स्वच्छ भारत, स्टार्ट अप, आत्मनिर्भर भारत हे अर्थशास्त्रातील नज सिद्धांतानुसार काही धोरणात्मक उपाय आहेत. या नज तंत्राची वैशिष्ट्ये आहेत;

१. मजा करा.
२. ते सोपं बनवा.
३. प्रक्रिया मंद करा.
४. अभिप्राय द्या
५. अंतिम परिणामांची कल्पना करा आणि नज तंत्र स्वीकारा.

मानवतर्क शुद्ध नसल्यामुळे, पुढे जाण्यासाठी आणि देशासाठी किंवा समाजासाठी सर्वोत्कृष्ट काय आहे, ते करण्यासाठी अनेकदा प्रोत्साहन किंवा हस्तक्षेप आवश्यक असतो. 'नज थिअरी'मध्ये सार्वजनिक धोरण, नागरिकांच्या वर्तनावर प्रभाव टाकणे, आरोग्यसेवा, वैयक्तिक वित्त आणि गुंतवणूक नियोजन यांसारख्या विविध क्षेत्रांत संभाव्य अनुप्रयोग आहेत. उदाहरणार्थ, कलम ८०C अंतर्गत कर सूट, लोकांना सोन्याच्या

किंवा मालमत्तेच्या जागी सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी आणि इक्विटी-लिंक्ड बचत योजना यांसारख्या आर्थिक साधनांमध्ये गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी एक कोपरखळीच आहे. ग्राहकांना धूम्रपानापासून दूर राहाण्यास प्रोत्साहित करण्यासाठी विमा कंपन्या लाइफ कव्हर्सवरील कमी प्रीमियम्सचा 'नज' वापरतात. हे थोडेसे ताणून, म्युच्युअल फंड एस.आय.पी., नियमित गुंतवणूक करून डीफॉल्ट पर्याय, हे देखील गुंतवणूकदारांना बाजारातील घसरणीच्यावेळी घाबरून जाण्यापासून दूर ठेवण्यासाठी एक कोपरखळी आहे.

**निष्कर्ष**

इकॉनॉमिक सिद्धांत तथ्यांच्या आधारावर तयार केले जातात. दोन्ही एकमेकांशी जोडलेले आहेत. ते मानवी वर्तनाच्या अगदी जवळ आहेत. आर्थिक सिद्धांत मानवी कृतींपासून वेगळे केले जाऊ शकत नाहीत. फ्रीकनॉमिक्सवरील (Freaknomics) लेविट आणि डबनरचे अलीकडील पुस्तक मानवी जीवनातील प्रत्येक गोष्टीचा लपलेला भाग दर्शविते. अर्थशास्त्र हे कठोर आर्थिक पैलू राहिलेले नाही, फक्त त्याचे अंश अर्थशास्त्र साहित्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. अशा प्रकारे प्रत्येक मानवी वर्तन आर्थिक पैलूंनी प्रेरित असते. त्याची वैज्ञानिक निरीक्षणे आणि वैज्ञानिक विश्लेषण हा सिद्धांत आहे. हे मानवी वर्तनानुसार बदलत आहे. मानवी वर्तन का बदलते? कारण माणूस विवेकी आहे. तो किंवा ती त्यांच्या वर्तनातून जास्तीत जास्त फायदा मिळवण्याचा प्रयत्न करतात. अर्थशास्त्र हे मुळात वर्तणूक विज्ञान आहे. हे धोरण तयार करणारे आणि समस्या सोडवणारे विज्ञान आहे. आर्थिक विकासाच्या इतिहासात या विज्ञानाने अर्थव्यवस्थेला असंतुलनापासून वाचवले आहे. त्याचे दोन चेहरे आहेत; एक सकारात्मक आणि दुसरा मानक आहे. नियमात्मक भाग धोरणे तयार करण्यास मदत करतो. इतर प्रकारचे विज्ञान परिस्थिती मान्य करण्यास मदत करते.

(टीप : शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र संघटनेने आयोजित केलेल्या २७ ऑगस्ट २०२२ रोजी संत गाडगे महाराज महाविद्यालय, कराड येथे झालेल्या ३३व्या विशेष व्याख्यानमालेचा हा उतारा आहे.)

**संदर्भ ग्रंथसूची :**


१. Circular Economy and Sustainability Journal, Volume 2, Issue 2, June 2022, Special Issue: Circular Economy and Sustainability:view from the International Sustainable Development Research Society, 2020 conference, Springler.

२. IMF blog, Insights and Analysis on Economics and Finance, https://blogs.imf.org/

३. Nick Srnicek (2017) Platform Capitalism, Polity, Cambridge, 2017.

४. Noriatsu Matsui, Yukio Ikemoto (eds) (2015), Solidarity Economy and Social Business : New Models for a New Society, Springler.

५. Steven D. Levitt Stephen J. Dubner (April 12, 2005), About Health, Wealth and Happiness, Freakonomics, William Morrow, Yale University Press.

६. Thaler's and Cass Sunstein (8th April, 2008), Nudge: Improving Decisions.

७. सानेगुरुजी - मानवी इतिहासाची कथा, मराठी अनुवादित, साधना प्रकाशन, पुणे, नवीन आवृत्ती २०१२.

८. लिओ ह्युबरमन - माणसाचे सांसारिक जीवन, मराठी अनुवादित.

९. सुंठणकर - बुद्धिमत्ता, प्रेरणा आणि क्रांती, मराठीत अनुवादित.


◆

# राष्ट्रीयीकरण ते खाजगीकरण भारतातील बँकींग व्यवस्थेचे संक्रमण

**अविनाश कुलकर्णी** †

**प्रस्तावना :**

हा शोधनिबंध ऐतिहासिक पद्धतीचा वापर करून मांडण्यात आला आहे. यामध्ये आधुनिक पूर्वकाळ व स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतामध्ये बँकींग व्यवस्थेची सुरुवात ही खासगी क्षेत्रात कशी झाली याचे संक्षिप्त विवेचन केले आहे. तर स्वातंत्र्योत्तर काळात आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण, अयोग्य स्पर्धा तथा काही थोड्या औद्योगिक घराण्यांची मक्तेदारी यामुळे राष्ट्रीयीकरणपूर्वकाळात होणारे वित्तीय अपवर्जन (Financial exclusion) याने राष्ट्रीयीकरणाची पार्श्वभूमी कशी तयार झाली याचे विश्लेषण केले आहे. राष्ट्रीयीकरणानंतरच्या काळात म्हणजे २१व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात बॅसल निकष आणि बँकींग सुधारणा यामध्ये राष्ट्रीयीकृत बँकांच्या विलीनीकरणाची आणि खाजगीकरणाची पायाभरणी कशी झाली, याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**मुख्य शब्द :** राष्ट्रीयीकरण, खाजगीकरण, बँकींग, बॅसल निकष, भांडवली पर्याप्तता इ.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये :**

१) भारतातील व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची कारणमीमांसा करणे. २) व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या परिणामांचे मूल्यमापन करणे. ३) भारतातील बँकींग व्यवस्थेवरील जागतिकीकरणाचा अर्थात जागतिक आर्थिक सुधारणांचा प्रभाव अभ्यासणे. ४) राष्ट्रीयीकृत बँकांच्या खाजगीकरणाची पार्श्वभूमी तपासणे इ.

**संशोधन पद्धती :**

भारतीय बँकींग व्यवस्थेमध्ये वेळोवेळी जे बदल घडून आले त्याचे विवेचन आणि विश्लेषण करण्यासाठी ऐतिहासिक पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. हा शोधनिबंध पूर्णतः दुय्यम साधनांवर आधारित आहे. तसेच या शोधनिबंधासाठी राष्ट्रीयीकरण, खाजगीकरण यांसारख्या समाजवादी आणि उदारमतवादी संकल्पनांची पार्श्वभूमीही वापरण्यात आली आहे.

**खाजगीकरणाची व्याख्या व अर्थ :**

जागतिक विकास अहवालाने खाजगीकरणाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे, 'खाजगीकरणाचा अर्थ असा होतो की, उत्पादक मालमत्तेचे सरकारी मालकीकडून खाजगी मालकीकडे हस्तांतरण करणे होय.'

श्री. डी.आर. पेंडसे यांनी खाजगीकरणाची केलेली व्याख्या, 'देशाच्या आर्थिक व्यवहारातील सरकारचा सहभाग कमी करणे म्हणजे खाजगीकरण होय.'

वरील व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचा कारभार खाजगी क्षेत्राकडे सोपविणे म्हणजे खाजगीकरण होय.

† सिनियर फेलो, सांस्कृतिक स्रोत एवं प्रशिक्षण केंद्र (CCRT), नवी दिल्ली. संशोधन केंद्र - गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे. आजीव सभासद क्र. : १५२५, भ्रमणध्वनी : ९८२२२०३१८७, ई-मेल : dravikul@gmail.com

**प्रस्तावना व पार्श्वभूमी :**

भारतामध्ये आधुनिकपूर्वकाळात सामान्य माणूस परंपरागत तथा एतद्देशीय बँकींग सेवासुविधेचा लाभ घेत असे. या एतद्देशीय बँकींग व्यवस्थेत खाजगी सावकार, सोने-चांदीच्या सराफी पेढ्या, व्यापारी इत्यादींचा प्रामुख्याने वाटा होता. त्याचबरोबर हे खाजगी सावकार वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या नावाने ओळखले जात होते. उदा. शेठ, खत्री, खोत, मालगुजर, महाजन, चेट्टी, श्रॉफ इ. हे सर्व एतद्देशीय बँकर्स आजच्या आधुनिक बँकींगच्या जवळपास अनेक प्रमुख सेवांचा पुरवठा करीत होते.

स्वातंत्र्यपूर्वकाळात १८व्या व १९व्या शतकाच्या दरम्यान भारतामध्ये कलकत्ता येथे आधुनिक बँकींगची सुरुवात अभिकर्ता गृहात (Agency Houses) झाली. ही बँकींग व्यवस्था संयुक्त भांडवली संस्था (Joint Stock Co.) या प्रकारात सुरू झाली. मे. अलेक्झांडर आणि कं. व मे. फर्ग्युसन आणि कं. या दोन अभिकर्ता गृहात ही सुरुवात झाली. त्यानंतरच्या काळात भारतातील विविध प्रांतामध्ये इलाखा बँकांची सुरुवात झाली. त्यामध्ये बँक ऑफ बेंगाल (१८०९), बँक ऑफ बॉम्बे (१८४०), बँक ऑफ मद्रास (१८४३) यांचा समावेश होता. १९०३ ते १९१३ या दशकात पीपल्स बँक ऑफ इंडिया लि., बँक ऑफ इंडिया लि., सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि., इंडियन बँक, बँक ऑफ बरोडा लि. इ. बँकांची सुरुवात झाली. तर १९३५ साली भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना झाली.

**भारतातील बँकींगची पुनर्बांधणी/पुनर्रचना :**

भारतातील बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची चर्चा तर स्वातंत्र्यपूर्वकाळापासूनच सुरू झालेली होती. ही चर्चा १९३३ साली झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या सत्रात करण्यात आली होती. यावेळी बँकींग कार्यावर नियंत्रण आणि नियमन करण्यासाठी व्यापक कायद्याची आवश्यकता असल्याचे मत मांडण्यात आले होते. ही वैधानिक गरज बँकींग नियमन अधिनियम १९४९ ने पूर्ण करण्यात आली. हा कायदा भारतातील सर्व प्रकारच्या बँकांना लागू करण्यात आला. या कायद्याने भारतीय रिझर्व्ह बँकेला भारतातील बँकांची पुनर्बांधणी करण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आले. रिझर्व्ह बँकेनेसुद्धा संयुक्त भांडवली बँकांची भक्कम पायाउभारणी करण्यासाठी त्यांच्या पुनर्बांधणीचे प्रयत्न केले.

१९४८ साली तत्कालीन अर्थमंत्री जॉन मथाई यांनी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचे सरकारचे धोरण असल्याचे नमूद केले होते. भारतीय रिझर्व्ह बँकेसह इम्पीरिअल बँकेचे राष्ट्रीयीकरण प्रस्तावित करण्यात आले. तर भारतीय रिझर्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण १९४९ साली करण्यात आले. परंतु अनेक कारणांमुळे इम्पीरिअल बँकेच्या राष्ट्रीयीकरणास विलंब होत गेला. शेवटी १९५५ साली या बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले व तिचे नाव भारतीय स्टेट बँक असे करण्यात आले.

यासंदर्भात अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा समिती (१९५१) जी गोरवाला समिती म्हणून ओळखली जाते. तिने काही शिफारशी केल्या होत्या. स्टेट बँकेचे सक्षमीकरण करण्यासाठी तिच्या राज्य सहयोगी बँकांचा गट स्थापन करण्याची शिफारस त्यामध्ये महत्त्वपूर्ण होती. त्यानुसार भारतीय स्टेट बँक सहयोगी (Subsidiary) अधिनियम १९५९ मंजूर करण्यात आला. परिणामी, स्वातंत्र्यपूर्वकाळात स्थापन झालेल्या स्टेट बँकेच्या ८ सहयोगी बँकांचा एक समूह १९६० साली निर्माण करण्यात आला. त्या बँका खालीलप्रमाणे-

स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र, स्टेट बँक ऑफ म्हैसूर, स्टेट बँक ऑफ पटियाला, स्टेट बँक ऑफ इंदोर लि., स्टेट बँक ऑफ हैदराबाद, स्टेट बँक ऑफ जयपूर लि., स्टेट बँक ऑफ बिकानेर लि., स्टेट बँक ऑफ त्रावणकोर.

इम्पीरिअल बँकेचे स्टेट बँकेत रूपांतर झाल्यापासून १९६९ पर्यंत स्टेट बँकेच्या शाखांची संख्या २०० टक्क्यांनी वाढली, तर इतर व्यापारी बँकांचीही चांगली प्रगती झाली.

**राष्ट्रीयीकरणपूर्व टप्पा :**

देशातील सर्व व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात यावे, असे साम्यवादी आणि समाजवादी विचारवंतांचे मत होते. परंतु तत्कालीन अर्थमंत्री मा.श्री. मोरारजी देसाई त्यास सहमत नव्हते. ते म्हणाले, ''आपण त्यावर सामाजिक नियंत्रणाद्वारे आपले उद्दिष्ट्य प्राप्त करू.'' याचा अर्थ, बँकांवर रिझर्व्ह बँकेद्वारे किंवा समिती गठीत करून या बँकांवरील सरकारी नियंत्रणाचा विस्तार करता येईल. या सामाजिक नियंत्रणाच्या मसुद्यास डिसेंबर १९६८ मध्ये राष्ट्रपतींची अनुमती मिळाली आणि ते फेब्रुवारी १९६९ पासून ते अंमलात आले. व्यापारी बँकांवर हे सामाजिक नियंत्रण लादण्यामागे जी कारणे होती त्यातील काही प्रमुख कारणे खालीलप्रमाणे -

- जर व्यापारी बँकांचे व्यवस्थापन व नियंत्रण अत्यल्प लोकांच्याकडे असेल, तर तेथे आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होते. उपलब्ध आर्थिक साधनांचा वापर अशा उद्योगपतींच्या हिताकरिता होतो.
- मक्तेदारी आयोगाने अशा आर्थिक केंद्रीकरणाचा उपयोग व्यावसायिक साम्राज्य तथा मक्तेदारीसाठी केला जात असल्याची टिप्पणी केली.
- बँकांचे कर्ज छोटे उद्योग आणि शेतीसाठी उपलब्ध केले जात नाही. बँकेचे कर्ज सट्टेबाजी कारणाकरिता मुक्तपणे उपलब्ध करून दिले जाते. हा कर्जाचा गैरवापर तसेच गैर-सामाजिकही आहे. रिझर्व्ह बँकेस ३०० पेक्षा अधिक बँकांवर देखरेख व नियमन करणे अवघड होते. १९६० साली पलाई सेंट्रल बँक आणि लक्ष्मी व्यापारी बँक बंद पडल्या. सरकारने १९६५ साली विलीनीकरण लागू करून व्यापारी बँकांची संख्या ३२८ वरून ९४ इतकी कमी केली.
- बँक व्यवस्थापन त्यांचे स्वत:चे नातेवाईक व सगेसोयरे यांना मुक्तपणे कर्ज वितरीत करीत होते. हे धोरण राष्ट्रीयीकरण पश्चातही सुरूच राहिले. तर दुसऱ्या बाजूस अनेक सहकारी बँका बुडीत कर्जासह तोटयात गेल्या आणि १९९३-२०२० या कालावधीत बंदही पडल्या.
- सरकारने नियोजित विकासाचे धोरण स्वीकारताना व्यापारी बँकांकडून अग्रक्रम क्षेत्राला कर्जपुरवठा अपेक्षित धरला होता. परंतु व्यापारी बँका या व्यापार आणि उद्योगास कर्जपुरवठा करण्यास अधिक उत्साही होत्या.

देशातील व्यापारी बँकांवर सामाजिक नियंत्रण लागू करण्यात आल्यानंतरही नव्याने गठीत झालेल्या सदस्यांनीही अनेक नियम बाजूला टाकले. वैधानिक व्यवस्थेत राहूनही त्यांना अधिकाधिक शक्य सुविधा मिळत राहिल्या. बँकर्सच्या अशा गैरवर्तनाबाबत अजून सहिष्णुता न दाखविण्याचा सरकारचा तात्काळ दृष्टिकोन बनला होता. दरम्यान, १९६९ पूर्वी नियुक्त करण्यात आलेल्या समित्या, के.एन.राय समिती, महालनोबीस समिती आणि विवियन बोस समिती यांनी बँकींग नियमन कायद्यातील त्रुटी आणि मोठे उद्योग समूह यांच्यातील संबंध अधोरेखित केले होते. या सर्व पार्श्वभूमीवर सरकारने १९ जुलै १९६९ रोजी १४ प्रमुख व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा निर्णय घेतला.

**भारतातील व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण :**

भारताचे महामहीम राष्ट्रपती यांनी १४ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा अध्यादेश काढला. बँकर्सनी त्या आदेशास न्यायालयात आव्हान दिले. यामध्ये घटनेने दिलेल्या तत्त्वांचे उल्लंघन असल्याचा दावा करण्यात आला. त्यानंतर १४ फेब्रुवारी १९७० रोजी राष्ट्रपतींकडून नव्याने अध्यादेश काढण्यात आला. तद्नंतर या अध्यादेशातील सर्व तरतुदींचा समावेश करून कायदा करण्यात आला. हा कायदा १९ जुलै १९६९ या पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आला. जून १९६९ रोजी ज्या व्यापारी बँकांच्या ठेवी ५० कोटी रुपये व अधिक होत्या त्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. एकूण १४ बँकांच्या ठेवींची रक्कम रु. २,७४२ कोटी इतकी होती. या बँकांच्या भागधारकांना बँकांच्या मालमत्तांचे नक्त मूल्य (Net worth) वजा देणी या सूत्रानुसार भरपाई देण्यात आली. कोणत्याही नफ्याकरिता वेगळी भरपाई दिली गेली नाही. राष्ट्रीयीकरण करण्यात आलेल्या

या १४ बँका पुढीलप्रमाणे-

१. सेंट्रल बँक ऑफ इंडिया, २. बँक ऑफ इंडिया, ३. पंजाब नॅशनल बॅक, ४. बँक ऑफ बरोडा, ५. युनायटेड कमर्शिअल बँक, ६. कॅनरा बँक, ७. युनायटेड बँक ऑफ इंडिया, ८. देना बँक, ९. युनियन बँक ऑफ इंडिया, १०. अलाहाबाद बँक, ११. सिंडिकेट बँक, १२. इंडियन ओव्हरसीज बँक, १३. इंडियन बँक, आणि १४. बँक ऑफ महाराष्ट्र.

**व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची कारणे**

बँकांवर सामाजिक नियंत्रणासाठी जी कारणे होती ती सर्व कारणे या बँकांच्या राष्ट्रीयीकरणामागेही होती. कारण सामाजिक नियंत्रणामुळे अपेक्षित लक्ष्य गाठता आले नाही. या १४ बँकांचे एकूण भागभांडवल जेमतेम १० कोटी रुपये होते, तर ठेवी २,७४२ कोटी रुपये हे मोजक्याच काही लोकांकडे संपत्तीचे केंद्रीकरण झाल्याचे दर्शविते. लोकशाही आणि समाजवादी दृष्टिकोनातून अशा आर्थिक केंद्रीकरणास दुर्लक्षित करणे शक्य नव्हते. या बँकांकडून १९५१-६८ या काळात उद्योगांना ३४ ते ६८ टक्के इतका वित्तपुरवठा केला गेला, तर कृषी क्षेत्राला २ टक्क्यांपेक्षाही कमी वित्तपुरवठा केला गेला. अशाप्रकारे बँका आर्थिक-सामाजिक उद्दिष्टांना मदत करण्यास अपयशी ठरल्यामुळे सरकारने त्यांच्यावरील नियंत्रणात वाढ करण्याचे ठरविले.

राष्ट्रीयीकरणाचा दुसरा टप्पा - एप्रिल १९८० रोजी २०० कोटी रुपयांपेक्षा अधिक ठेवी असणाऱ्या आणखी ६ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. या बँका म्हणजे, आंध्रा बँक, दि कार्पोरेशन बँक, दि न्यू बँक ऑफ इंडिया, दि पंजाब अ‍ॅन्ड सिंध बँक, दि विजया बँक आणि दि ओरिएन्टल बँक ऑफ कॉमर्स.

**व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे मूल्यमापन**

व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे मूल्यमापन संक्षिप्त स्वरूपात पुढीलप्रमाणे-

**तक्ता क्र. १ बँकींग सुधारणापश्चात सार्वजनिक अनुसुचित व्यापारी बँकांचा शाखा विस्तार**

| मार्च अखेर | एकूण शाखा | वाढ |
|---|---|---|
| २०१४ | १,२०,९६५ | ११,६८६ |
| २०१५ | १,३०,४८२ | ९,५१७ |
| २०१६ | १,३४,८५८ | ४,३७६ |
| २०१७ | १,४०,२१६ | ५,३५८ |
| २०१८ | १,४१,९०९ | १,६९३ |
| २०१९ | १,४५,३७४ | ३,४६५ |
| २०२० | १,५३,१०२ | ७,७२८ |
| २०२१ | १,५४,४८५ | १,३८३ |

स्रोत - www.thehindubusinessline.com>artical37759648.eceat 19-9-22)

तक्ता क्र. १ वरून राष्ट्रीयीकरण पश्चात बँकांच्या एकूण शाखांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. राष्ट्रीयीकरणानंतरच्या ४४ वर्षांत बँकांच्या एकूण शाखांच्या संख्येत ९०० टक्के वाढ झाल्याचे आढळून येते. त्याचबरोबर बँकांच्या एकूण व्यवसायामध्येही मोठ्या प्रमाणत वाढ झाली. यामध्ये बँकाच्या ठेवींमध्येही

मोठी वाढ झाली. तर सर्वसामान्य लोकाच्या कर्ज वितरण रकमेतही वाढ झाली. 'मार्च २०१९ रोजी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी वितरीत केलेल्या एकूण कर्जाची रक्कम रु.५८,९२,६६७ कोटी इतकी होती तर ही रक्कम मार्च २०२० रोजी रु.६१,५८,११२ कोटी इतकी झाली.' यापैकी २३,१४,२४२ कोटी रुपये प्राथमिक क्षेत्रात वितरित केले. या बँकांनी केलेल्या कर्ज वितरणाचा आढावा खालीलप्रमाणे-

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी वर्ष २०१९मध्ये रु. ५८,९२,६६७ कोटींचे कर्ज वितरित केले होते तर २०२० मध्ये ही रक्कम ६१,५८,११२ कोटी रुपये इतकी होती. राष्ट्रीयीकरण पश्चात बँकांच्या कर्ज वितरणामध्ये विविध क्षेत्रांचा समावेश झाला. त्यामुळे वित्तीय समावेशनाचे उद्दिष्ट साकारण्याचा प्रयत्न झाल्याचे आढळून येते. असे असले तरी, जागतिकीकरण, उदारीकरण याचा दबाव हळूहळू देशातील आर्थिक

**तक्ता क्र.२ राष्ट्रीयीकृत बँकांचे कर्ज वितरण (रु. कोटीत)**

| क्षेत्र | १९६९ | १९७२ | १९८२ | १९९४ | २००३-०४ |
|---|---|---|---|---|---|
| कृषी क्षेत्र | १८८ | ४८५ | ३६३५ | २१२०८ | ८६१८७ |
| लघु उद्योग | २८६ | ६४५ | ३८८० | २२६२० | ५८२७८ |
| इतर क्षेत्र | ३१ | १९६ | १२१४ | १००४७ | १०१२०७ |
| एकूण | ५०५ | १३२६ | ८७२९ | ५३८७५ | २४५६७२ |

स्रोत - Indian Banking System, Dr. Mukund Mahajan, Nirali Prakashan, Pune, June 2005

क्षेत्रावर निर्माण होऊ लागला होता आणि बँकांच्या सक्षमीकरणासाठी अभूतपूर्व सुधारणांची शिफारस करण्यात आली.


**सुधारणा पर्व :**

जागतिक पातळीवर बँकींग क्षेत्रातील सातत्यपूर्ण सुधारणांसाठी बॅसल समिती ही एक स्थायी संरचना आहे. या समितीने शिफारस केलेल्या सुधारणा लागू करणे हे बंधनकारक आहे. कारण भारताने बॅसल सुधारणा योजनेवर स्वाक्षरी करून त्यास अनुमती दिलेली आहे. ही समिती भांडवली पर्याप्तता ते जोखीम व्यवस्थापन याबाबत निकष सुचवित असते. परंतु सुरुवातीच्या काळात जगात सर्वत्र बँकांनी या सुधारणा निकषांची अंमलबजावणी पुढे ढकलली होती.

तसेच १४ ऑगस्ट १९९१ रोजी भारत सरकारने रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर एम. नरसिंहम यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती नेमली होती. या समितीने वित्तीय व्यवस्थेच्या सर्व बाजूंचे म्हणजे रचना, संघटन, कार्ये आणि प्रक्रिया यांचे परीक्षण केले. बँकींग व्यवस्थेत उत्पादकता आणि कार्यक्षमता यामध्ये गंभीर घसरण झाल्याचे निरीक्षण या समितीने नोंदविले होते. परिणामी, बँकांच्या नफा क्षमतेमध्ये घट झाल्याचेही निदर्शनास आले होते. या समितीने तिचा अहवाल १६ नोव्हेंबर १९९१ रोजी एकूण ४८ शिफारशींसह सादर केला. यातील महत्त्वाची शिफारस म्हणजे बँकांच्या मालमत्तांचे वर्गीकरण आणि अनुत्पादक मालमत्तेची (Non Performing Assets-NPA) तरतूद होय. पुढे ही अनुत्पादक मालमत्ता एक गंभीर समस्या बनली आहे. ही समस्या बँकींग व्यवसायाच्या विकासाकरिता आवश्यक असणाऱ्या भांडवली पर्याप्ततेलाही बाधक ठरू लागली. राष्ट्रीयीकृत बँकांची अनुत्पादक मालमत्ता २००६-०७ या आर्थिक वर्षात रु.९ हजार कोटी इतकी होती. ती २०१५-१६ वर्षापर्यंत रु.५९ हजार कोटी इतकी वाढली होती.

दरम्यान, बॅसल-२ च्या निकषांच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीयीकृत बँकांना रु.६७० ते ७२४ कोटींच्या नवीन भागभांडवलाची आवश्यकता होती. ही बँकांच्या सक्षमीकरणाची आणि व्यावसायिक निपटाऱ्याची किंमत होती. त्यातच मार्च २०१५ मध्ये बॅसल-३ च्या निकषांची घोषणा करण्यात आली. त्यानुसार या बँकांना त्यांच्या एकूण उलाढालींच्या ५.५ टक्क्यांपेक्षा अधिक भांडवली वाढ करणे क्रमप्राप्त झाले. त्याचबरोबर मार्च २०१८ पर्यंत बँकांना त्यांचा भांडवली पर्याप्तता दर ११.५ टक्क्यांपर्यंत वाढविणेही आवश्यक

**आलेख क्र. १ राष्ट्रीयीकृत बँकांच्या अनुत्पादक मालमत्तेचा कल (रक्कम रु. कोटी)**




स्त्रोत - सप्तरंग पुरवणी, दैनिक सकाळ, पुणे, दिनांक १४/०८/२०१६, पृष्ठ २०

करण्यात आले. दरम्यान, जून २०१७ पर्यंत राष्ट्रीयीकृत बँकांची ढोबळ अनुत्पादक मालमत्ता रु.७ लाख ३३ हजार १३६ कोटी इतकी झाली. त्यामुळे बँकांना थोडी उसंत मिळावी यासाठी रिझर्व्ह बँकेने बॅसल-३च्या निकषांची अंमलबजावणी मार्च २०१९ पर्यंत पुढे ढकलली, तर दुसऱ्या बाजूस केंद्र सरकारने राष्ट्रीयीकृत बँकांना भांडवली पुरवठा करण्यास सुरुवात केली. हा भांडवली पुरवठा पुढीलप्रमाणे-

**राष्ट्रीयीकृत/सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे विलीनीकरण :**

सरकारकडून बँकाची भांडवली पुनर्भरणी झाली, तरीही बँकांचे संशयित व बुडीत कर्ज बँकांच्या व्यवसायावर प्रतिकूल परिणाम करणारे आहेत. हा अनुत्पादक मालमत्तेचा प्रश्न हाताळण्यासाठी सरकार व रिझर्व्ह बँक हे दोघेही पुढे सरसावले आहेत. बँकांची पुनर्रचना करण्यासाठी भारत सरकारने २०२१ मध्ये १० सार्वजनिक क्षेत्रातील (राष्ट्रीयीकृत) बँकांचे ४ बँकांमध्ये विलीनीकरण करण्याची प्रक्रिया सुरू केली. या बँका पुढीलप्रमाणे -

**तक्ता क्र.३ केंद्र सरकारने राष्ट्रीयीकृत बँकांना केलेला भांडवली पुरवठा**

| बँकेचे नाव | रक्कम रु. कोटी |
|---|---|
| पंजाब ॲन्ड सिंध बँक | ७५८ |
| अलाहाबाद बँक | १५०० |
| आंध्रा बँक | १८९० |
| कार्पोरेशन बँक | २१८७ |
| युनायटेड बँक | २६४३ |
| सिंडिकेट बँक | २८३९ |
| देना बँक | ३०४५ |
| बँक ऑफ महाराष्ट्रा | ३१७३ |
| ओरिएन्टल बँक ऑफ कॉमर्स | ३५७१ |
| युनियन बँक ऑफ इंडिया | ४५२४ |
| इंडियन ओव्हरसिस बँक | ४८६४ |
| कॅनरा बँक | ४८६५ |
| सेंटल बँक ऑफ इंडिया | ५१५८ |
| बँक ऑफ बरोडा | ५३७५ |
| पंजाब नॅशनल बँक | ५४७३ |
| युको बँक | ६५०८ |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | ८८०० |
| बँक ऑफ इंडिया | ९२३२ |

स्रोत - RBI Circular January 2018

बँकांच्या या विलीनीकरणामागे अशी अपेक्षा होती की, त्यामुळे बँकांकडे मोठा भांडवली पाया तयार होईल व जो बॅसल-३ च्या निकषांची पूर्तता करण्यास उपयोगी पडेल. त्याचबरोबर बँकांच्या व्यवसायात वाढ होण्यासही मदत होईल. बँकांच्या परिचलन खर्चात बचत होऊन परिचलन नफ्यामध्ये वाढ होईल. परंतु कोविड-१९ महामारी आणि त्यानंतर जागतिक पातळीवरील राजकीय व आर्थिक अस्थिरता याचा परिणाम देशातील अर्थव्यवस्थेवर पडला आणि बँकांच्या व्यवसायावरही त्याच परिणाम होऊ घातला आहे. रिझर्व्ह बँकेने रेपो दरांमध्ये वाढ केल्यामुळे बँकांच्या व्याजदरांमध्ये वाढ झाली आहे. त्याचा परिणाम एकूण बँकांच्या व्यवसायावरही होण्याची शक्यता आहे.

**तक्ता क्र. ५ राष्ट्रीयीकृत बँकांचे विलीनीकरण**

| **सूत्रसंचालक बँक** (Anchor Bank) | **विलीनीकृत बँक** (Merged Bank) |
|---|---|
| पंजाब नॅशनल बँक | ओरिएन्टल बँक ऑफ कॉमर्स<br>युनायटेड बँक ऑफ इंडिया |
| कॅनरा बँक | सिंडिकेट बँक |
| इंडियन बँक | अलाहाबाद बँक |
| युनियन बँक ऑफ इंडिया | आंध्रा बँक<br>कार्पोरेशन बँक |
| बँक ऑफ बरोडा | देना बँक<br>विजया बँक |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | स्टेट बँक ऑफ बिकानेर अॅन्ड जयपूर<br>स्टेट बँक ऑफ हैदराबाद<br>स्टेट बँक ऑफ मैसूर<br>स्टेट बँक ऑफ पटियाला<br>स्टेट बँक ऑफ त्रावणकोर<br>भारतीय महिला बँक |

स्रोत - www.bankbzzar.com/ifsc/list-of-merged-public-sector-banks.

**बँकांचे खाजगीकरण :**

२०२१ च्या अंदाजपत्रकीय भाषणात अर्थमंत्री मा. श्रीमती निर्मला सितारामन यांनी म्हटले की, 'नीती आयोगाने दोन बँकांच्या खाजगीकरणाची सूचना केलेली आहे व त्याचा अभ्यास करण्यासाठी सचिवांच्या गटास निर्देश देण्यात आले आहेत.' राष्ट्रीयीकृत बँकांच्या खाजगीकरणासंदर्भात कॅबिनेट सचिवांची एक उच्चस्तरीय सभाही पार पडली. बहुतेक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि इंडियन ओव्हरसीज बँकेचे खाजगीकरण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. जून २०१७ साली या दोन बँकांची अनुत्पादक मालमत्ता अनुक्रमे रु. ३१,३९८ कोटी व रु. ३५,४५३ कोटी इतकी होती. यातील इंडियन ओव्हरसीज बँकेच्याबाबत एक अद्वितीय घटना म्हणजे जून २००९ रोजी या बँकेमध्ये पुण्यातील सहकारी बँकींग क्षेत्रातील एक प्रतिष्ठित बँक श्री सुवर्ण सहकारी बँक लि. विलीन करण्यात आली होती. खाजगी अर्थात सहकारी क्षेत्रातील बँक राष्ट्रीयीकृत बँकेत विलीन करण्याचे ते अद्वितीय व अभूतपूर्व उदाहरण होते. त्यावेळी विलीन झालेल्या सुवर्ण सहकारी बँकेच्या कर्मचाऱ्यांवर मोठा अन्याय झाल्याचे सांगितले जात होते. या बँकेच्या कायमस्वरूपी कामगारांना या राष्ट्रीयीकृत बँकेने तात्पुरत्या स्वरूपात नोकरीस घेऊन त्यांची पूर्वलक्षी सेवा खंडित केली. दुसरे म्हणजे सुवर्ण सहकारीच्या कर्मचाऱ्यांना फक्त रु. ३००० मासिक वेतनावर त्यांची नियुक्ती महाराष्ट्र राज्याच्या बाहेर करण्यात आली होती.

बँकांच्या खाजगीकरणाच्या चर्चेत भारतीय स्टेट बँक सोडून इतर बँकांचेसुद्धा खाजगीकरण करण्यात येईल, असे म्हटले जात आहे. त्यासाठी पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीचे सदस्य मा. पूनम गुप्ता

आणि नीती आयोगाचे माजी उपाध्यक्ष श्री. अरविंद पनगरिया यांनी तयार केलेल्या अहवालाचा दाखला दिला जात आहे. तर पुढील काही वर्षात भारतीय स्टेट बँकेचेसुद्धा खाजगीकरण करण्यात येईल असे नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्चच्या अहवालात म्हटले आहे.

**निरीक्षण :**

वरील विवेचनातून आणि विश्लेषणातून ज्या प्रमुख बाबी निदर्शनास येतात त्या खालीलप्रमाणे-

भारतातील आधुनिकपूर्व व आधुनिक बँक व्यवसाय हा खाजगी क्षेत्रामधेच सुरू होता. या बँक व्यवसायामुळे स्वातंत्र्योत्तर काळात आर्थिक सत्तेचे मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण झाले. व्यवसायात अनैतिक स्पर्धा आणि मक्तेदारीचा प्रभाव खूप मोठा होता. त्यामुळे समाजातील खूप मोठ्या सामान्य व गरीब वर्गाचे वित्तीय अपवर्जन होत होते. या संदर्भात सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून देशातील मोठ्या आकाराच्या प्रमुख १४ व्यापारी बँकांचे प्रथम १९६९ साली राष्ट्रीयीकरण करण्यात आले, तर १९८० साली आणखी ६ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

राष्ट्रीयीकरणाच्या मूल्यमापनातून असे निदर्शनास येते की, या बँकांच्या शाखांचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला. तसेच या बँकांची सेवासुविधा सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचण्यास सुरुवात झाली. देशातील अग्रक्रम क्षेत्र, लघु उद्योग क्षेत्र, स्वतंत्र व्यावसायिक अशा वेगवेगळ्या लोकांचे वित्तीय समावेशन होऊ लागले.

दुसऱ्या बाजूस बँकांची कार्यक्षमता आणि उत्पादकता मात्र कमी कमी होत गेली. बदलत्या आर्थिक वातावरणात आणि जागतिक पातळीवरील सुधारणा युगात भारतातील बँकांची स्पर्धात्मकताही घटू लागली. बँकांच्या अनुत्पादक कर्जामध्ये सातत्याने मोठ्या प्रमाणात वाढ होत राहिल्याने व्यवसायासाठी भांडवलाची कमतरताही पडू लागली. या सर्वांचा परिणाम बँकांच्या नफा क्षमतेवर झाला. यातून मार्ग काढण्यासाठी प्रथम राष्ट्रीयीकृत बँकांच्या विलीनीकरणाची प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्याद्वारे बँकांचा परिचलन खर्च कमी करण्याचा प्रयत्न असल्याचे दिसून येते. परंतु हा उपायही फारसा प्रभावी ठरत नसल्याचे दिसून येऊ लागल्याने या बँकांच्या खाजगीकरणाची चर्चा सुरू झाली. परंतु प्रत्यक्षात मात्र असे खाजगीकरण अजूनही (जून २०२२) झाले नसल्याचे निदर्शनास येते.

२०२१ साली झालेले राष्ट्रीयीकृत बँकांचे विलीनीकरण हे देशातील पहिले विलीनीकरण नव्हते, तर १९६५ साली देशातील व्यापारी बँकांचे पहिले विलीनीकरण झाले होते व बँकांची संख्या कमी करण्यात आली होती. त्यानंतर १९९३-९४ मध्ये दि न्यू बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयीकृत बँकेचे पंजाब नॅशनल बँकेत झालेले विलीनीकरण हे दुसरे उदाहरण होते.

**समारोप :**

भारतातील बँक व्यवसायाचे मूळ हे खाजगी क्षेत्रामध्ये होते. त्यातील काही बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. तर काळाच्या ओघात पुन्हा त्यांच्या खाजगीकरणासाठी विचारविनिमय व प्रयत्न सुरू झाले. म्हणजे भारतातील बँक व्यवसायाचे खाजगी - राष्ट्रीयीकृत - खासगी असे चक्रीय संक्रमण होत असल्याचे निष्कर्षास येते, तर याच व्यवस्थेचे आर्थिक विश्लेषण असेही करता येते की, भांडवलप्रधान व्यवस्थेतील दोष व त्रुटींमुळे बँक व्यवसायाचे समाजवादी व्यवस्थेत संक्रमण झाले, तर समाजवादी व्यवस्थेतील दोष व त्रुटींमुळे पुन्हा भांडवलप्रधान व्यवस्थेकडे संक्रमण होण्याची प्रक्रिया विचाराधिन आहे.

**संदर्भ सूची :**


१. Govilkar V.M. (January 2015), Arthgidnyasa, Continental Prakashan, Pune.

२. Mahajan Mukund (June 2005), Indian

Banking System, Nirali Prakashan, Pune.

३. अर्थसंवाद, मराठी अर्थशास्त्र परिषद, जाने.-मार्च २०१८.

४. दैनिक लोकसत्ता, पुणे, दिनांक २८/०६/२०२१ पृष्ठ ४.

५. दैनिक लोकमत, पुणे, दिनांक १३/०७/२०२२ पृष्ठ ७.

६ बापट विष्णू (२००६), बँक व्यवहार कोष, पुणे, पाचवी आवृत्ती.

७. सप्तरंग, दैनिक सकाळ, पुणे, दिनांक १४/०८/२०१६.

**संकेत स्थळ :**

१. https://m.rbi.org.in/scripts/PublicationsView.aspx?id=20270 access 25/07/2022

२. www.rbi.org

३. www.financialexpress.com

४. www.bankbazzar.com

५. www.india.com

◆

वापरलेली नाहीत अशी यंत्रे भांडवल नाहीत.

चळवळ हा नफ्याचा घटक आहे.

**- कार्ल मार्क्स**

## निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना व अर्थसंवाद लेखकांना कळविण्यात येते की, कार्यकारिणीच्या ठरावानुसार दि. १ एप्रिल २०२० पासून अर्थसंवाद हा '**तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक**' करण्यात आलेला आहे. त्यामुळे यापुढील काळात अर्थसंवादचे लेख हे तज्ज्ञांकडून परिक्षण करुन घेऊन, गरजेनुरूप त्यामध्ये लेखकांकडून योग्य त्या सुधारणा करुन घेऊनच अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध केले जातील. युजीसीचे बदलते धोरण आणि गुणवत्ता वाढीच्या अनुषंगाने सदर हितावह बदल अर्थसंवादमध्ये करण्यात आलेला आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# युरोपातील प्रादेशिक एकत्रीकरणाची फलनिष्पत्ती

**धनश्री महाजन** †

**प्रास्ताविक :**

१९३०ची महामंदी दुसऱ्या महायुद्धानंतर जित आणि जे त्यांच्या अर्थव्यवस्थांवर आलेले मळभ, या पार्श्वभूमीवर जागतिक पातळीवर संस्थात्मक बांधणी करण्यासाठी १९४४च्या ब्रेटनवुडस् परिषदेत तीन महत्त्वाचे ठराव झाले. विनिमय दर व्यवस्थापनासाठी नाणेनिधी, युद्धरुद्ध देशांना कर्ज देऊन त्यांनी रशियाच्या साम्यवादात अडकूनये म्हणून जागतिक बँक आणि जागतिक व्यापारवृद्धीसाठी गॅट करार अशी त्रयी अस्तित्वात आली. गॅटचे पहिले तत्त्व महत्त्वाचे आहे. ते म्हणजे गॅटच्या सदस्य देशांनी व्यापार सवलती अथवा निर्बंधाच्या बाबतीत परस्परांशी कोणताही भेदभाव करू नये. या तत्त्वाला एकच सन्माननीय अपवाद आहे प्रादेशिक एकत्रीकरणाचा. जसे मुक्त व्यापार क्षेत्र, जकात संघ इत्यादी. या महत्त्वाच्या घटना घडत असतानाच दुसऱ्या महायुद्धापर्यंत एकमेकांशी युद्धभूमीवर वारंवार लढलेल्या युरोपियन राष्ट्रांनी जुने वैर विसरून युरोप खंडाच्या पातळीवर नव्याने आंतरराष्ट्रीय सहकार्याचा अध्याय रचायला सुरुवात केली.

**युरोपातील प्रादेशिक सहकार्याचा संक्षिप्त इतिहासः**

१९५० मध्ये युरोपियन पेमेंटस युनियनच्या स्थापनेपासून युरोपात आंतरराष्ट्रीय मौद्रिक सहकार्याची सुरुवात झाली. नाणेनिधीला समांतर अशी बहुपक्षीय निरसनाची व्यवस्था बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंटसच्या माध्यमातून करण्यात आली.

एक प्रकारे ही व्यवस्था नाणेनिधीच्या विनिमय दर नियंत्रणाला शह देणारी ठरली, असेही म्हणता येईल.

मात्र १९५८ पर्यंत युरोपियन पेमेंटस युनियनच्या सदस्यांनी आपापल्या चलनाचे विनिमय दर पेमेंटस युनियनच्या माध्यमातून नियंत्रित करण्याऐवजी ती बाजारावर म्हणजे चलनाच्या मागणी पुरवठ्यावर सोपवली म्हणून बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंटस्चे प्रमुख कार्यच विसर्जित झाले. परंतु हा बदल लक्षात घेऊन १९५८च्या सुमारास युरोपियन मौद्रिक करार (European Monetary Agreement) अस्तित्वात आला. यानुसार मध्यवर्ती बँकाच्या माध्यमातून सोने किंवा अमेरिकन डॉलर्समध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वित्त व्यवहारांसाठी रोखता उपलब्ध करून देण्यात आली. परंतु युरोपियन मौद्रिक

† प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बाबासोहब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
आजीव सभासद क्र. :८४४, भ्रमणध्वनी : ९८८११३१०९३, ई-मेल : dhmahajan7@gmail.com

करार स्थापनेपासून ते अदमासे १९७१-७२ दरम्यान रोखता प्राप्तीसाठीची या कराराची प्रस्तुतता नाहीशी झाली. कारण १९७२ पर्यंत युरोपातल्या बहुतेक राष्ट्रांनी बाजारावर आधारित तरंगत्या विनिमय दर पद्धतीचा अंगीकार केला. याच वेळी नाणेनिधीचे विनिमय दर नियंत्रणाचे कार्य कालबाह्य ठरले आणि त्यासोबतच विनिमय दर नियंत्रणाची ब्रेटनवुडस् पद्धती कोसळली.

**युरोपातील विनिमय दर व्यवस्थापन:**

ब्रेटनवुडस् पद्धती कोसळण्यापूर्वी स्मिथसोनियन करारानुसार विनिमय दर डॉलरशी २.२५ टक्केच्या मर्यादेत स्थिर ठेवावेत असे ठरले. युरोपात याला बोगद्यातील सर्प (The snake within the tunnel) असे नाव देण्यात आले. परंतु हे टनेल (Tunnel) (स्मिथसोनियन मर्यादा) मार्च १९७३ मध्ये नाहीसे झाले आणि युरोपियन योजनेला (The Snake) असे नाव मिळाले. परंतु या स्नेक योजनेतून युरोपियन समुदायातील मोठ्या देशांनी अंग काढून घेतले. त्यामुळे स्नेक अपयशी ठरला. पुन्हा मार्च १९७९ मध्ये युरोपियन समुदाय सदस्यांनी नवी विनिमय दर यंत्रणा तयार केली. मौद्रिक एकीकरणासाठी आवश्यक पूर्वतयारी करणे हा या नव्या यंत्रणेचा उद्देश होता. यासाठी नवे युरोपियन चलन एकक (European Currency Unit) तयार करण्यात आले. IMF च्या विशेष आहरण अधिकारांच्या धर्तीवर ग्रीस, आयर्लंड, डेन्मार्क, बेल्जियम, जर्मनी, फ्रान्स, ब्रिटन व नेदरलंडस या नऊ देशाच्या चलनाच्या टोपलीची यंत्रणा (Currency Basket Mechanism) तयार करण्यात आली. चलन दर यंत्रणेच्या प्रत्येक सदस्य देशाने चलन टोपली यंत्रणेनुसार आपल्या चलनाचा विनिमय दर निश्चित करणे अभिप्रेत होते. परंतु युरोपियन समुदायाचे सर्व सदस्य या यंत्रणेचे सदस्य नव्हते.

मौद्रिक सहकार्याच्या दृष्टीने यापुढची पायरी म्हणजे १९९१चा मास्ट्रिच करार होय. सामायिक युरोपियन चलन इ.स. २००० पर्यंत निर्माण करण्याचे मास्ट्रिच येथील शिखर परिषदेत युरोपियन समुदायाने घोषित केले.

या दृष्टीने युरोपियन समुदायांतर्गत सामायिक चलनाला असलेले अडसर उदा. भांडवल, श्रम, वस्तू व सेवा यांची युरोपांतर्गत गतिक्षमता इ. दर करण्यासाठी प्रकल्प १९९२ (Project 1992) कार्यान्वित करण्यात आला. या प्रकल्पाची कल्पना युरोपियन कमिशनचे अध्यक्ष जॅकॉस डेलर्सि यांनी आपल्या डेलॉर्स रिपोर्टमध्ये मांडली. डेलॉर्स यांनी प्रकल्पाच्या तीन पायऱ्या सुचविल्या.

१. युरोपियन मौद्रिक व्यवस्थेच्या सर्व सदस्यांनी विनिमय दराच्या टोपली यंत्रणेत सहभागी होणे व सदस्य देशांच्या मध्यवर्ती बँकानी परस्पर सहकार्य वाढवणे.
२. विनिमय दर मर्यादा अधिक संकुचित करणे व सदस्य देशांच्या मध्यवर्ती बँकांची एकसूत्री व्यवस्था तयार करणे.
३. निश्चित विनिमय दर पद्धती व समान मौद्रिक धोरण तयार करणे, युरोपियन मध्यवर्ती बँक पद्धतीने (ESCB) किंमत स्थैर्याची जबाबदारी घेणे व सामायिक चलनाची निर्मिती करणे.

**युरोपच्या सामायिक चलनाची निर्मिती:**

३१ डिसेंबर १९९८ रोजी दुपारी युरोपियन संघातील अकरा देशांच्या वित्त मंत्र्यांची बैठक झाली. या बैठकीत युरो या नव्या युरोपियन सामायिक चलनाचे परिवर्तन मूल्य ११ चलनांशी पूर्वनिश्चित करण्यात आले. हे मूल्य अपरिवर्तनीय ठेवण्यात आले आहे. (तक्ता क्र. १ पाहा) इतर सर्व राष्ट्रे मात्र युरोच्या दराप्रमाणे ११ राष्ट्रांशी विनिमय करतील.

१ जानेवारी, १९९९ रोजी युरोचा डॉलरशी विनिमय दर १ युरो -१.१७ डॉलर्स असा होता. त्याच दिवशी १ युरो -०.७०५ पौंड स्टर्लिंग व १३३ येन आणि

४९.७० भारतीय रुपये असा विनिमय दर होता. युरोचा डॉलरशी विनिमय दर १९९९ च्या डिसेंबरपर्यंत १ युरो = १.३२ डॉलर्स होईल, असा तज्ज्ञांचा अंदाज होता. युरोचा प्रत्यक्ष दैनंदिन वापर सन १ जानेवारी २००२ पासून सुरू होईल. तोपर्यंत युरोपियन नागरिक आपापल्या

**तक्ता क्र. १ युरोचे ११ चलनाशी परिवर्तन मूल्य** (१युरो=)

| | |
|---|---|
| जर्मन मार्क | १.९५५८३ |
| फ्रेंच फ्रँक | ६.५५९५७ |
| इटालियन लिरा | १९३६.२७ |
| डच गिल्डर | २.२०३७१ |
| बेल्जियन फ्रँक | ४०.३३९९ |
| ऑस्टेलियन शिलिंग | १३.७६०३ |
| पोर्तुगीज एस्क्यूडो | २००.४८२ |
| फिनिश मार्क | ५.९४५७३ |
| आयरिश पंट | ०.७८७५६ |
| लक्सेबर्ग फ्रँक | ४०.३३९९ |

स्रोत: Time, January 11, 1999.

देशांची पूर्वीचीच चलने वापरतील असे ठरले होते.

**युरोपियन बाजाराचे नवे स्वरूप:**

युरोपियन अर्थव्यस्थेचे वास्तविक व वित्तीय क्षेत्र (Real and financial sectors) यांचे स्वरूप युरोच्या निर्मितीमुळे बदलले. या बदलाचा परिणाम जागतिक बाजारपेठेतील स्पर्धेच्या स्वरूपावरदेखील झाला. युरोपियन संघ (EU) आणि अमेरिका (USA) या दोन्ही प्रदेशांचे सकल अंतर्गत उत्पादन (GDP) जागतिक उत्पादनाच्या जवळपास प्रत्येकी २० टक्के आहे. तसेच जगाच्या एकूण निर्यातीपैकी प्रत्येकी १५ टक्के निर्यात या दोन प्रदेशाची आहे.

युरोपियन मौद्रिक एकीकरणातून अमेरिकेशी स्पर्धा करण्याचे सामर्थ्य असलेली मोठी बाजारपेठ तयार झाली आहे. युरोच्या निर्मितीसंदर्भात युरोप व अमेरिका यांची तुलना अपरिहार्यपणे केली जाणार आहे. परंतु राजकीयदृष्ट्या स्वतंत्र अशा अकरा देशांच्या मौद्रिक संघाला अमेरिकेच्या तुलनेत अनेक मर्यादांना सामोरे जावे लागले आहे.

**युरोपियन अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती : (आर्थिक वृद्धी व चलनवृद्धी)**

युरोपातील अकरा युरो चलन देशांच्या चलन वाढीच्या दरात (०.५ टक्के ते २.७ टक्के इतकी) व सकल अंतर्गत उत्पादनातील (GDP) वृद्धीच्या दरांतही (१.५ टक्के ते ९.१ टक्के ) इतकी तफावत आहे. ११ देशांच्या सरासरीहून कमी आर्थिक वृद्धिदर जर्मनी व इटलीचा आहे, तर चलनवाढीच्या सर्व देशांच्या सरासरीपेक्षा अधिक प्रमाण इटली, स्पेन, नेदरलँड, पोर्तुगाल व आयर्लंड या देशांमध्ये आहे. (तक्ता क्र. २ पाहा) असे असूनही समान मौद्रिक (३ टक्का) व्याजदर युरोपियन मध्यवर्ती बँकेने घोषित केला आहे. यामागे युरो या सामायिक चलनामुळे स्वीकारण्यात आलेल्या समान मौद्रिक धोरणामुळे भविष्यात चलनवृद्धी व आर्थिक वृद्धिदरांतील तफावत कमी होईल, अशी

**तक्ता क्र. २ आर्थिक वृद्धी, चलनवृद्धी व अंदाजपत्रकीय तूट (टक्के)**

| युरो चलन देश | आर्थिक वृद्धी, GDP | | चलनवृद्धी, | | अंदाजपत्रकीय तूट / (आधिक्य) यांचे GDP शी प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९९८ | १९९९* | १९९८ | १९९९* | १९९८ | १९९९* |
| जर्मनी | २.७ | २.२ | १.० | १.२ | २.४ | २.१ |
| फ्रान्स | ३.१ | २.४ | ०.५ | ०.९ | २.९ | २.४ |
| इटली | १.५ | २.१ | २.३ | १.८ | २.६ | २.२ |
| स्पेन | ३.८ | ३.४ | २.० | २.० | १.९ | १.८ |
| नेदरलंडस | ३.८ | २.७ | २.१ | २.१ | १.२ | १.३ |
| बेल्जियम | २.९ | २.३ | १.० | २.१ | १.५ | १.३ |
| ऑस्ट्रेलिया | ३.१ | २.४ | १.० | १.० | २.२ | २.२ |
| पोर्तुगाल | ४.० | ३.३ | २.७ | २.३ | २.३ | २.० |
| फिनलंड | ५.० | ३.२ | १.१ | १.३ | (०.८) | (१.९) |
| आयर्लंड | ९.१ | ३.२ | २.७ | २.४ | (२.५) | (२.८) |
| लक्सेंबर्ग | ४.७ | ३.४ | १.१ | १.३ | (१.४) | (१.०) |
| वरील सर्व देश | २.९ | २.५ | १.३ | १.४ | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही |

* अंदाजित : कंसातील आकडे आधिक्याचे आहेत.

स्रोत: Economist, January 2-8, 1999.

युरोपियन मध्यवर्ती बँकेची अपेक्षा आहे.

**युरोपियन चलन संघातील अंदाजपत्रकीय तूट :**

मास्ट्रिच करारानुसार चलन संघातील देशांसाठी अंदाजपत्रकीय तुटीची कमाल मर्यादा GDP च्या ३ टक्के ठेवण्यात आली आहे. १९९८ च्या आकडेवारीनुसार व १९९९ च्या अंदाजानुसार (तक्ता क्र. २ पाहा) चलन संघातील एकही देश या मर्यादेचे उल्लंघन करीत नाही. परंतु ही लक्ष्मण रेषा ओलांडली गेल्यास त्या देशांवर निर्बंध (Sanctions) घातले जाण्याची तरतूद मास्ट्रिच करारात आहे. या तरतुदीला आर्थिक घसरणीच्या परिस्थितीचा (Economic downturn) अपवाद करण्यात आला आहे. अशी घसरण म्हणजे आर्थिक वृद्धीचा दर -०.७५ टक्के किंवा त्याहून प्रतिकूल असणे असा अर्थ होतो. चलन संघातील अकरा देशांपैकी ऑस्ट्रिया व आयर्लंडचा अपवाद वगळता १९६१ नंतर सर्वच देश या परिस्थितीतून गेले आहेत. परंतु युरोच्या युरोपांतर्गत मूल्याच्या स्थैर्यासाठी अंदाजपत्रकीय तुटीवरील कडक नियंत्रण अर्थातच आवश्यक आहे.

अंदाजपत्रकीय तुटीची परिणती सार्वभौम कर्जात अंतर्गत व परकीय होत असते. अंदाजपत्रकीय तुटीचे त्या त्या सार्वभौम देशाच्या सकल अंतर्गत उत्पादिताशी

प्रमाण युरोपियन संघात सर्वत्र सारखे राहाणे केवळ अशक्य आहे.

युरोपियन संघात समाविष्ट देशांची संख्या १९९९ मध्ये ११ होती. ती आज २०२२ मध्ये २८ पर्यंत वाढली आहे. एप्रिल २०२२ मध्ये युरो चलन स्वीकारलेल्या तीस राष्ट्रांमध्ये भाववाढीचा दर सरासरी ७.४ टक्के आहे. यात युरोपियन युनियनने दिलेल्या ताज्या माहितीनुसार सर्वात कमी दर (२.३ टक्के) स्वित्झर्लंडमध्ये तर उच्चतम दर १९.१ इतका एस्टोनियामध्ये आहे. एवढी मोठी तफावत असताना युरोपियन युनियनमध्ये तद्वतच युरोपियन सामाजिक बाजारात सर्व आलबेल असणे शक्य नाही. म्हणजे वित्तीय धोरण ज्या त्या राष्ट्राच्या सार्वभौम सरकारने आखायचे मात्र समान चलन असल्यामुळे मौद्रिक धोरण युरोपियन मध्यवर्ती बँकेने ठरवायचे, अशी एक प्रकारची विसंगती आहे. युरोपियन सामायिक बाजारातून ब्रिटनने काढता पाय घेतल्यामुळे युरोपियन प्रादेशिक सहकार्याबाबत दबलेल्या आवाजातला असंतोष आता युरोपियन संघातील सदस्य देश उघड व्यक्त करत आहेत. युरोपियन देशातील राजकीय पक्ष गेल्या एक दशकापासून युरोपियन संघातील त्यांच्या देशाच्या सदस्याबाबत असंतोष व्यक्त करीत आहेत. एकंदर युरोपातच नागरिक वाढत्या संख्येने संघावर अविश्वास व्यक्त करत आहेत. ब्रिटनने सार्वमताच्या (Plebiscite) आधारे युरोपियन सामायिक बाजारातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. त्याच प्रकारचे सार्वमत ग्रीसच्या आर्थिक संकटाच्या काळात ग्रीसच्या नागरिकांनी व्यक्त केला; परंतु तरीही जर्मनीच्या आणि युरोपियन संघात कर्ज देणाऱ्या नाणेनिधीच्या दबावाखाली ज्या ग्रीसने जगाला लोकशाहीचे तत्त्वज्ञान शिकवले त्या ग्रीसमधल्या जनमताविरुद्ध जाऊन तेथील शासनाने युरोपियन संघातच राहाणे पसंत केले.

**ग्रीसमधील संकट:**

युरोपियन संघामधील अनेक अंतर्विरोध स्पष्ट करायचे, तर ग्रीसमधल्या संकटाचे उदाहरण घेता येईल. ग्रीसच्या शासनाने १९९५ पासून सातत्याने कर महसुलापेक्षा अधिक खर्च केला. ही तूट भरून काढण्यासाठी ग्रीस सरकारने इतर देशांच्या बँकांकडून मोठ्या रकमांचे कर्ज घेतले. हे कर्ज फ्रान्स, जर्मनी आणि सायप्रसने दिले. युरोपियन संघातल्या देशांसमोर ग्रीस सरकारने ठेवलेली अंदाजपत्रकीय तुटीची आकडेवारी चुकीची होती. ही चूक ग्रीसमध्ये सत्ताबदल झाल्यावर नव्या सरकारने जगासमोर आणली आणि सायप्रस, फ्रान्स, जर्मनी अशा देशांमधल्या धनको बँकांना आपण ग्रीसने दिलेल्या चुकीच्या माहितीमुळे कोणत्या संकटात आहोत, याची जाणीव झाली. युरोपियन संघात जर्मनी हा देश आपले वर्चस्व ठेवून आहे. हे वर्चस्व तिथल्या यांत्रिकी (Machnical) आणि यांत्रिकी आधारित वस्तुनिर्मिती क्षेत्रामुळे आहे. त्यामुळे आर्थिक एकत्रीकरणाचे लाभ जर्मनीसारख्या निवडक देशांनाच होत आहेत. जर्मनीशी तुलना केल्यास ग्रीसची अर्थव्यवस्था मुख्यत: पर्यटनावर आधारित आहे. त्यामुळे जर्मनीपेक्षाही सायप्रससारखा देश ग्रीसने आपली दिवाळखोरी जाहीर केल्यावर हवालदिल झाला आणि युरोपियन युनियनमध्ये त्रोइका (Troika) म्हणून प्रसिद्ध आणि मातब्बर असणाऱ्या युरोपियन मध्यवर्ती बँक, नाणेनिधी आणि युरोपियन आयोग या त्रिकुटाकडे अपेक्षेने पाहू लागला. मात्र युरोपियन युनियनने सायप्रससारखा सदस्य देशांमधल्या व्यापारी बँकांनी मोठ्या ठेवीदारांच्या ठेवींचे समभागात रूपांतर करण्याचे (ठेवीदारांची संमती न घेता) निर्देश दिले. बँक ऑफ सायप्रसला ग्रीसला दिलेल्या बुडीत कर्जाच्या संकटातून बाहेर पडण्यासाठी १ लाख युरोपेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या मोठ्या ठेवीदारांचे प्रत्येक लाख युरोमागे ४७,५०० युरो ठेवीचे बँक ऑफ सायप्रसच्या समभागांमध्ये रूपांतर केले.

याचा अर्थ असा की, ग्रीसचे संकट ग्रीसपुरते मर्यादित मुळीच राहिले नाही त्याची झळ तुलनेने दुर्बल अशा सायप्रसला सोसावी लागली. नाणेनिधीने आपली रोखता वापरून फ्रान्स आणि जर्मनीच्या बँकांना थकीत बुडीत कर्जाची भरपाई करून दिली. मात्र ग्रीसची अर्थव्यवस्था पार दुबळी झाली. ग्रीसने घेतलेल्या कर्जाचे ग्रीसच्या सकल अंतर्गत उत्पादिताशी प्रमाण ७५ टक्के झाले! ग्रीसने आपल्या बँकांना ठेवीदारांच्या आहरणाच्या मर्यादा घालून दिल्या.

या पार्श्वभूमीवर ग्रीसच्या नागरिकांनी कर्ज फेडण्याऐवजी युरोपियन संघातून बाहेर पडण्यास पसंती दिली.

**समारोप :**

ग्रीसच्या उदाहरणावरून लक्षात येते की, प्रादेशिक एकत्रीकरणातून व्यापारनिर्मिती परिणामांमधून लाभ होणार असला, तरीही एखाद्या सदस्य देशाने (वरील उदाहरणात ग्रीस) वित्तीय शिस्तभंग केल्यास तसेच अप्रामाणिक वित्तीय अंकेक्षण केल्यास एकत्र येणाऱ्यांपैकी तुलनेने दुर्बल देशांना मोठी किंमत द्यावी लागते. थोडक्यात, असे म्हणता येईल की, सार्वभौमत्व कायम ठेवत एकत्र आलेल्या देशांचे स्वतंत्र वित्तीय धोरण सामायिक मौद्रिक धोरणास पूरक नसेल, तर अशा एकत्रीकरणाची शाश्वती राहात नाही.

**संदर्भ ग्रंथसूची:**


1. Bhagwati J. and A. Pangaria (1996), “Preferential Trading Areas and Multilateralism: Strangers, Friends or Foes?” in J. Bhagwati and A. Pangaria (eds), The Economics of Preferential Trading, AEI Press, Washington DC pp. 1-78.
2. Buchan D (1993), “Europe: the Strange Superpower”, Aldershot Publishers, Dartmouth.
3. Chand Ramesh (2004): Preferential Trading Agreements and Regional Trade: Implications for Asia, Working Paper Series No E/240, Institute of Economic Growth.
4. “Finance and Development”, IMF, June 1998.
5. Khandekar Gauri (2003), “Building a Sustainable EU-India Partnership ESPO, September 2013, pp. 1-7.
6. Krueger, Anne O (2000): ‘NAFTA’s Effects: A Preliminary Assessment’, World Economy, June, pp. 761-75.
7. Liu, HCK (2011), “The Eurogene Soverign Debt Crisis” Par I: A Currency Union Not Backed by Political Union, Henry Liu: Independent Critical Analysis and Commentary, 29th Sept, http:// heryckliu.com/page 250’.html
8. Mc Callum BT (1996) "International Monetary Economic", Oxford University Press.
9. Oncu T. Sabri (2015), Greece, Its International Creditors and the Euro, Vol. I No. 7, EPW, pp 10-12.
10. Rosel Jacob (1996), “The European Union: A Model for Regional Cooperation in south Asia?”, the Economic and Political Weekly, Mumbai, December 7, 1996, pp. 3169-3173.
11. Swann D. (1992), “the Economics of the Common Marker”. The Penguin books, Harmondsworth.
12. Thompson Harry (2010), International Economics: Global Markets and Competition, World Scientific, Delhi.
13. Trade Policy Review (TPR) (2002): WTO Secretariat, World Trade Organization, Geneva.


**वर्तमान पत्रे:**


1. Economist, January 1-9, 1999.
2. Financial Express, January 5, 1999.
3. Outlook, January 18, 1999.
4. ‘Time’ January 11, 1999.


◆

# बहुआयामी दारिद्र्य - दारिद्र्य मापनाचा नवा दृष्टिकोन

**राजकुमार आण्णासो वाईंगडे** †

**प्रस्तावना :**

दारिद्र्य निर्मूलन हे स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या भारताच्या आर्थिक धोरणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट राहिलेले आहे. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही दारिद्र्याचा प्रश्न हा भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील एक मोठे आव्हान म्हणून अस्तित्वात आहे. ब्लूमबर्ग या प्रसारमाध्यम समूहामार्फत नुकत्याच प्रसिद्ध करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार भारत हा राष्ट्रीय उत्पन्नाच्या बाबतीत जगातील ५व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनलेला आहे. मार्च २०२२ च्या शेवटी ब्लूमबर्गने ऐतिहासिक विनिमय दराच्या आधारे काढलेल्या या निष्कर्षाच्या आधारे भारताने युनायटेड किंगडमला मागे टाकून या क्रमवारीमध्ये पाचवे स्थान पटकाविले आहे. परंतु ज्या युनायटेड किंगडमला भारताने मागे टाकले आहे त्या देशाचे दरडोई उत्पन्न आणि भारताचे दरडोई उत्पन्न यांची तुलना केल्यास भारताने केलेली आगेकूच ही फारशी अर्थपूर्ण राहात नाही. त्याचप्रमाणे ब्लूमबर्गच्या या अहवालानुसार भारत आणि युनायटेड किंगडम या दोन देशांच्या जगाच्या एकूण दारिद्र्यातील हिश्श्याचा विचार केल्यास यासंदर्भात भारतास अजूनही खूप मोठा प्रवास करावा लागणार आहे, असे चित्र समोर येते. दारिद्र्य निर्मूलनाच्या अनुषंगाने भारताने स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात बरीच प्रगती केलेली असली, तरी अजूनही भारताच्या लोकसंख्येतील बराचसा भाग हा असा आहे की, ज्याच्याकडे किमान राहाणीमानाची पातळी गाठण्यासाठी आवश्यक असणारी वित्तीय साधनसामग्री नाही आहे.

दारिद्र्य निर्मूलनाची जी मोहीम भारताने स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम आणि योजनांच्या माध्यमातून मोठ्या जोमाने राबविण्याचा प्रयत्न केला. या मोहिमेस पुरेसे यश न मिळण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे दारिद्र्याच्या मापनातील अपुरेपणा होय. मर्यादित साधनसामुग्रीचा सुयोग्य वापर करून दारिद्र्यावर मात करावयाची झाल्यास दारिद्र्याचे अचूक आणि विश्वसनीय मापन ही पहिली पायरी ठरते. त्याचप्रमाणे ज्या ध्येयधोरणांचा आपण स्वीकार करतो त्या ध्येयधोरणांचा प्रभावीपणा किंवा यश तपासून पाहाण्याच्या दृष्टीनेही दारिद्र्याचे मापन हे महत्त्वाचे ठरते.

दारिद्र्याची व्याख्या करताना व्यक्तीकडे किंवा कुटुंबाकडे एक किमान राहाणीमान दर्जा टिकविण्यासाठी आवश्यक असणारी वित्तीय साधनसामुग्री उपलब्ध नसण्याची अवस्था म्हणजे दारिद्र्य अशी केली जाते.

† सहयोगी प्राध्यापक, देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. १२००, भ्रमणध्वनी : ९९२२२७३९६६, ईमेल : rajwaingade@gmail.com

दारिद्र्याची अशी अवस्था ही कालपरत्वे आणि देशपरत्वे भिन्न असू शकते. भारताचा विचार केल्यास भारताने आतापर्यंत थोडाफार फरक वगळता दारिद्र्य मापनाच्या परंपरागत पद्धतीचा वापर केलेला आहे. ज्यामध्ये मूलभूत मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी ज्या वस्तू आणि सेवा आवश्यक आहेत त्या खरेदी करण्यासाठी येणारा किमान खर्च (किंवा उत्पन्न) या आधारे दारिद्र्याचे मापन केलेले आहे.[१] हा किमान खर्च म्हणजे दारिद्र्य रेषा (Poverty Line) होय. तर ज्या वस्तू आणि सेवा या मानवाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक आहेत. त्यांच्या संचास दारिद्र्य रेषा संच (Poverty Line Basket) असे संबोधले जाते.[२] दारिद्र्याचे मापन करताना जे लोक या दारिद्र्यरेषेच्या खाली आहेत म्हणजेच ज्यांचा एका विशिष्ट कालखंडातील राहाणीमान खर्च हा दारिद्र्यरेषेने दर्शविलेल्या खर्चापेक्षा कमी आहे अशा लोकांना दारिद्र्यामध्ये गणले जाते. अशा दारिद्र्यरेषेखालील लोकांचे एकूण लोकसंख्येशी असणारे टक्केवारी प्रमाण दारिद्र्याचे प्रमाण (Incidence of poverty or Head count Ratio) म्हणून ओळखले जाते. संपूर्ण जगाचा विचार केल्यास दारिद्र्य मापनाचे तत्त्व हे सारखेच म्हणजेच एक किमान राहाणीमान दर्जा टिकविण्यासाठी आवश्यक असणारा उपभोग खर्च आधारित दारिद्र्यरेषा हेच असल्याचे दिसून येते. असे असले तरी दारिद्र्य मापनाची प्रत्येक देशातील वेगळी प्रक्रिया विचारात घेता दारिद्र्याची कालपरत्वे आणि आंतरराष्ट्रीय तुलना करण्याच्या दृष्टीने दारिद्र्य मापनाचे नवीन दृष्टिकोन अस्तित्वात आल्याचे पाहावयास मिळते.

**दारिद्र्य मापनातील प्रमुख अडचणी :**

भारतातील दारिद्र्याचे मापन हे प्रामुख्याने नियोजन आयोगामार्फत स्थापन करण्यात आलेल्या कार्यगट किंवा समित्यामार्फत आवश्यक किमान कॅलरीजच्या आधारे निश्चित करण्यात आलेल्या किमान दरडोई उपभोग खर्च आधारित दारिद्र्यरेषेच्या अनुषंगाने झाल्याचे दिसते. त्याचप्रमाणे यामध्ये NSSO मार्फत त्यांच्या सर्वेक्षणातून पुरविण्यात येणाऱ्या घरगुती उपभोग खर्चाच्या माहितीच्या आधारे जवळपास सर्वच समित्यांनी घेतल्याचे दिसून येते.[३] भारतातील या दारिद्र्य मापनासाठी वापरण्यात आलेल्या दृष्टिकोनाचा विचार केल्यास त्यामध्ये बऱ्याच उणिवा पाहावयास मिळतात. सर्वप्रथम आवश्यक असणाऱ्या किमान कॅलरीज नेमक्या कोणत्या पातळीवर निश्चित करावयाच्या हा प्रश्न आहे. त्याचप्रमाणे घरगुती उपभोग खर्च खरोखर किमान कॅलरीज किंवा पोषण देण्यासाठी योग्य आहे का या बाबतीत ही शंका उपस्थित केली गेलेली आहे. तिसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे दारिद्र्यरेषा ही प्रदेशपरत्वे वेगळी असली पाहिजे. कारण प्रत्येक प्रदेशातील आवडीनिवडी तसेच किंमत पातळ्या या भिन्न असणार आहेत. त्यामुळे दारिद्र्यरेषा संचामध्ये कोणत्या वस्तू आणि सेवा असाव्यात हे निश्चित करणे अवघड काम आहे. चौथे म्हणजे अर्थव्यवस्थेतील तसेच लोकसंख्याविषयक बदलामुळे उपभोग गरजा, पोषण आवश्यकता आणि वस्तू आणि सेवांच्या किंमती याही बदलत असतात. त्यामुळे दारिद्र्य मापनाची पद्धती ही कालपरत्वे बदलली गेली पाहिजे. अन्यथा, दारिद्र्याचे अचूक मापन होणे शक्य होणार नाही. दारिद्र्य मापनातील आणखी एक महत्त्वाची उणीव म्हणजे दारिद्र्य म्हणजे फक्त उपभोग मानला गेल्याचा दृष्टिकोन. खरे पाहाता दारिद्र्य ही संकल्पना जेवढी किमान उपभोगाशी निगडित आहे तेवढीच ती इतरही महत्त्वाच्या घटकांशी बांधली गेलेली आहे. ज्यामध्ये कुपोषण, स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा आणि विजेचा अभाव, कामाचा अगुणवत्तापूर्ण दर्जा, शैक्षणिक सुविधांचा अपुरेपणा इ. चा समावेश होतो. या बाबींचा विचार करता परंपरागत दारिद्र्यरेषा दृष्टिकोन हा शिक्षण, आरोग्य, स्वच्छता इ. बाबतीतील गरिबांची वंचितता विचारात घेण्यास असमर्थ ठरतो, हे ध्यानात येते. थोडक्यात, दारिद्र्य ही एक बहुआयामी संकल्पना आहे

आणि त्यामुळे अलीकडे आंतरराष्ट्रीय पातळीवर आणि भारतामध्येही दारिद्र्याचे बहुआयामी पद्धतीने मापन करण्यासाठी प्रयत्न झाल्याचे दिसून येते. या प्रयत्नाचा थोडक्यात आढावा घेण्याचा खटाटोप प्रस्तुत लेखामध्ये केलेला आहे.

**जागतिक बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक :**

संयुक्त राष्ट्रसंघाचा विकास कार्यक्रम (UNDP) आणि ऑक्सफर्ड दारिद्र्य आणि मानव विकास उपक्रम (OPHI) यांच्या संयुक्त विद्यमाने २०१० मध्ये आणण्यात आलेला जागतिक बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक (Global Multi Dimonsional Poverty Index) हा दारिद्र्य मापनाचा एक नवीन दृष्टिकोन आहे. हा उपक्रम सध्या (२०२१) १०९ देशांना लागू करण्यात आलेला आहे. दारिद्र्य मापनासाठी वापरण्यात येणाऱ्या उत्पन्न किंवा उपभोग खर्च या एकाच निर्देशकाऐवजी दारिद्र्याचे मापन करण्यासाठी तीन आयामांचा आणि त्या अंतर्गत १० निर्देशकांच्याबाबतीत वंचितता तपासणारा असा हा दृष्टिकोन आहे.

जागतिक बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकामध्ये अंतर्भूत असणारे तीन आयाम आणि त्याअंतर्गत वंचितता मोजण्यासाठी विचारात घेतले गेलेले १० निर्देशक व प्रत्येकासाठीचा भार हे खालीलप्रमाणे आहेत.[४]

१) **आरोग्य** - बालमृत्यू आणि पोषण (प्रत्येकी १/६ भार, एकूण भार २/६)

२) **शिक्षण** - शाळेतील वर्षे आणि शाळेतील हजेरी (प्रत्येकी १/६ भार, एकूण भार २/६)

३) **राहाणीमान** - स्वयंपाक इंधन, स्वच्छता, पिण्याचे पाणी, घरव्यवस्था, वीज आणि भत्ता (प्रत्येकी भार १/१८, एकूण भार २/६)

**जागतिक बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक**

दारिद्र्याचे आयाम

- आरोग्य (भार : १/३)
  - १) बालमृत्यू (भार :१/६)
  - २) पोषण (भार : १/६)
- शिक्षण (भार : १/३)
  - १) शाळेतील वर्षे (भार :१/६)
  - २) शाळेतील हजेरी (भार :१/६)
- राहाणीमान (भार : १/३)
  - १) स्वयंपाक इंधन (भार : १/१८)
  - २) स्वच्छता (भार :१/१८)
  - ३) पिण्याचे पाणी (भार :१/१८)
  - ४) घरव्यवस्था (भार १/१८)
  - ५) वीज (भार १/१८)
  - ६) मत्ता (भार १/१८)

जागतिक बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक हा दोन भागांच्या गुणाकाराचा परिणाम म्हणून प्राप्त होतो. पहिल्या भागामध्ये बहुआयामीदृष्ट्या दरिद्री लोकांचे प्रमाण (Head Count Ratio of Poverty) मोजले जाते. ज्यासाठी प्रत्येक निर्देशकासाठी एक कट ऑफ ठरविला जातो आणि जर एखादी व्यक्ती या निर्देशकासाठी कट ऑफ मर्यादेपर्यंत पोहचला नाही तर (जसे शिक्षण या आयामाअंतर्गत शाळेतील वर्षे या

निर्देशकासाठी किमान ६ वर्षे हा कट ऑफ आहे.) तो त्या निर्देशकामध्ये वंचित राहिल्याचे म्हटले जाईल. अशा पद्धतीने प्रत्येक निर्देशकाअंतर्गत व्यक्ती वंचित आहे किंवा नाही आणि त्या निर्देशकास दिल्या गेलेल्या भारावरून प्रत्येक व्यक्तीचे वंचितता प्रमाण (Deprivation Score) निश्चित होईल. हे प्रमाण जर ३३% पेक्षा जास्त असल्यास या व्यक्तीस बहुआयामीदृष्ट्या गरीब म्हणून गणले जाईल. दुसऱ्या शब्दात एखादी व्यक्ती जर भारान्वित अशा १० निर्देशकामध्ये एक तृतीयांश किंवा जास्त (म्हणजे ३३ % किंवा जास्त) प्रमाणात वंचित राहात असेल, तर त्यास बहुआयामीदृष्ट्या गरीब असे म्हटले जाते.

बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक मिळविण्यासाठी आवश्यक असणारा दुसरा भाग म्हणजे सरासरी वंचितता प्रमाण (Average Deprivation Score) जे प्राप्त करण्यासाठी फक्त बहुआयामीदृष्ट्या गरीब असणाऱ्या व्यक्तींच्या वंचितता प्रमाणाची सरासरी विचारात घेतली जाते. सरासरी वंचितता प्रमाणावरून दारिद्र्याची तीव्रता (Intersity of Poverty) ध्यानात येते. म्हणजेच गरीब लोक हे किती गरीब आहेत याचा अंदाज हा सरासरी वंचितता प्रमाणावरून लावता येतो.

वरीलप्रमाणे बहुआयामीदृष्ट्या गरीब लोकांचे प्रमाण किंवा संख्या (Head Count Ratio of Poverty or Incidence of Poverty) आणि सरासरी वंचितता प्रमाण (Average Deprivation Score) यांच्या गुणाकारातून बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक बनेल ज्याचे मूल्य हे ० ते १ दरम्यान असेल.[५] उदाहरणार्थ, दारिद्र्याचे प्रमाण ०.७५ (म्हणजे ७५%) असेल आणि सरासरी वंचितता प्रमाण हे ०.५० असेल तर बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाचे मूल्य हे ०.३७५ इतके प्राप्त होईल. येणारे हे मूल्य जितके जास्त तितके बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण अधिक.

बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक ही दारिद्र्याचे मापन सर्वंकष पद्धतीने करण्याची एक प्रभावी पद्धती म्हणून अस्तित्वात आली असून, याद्वारे जगातील वेगवेगळ्या देशांची, देशांतील वेगवेगळ्या प्रदेशांची; तसेच वेगवेगळ्या लोकसंख्या गटांची तुलना करता येणे शक्य बनले आहे. या निर्देशांकाच्या आधारे कोण लोक वंचित किंवा गरीब आहेत, गरिबातील गरीब कोण आहेत, ते कोठे वास्तव्यास आहेत याची माहिती सहजासहजी प्राप्त होते यामुळे धोरणकर्त्यांना दारिद्र्य निर्मूलनाचे प्रभावी कार्यक्रम आणि योजना आखणे आणि राबविणे व दारिद्र्याचा शेवट करता येणे शक्य होणार आहे. थोडक्यात, दारिद्र्य मापनाचा हा नवीन दृष्टिकोन दारिद्र्याचे बहुआयामीत्व आणि त्याची तीव्रता मोजण्याच्या कामी उपलब्ध झालेले एक सक्षम असे शस्त्र आहे असे म्हणावे लागेल.

भारताचा विचार केल्यास जागतिक बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक अहवाल २०२१[६] नुसार एकूण १०९ देशांमध्ये भारत हा ०.१२३ इतक्या बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक मूल्यासहित ६६व्या स्थानी आहे. तर भारतातील बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण हे २७.९% इतके आहे. याच अहवालानुसार जागतिक बँकेच्या दारिद्र्यरेषेच्या आधारे (प्रतिदिन प्रतिव्यक्ती १.९ डॉलर्स) भारतातील दारिद्र्याचे प्रमाण हे २०११ मध्ये २१.२% होते, तर भारतामध्ये सुरेश तेंडूलकर समितीने निश्चित केलेल्या दारिद्र्यरेषेच्या आधारे मोजण्यात आलेले दारिद्र्याचे प्रमाण हे २०११ मध्ये २१.९% होते. थोडक्यात, भारतातील बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण जे २०१५-१६ च्या सर्वेक्षणावर आधारित आहे ते काहीसे जास्त असल्याचे दिसून येते.

**नीती आयोगाचा बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक:**

जागतिक बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाच्या धर्तीवर भारतानेही नीती आयोगाच्या माध्यामातून राष्ट्रीय बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक विकसित केला असून, नोव्हेंबर २०२१ मध्ये यासंबंधीचा अहवाल प्रकाशित करण्यात आलेला आहे. भारताचा राष्ट्रीय बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक हा पूर्णत: जागतिक बहुआयामी दारिद्र्य

निर्देशांक आणि त्यासाठी वापरण्यात आलेली Alkire-Foster पद्धती या दोहोंवर आधारित असून, त्यामध्ये जागतिक निर्देशांकातील १० निर्देशकाबरोबर आणखी २ निर्देशकांचा समावेश करण्यात आलेला आहे. थोडक्यात, भारतीय बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक हा दारिद्र्याचे तीन आयाम आणि त्याअंतर्गत एकूण १२ निर्देशकावर आधारित असा बनविण्यात आलेला आहे. भारताच्या राष्ट्रीय बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाची रचना ही खालीलप्रमाणे ठेवण्यात आलेली आहे.[७]

**राष्ट्रीय बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक**

दारिद्र्याचे आयाम

आरोग्य (भार : १/३)

१) पोषण (भार : १/६)
२) बाल आणि पौगंडावस्थेतील मृत्यू (भार:१/१२)
३) गर्भावस्थेतील काळजी (भार : १/१२)

शिक्षण (भार : १/३)

१) शाळेतील वर्षे (भार :१/६)
२) शाळेतील हजेरी (भार : १/६)

राहाणीमान (भार : १/३)

१) स्वयंपाक इंधन (भार : १/२१)
२) स्वच्छता (भार : १/२१)
३) पिण्याचे पाणी (भार : १/२१)
४) वीज (भार : १/२१)
५) निवास व्यवस्था (भार : १/२१)
६) मत्ता (भार : १/२१)
७) बँक खाते (भार : १/२१)

वरीलप्रमाणे दारिद्र्याचे तीन आयाम, १२ निर्देशक आणि प्रत्येक आयाम आणि निर्देशकाचा भार यांच्या स्वरूपातील रचना आणि राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण - ४ (२०१५-१६) च्या माध्यमातून प्राप्त होणारी आकडेवारी घेऊन भारतासाठीचा राष्ट्रीय बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक विकसित करण्यात आलेला आहे. या उपक्रमाचे प्रमुख निष्कर्ष हे खालीलप्रमाणे आहेत.

१) भारतातील दारिद्र्याचे प्रमाण (Incidence of poverty) हे २५.०१% आहे, तर दारिद्र्याची तीव्रता (Intensity of porverty) म्हणजेच दरिद्री लोकांमधील दारिद्र्याची तीव्रता ही ४७.१३% आहे. या दोन्हीच्या आधारे भारताचा राष्ट्रीय बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक हा ०.११८ इतका प्राप्त होतो. जो जागतिक बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकापेक्षा (०.१२३) काहीसा कमी आहे. म्हणजेच भारताचा राष्ट्रीय निर्देशांक हा भारतातील बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण हे कमी असल्याचे दर्शवितो.
२) भारतातील बहुआयामी दारिद्र्याची ग्रामीण आणि शहरी अशी विभागणी विचारात घेतल्यास ग्रामीण भागातील बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण (३२.७५%) हे शहरी भागातील प्रमाणापेक्षा (८.८१%) जवळपास चौपट असल्याचे दिसून येते.
३) भारतातील एकूण दारिद्र्यामध्ये प्रत्येक निर्देशकाचे योगदान तपासल्यास ते पुढीलप्रमाणे असल्याचे निदर्शनास येते. पोषण - २८.१%, बाल आणि पौगंडावस्थेतील मृत्यू - १.३%, गर्भावस्थेतील काळजी - १०.४%, शाळेतील वर्षे - १५.१%, शाळेतील हजेरी - ७.४%, स्वयंपाक इंधन - ९.३%, स्वच्छता - ८.६%, पिण्याचे पाणी- २.२%, वीज ३.३%, निवारा व्यवस्था - ८.३%, मत्ता - ३.६%, बँक खाते - २.२%.

४) राज्य / केंद्रशासित प्रदेशामध्ये बिहार हे असे राज्य आहे ज्यामध्ये बहुआयामीदृष्ट्या गरीब असणाऱ्या लोकांची संख्या सर्वाधिक म्हणजेच ५१.९१% इतकी आहे, तर केरळ राज्यामध्ये ती सर्वात कमी म्हणजे ०.७१% इतकी आहे.

स्वत:चा राष्ट्रीय पातळीवरील बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक कार्यान्वित करून भारताने दारिद्र्याच्या समूळ उच्चाटनासाठी आवश्यक असणारे पहिले पाऊल टाकलेले आहे. सदर निर्देशांक कालानुरूप राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणातून प्राप्त होणाऱ्या माहितीच्याआधारे सुधारित करणे आणि याआधारे दारिद्र्य निर्मूलनाच्या बाबतीत साध्य होणारी प्रगती मोजण्यासाठी नीती आयोगामार्फत प्रगती तक्ता (Progress Dashboard) तयार करण्याची प्रक्रिया सुरू असून, तीही लवकरच कार्यान्वित होणार आहे.

**समारोप :**

जगाच्या कानाकोपऱ्यात कुठेही असलेले दारिद्र्य हे जगाच्या सर्व ठिकाणच्या आर्थिक सुबत्तेला धोका आहे आणि दारिद्र्य हे बहुआयामी आहे. या दोन्ही बाबी आतापर्यंत सर्वमान्य बनलेल्या आहेत. त्यामुळे दारिद्र्याचे उच्चाटन करणे आणि त्यासाठी दारिद्र्याच्या विविध आयामांवर सातत्याने आघात करण्याची गरज सर्वांनी ओळखलेली आहे. जागतिक पातळीवर तयार करण्यात येणाऱ्या दारिद्र्याच्या बहुआयामी निर्देशांकानुसार भारताने अलीकडच्या काळात दारिद्र्य निर्मूलनामध्ये मोठी प्रगती केल्याचे म्हटले आहे. जागतिक बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक २०१८ नुसार २००५-०६ ते २०१५-१६ या काळामध्ये भारतातील बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण निम्म्याने कमी होवून २७.५% पर्यंत पोहचल्याचे मत नोंदविले आहे. हे खरोखरच मोठे यश असल्याचा अभिप्रायही या निर्देशांक अहवालामध्ये मांडण्यात आलेला आहे.

संयुक्त राष्ट्रसंघ ज्या १७ शाश्वत विकास उद्दिष्टांशी भारत बांधिल आहे यापैकी विविध स्वरूपात अस्तित्वात असलेल्या दारिद्र्याचा २०३० पर्यंत शेवट करणे हे पहिले उद्दिष्ट आहे. हे साध्य करावयाचे झाल्यास आर्थिक विकास वरच्या पातळीवर राखणे आणि दारिद्र्याच्या विविध आयामांवर आघात करण्यासाठी ध्येयाआधारित कार्यक्रमाची आखणी आणि प्रभावी अंमलबजावणी करणे महत्त्वाचे ठरणार आहे. दारिद्र्याची बहुआयामी संकल्पना आणि तिचे बहुआयामी निर्देशांकाच्या स्वरूपातील मापन दारिद्र्यास इतिहासजमा करण्याच्या दृष्टीने तितकीच महत्त्वाची भूमिका बजावेल, यात शंका नाही.

**संदर्भ ग्रंथसूची :**

1. Dr. Gaur, Seema & Dr. N. Srinivasa Rao (2020) : "Poverty Measurement in India - A Status Update", Working Paper No. 1/ 2020, Ministry of Rural Development, Govt. of India, P.3.
2. Ibid, P.3.
3. Ibid, P.3.
4. Global Multidimensional Poverty Index 2018, Oxford Poverty and Human Development Initiative (OPHI), University of Oxford.
5. Dr. Gaur, Seema & Dr. N. Srinivasa Rao. Op. cit. P. 13.
6. Global multidimensional Poverty Index 2021, Oxford Poverty and Human Development Initiative (OPHI), United Nations Development Programme (UNDP).
7. National Multidimensional Poverty Index Baseline Report, 2021, NITI Aayog, Govt. of India, PP 14-26.

**Other Reference Book :**

1. Datt, Gaurav & Ashwani Mahajan (2015) : 'Indian Economy', &. Chand & Company Pvt. Ltd., pp. 396-424.
2. Monanty, Sanjay K., U.S.Mishra and K. D. Maiti (2022) : Reflections on the NITI Aayog multidimensional Poverty Index, Economic & Political Weekly, Vol. 57, Issue No. 14, o2 April 2022.
3. Puri, V. K. and S. K. Misra (2016) : 'Indian Economy', Himalaya Publishing House, pp 192-204.
4. www. bloomberg.com

◆

# आर्थिक उदारीकरणानंतर भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारतुटीची समस्या: एक चिकित्सक अभ्यास

**सी. आर. जाधव** †
**राहुल शं. म्होपरे** ††

**प्रस्तावना :**

देशाच्या आर्थिक विकासात आंतरराष्ट्रीय व्यापाराला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराशिवाय कोणताही देश आजच्या स्थितीत अलिप्त राहूच शकत नाही. देशाचा भौतिक, आर्थिक आणि सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून अनेक वस्तू व सेवांची आयात-निर्यात करावीच लागते. म्हणून आंतरराष्ट्रीय व्यापाराला आर्थिकवृद्धीचे इंजिन असेही म्हटले जाते. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून आपण अनेक वस्तू आणि सेवांची आयात करतो; तसेच आपल्या देशामधून जगातील इतर अनेक देशांना विविध प्रकारच्या वस्तू आणि सेवांची आपण निर्यात करीत असतो.

भारत सरकारने १९९१ नंतर नवीन आर्थिक धोरण स्वीकारले. त्यामुळे १९९१ हे वर्ष भारताच्या अर्थव्यवस्थेतील मैलाचा दगड बनले. उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाची सुरुवात भारतात खऱ्या अर्थाने झाली. सन १९९१ नंतर भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या आकारमानात सतत वाढ होत आहे. भारताची आंतरराष्ट्रीय व्यापाराची दिशा आणि रचनाही बदलत निघाली आहे. भारताच्या वाढत्या आंतरराष्ट्रीय व्यापाराबरोबरच व्यापारतूटही दिवसेंदिवस वाढतच निघाली आहे. जुलै १९९१ च्या पहिल्या आठवड्यात विदेशी गंगाजळी फक्त सात दिवसांच्या निर्यातीचे देणेमूल्य भागवू शकेल इतकी होती. त्या आर्थिक पेचप्रसंगातून आपण यशस्वीरीत्या बाहेर पडलो. त्यामुळे १९९१ च्या आर्थिक पेचप्रसंगासारखी समस्या पुन्हा निर्माण होऊ नये याची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. १९९१ नंतर नवीन आर्थिक धोरण स्वीकारून तीन दशके झाली, तरीही आंतरराष्ट्रीय व्यापारतूट कमी न होता वेगाने वाढत आहे. परिणामी, आंतरराष्ट्रीय व्यापारतुटीची समस्या अधिक गंभीरपणे वाढत आहे. ही बाब अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने आणि सामाजिक-आर्थिक दृष्टीने चिंतनीय आहे. म्हणून आर्थिक उदारीकरणानंतरच्या तीन दशकातील भारतीय आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या व्यापारतुटीचे चिकित्सक विश्लेषण केले आहे.

† सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर.
आजीव सभासद क्र. १७०९, भ्रमणध्वनी : ९५४५८८८५२०, ईमेल : jadhavcryc@gmail.com
†† सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, (पदवी व पदव्युत्तर) देवचंद कॉलेज, अर्जुननगर.
आजीव सभासद क्र. ११९४, भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०, ईमेल : rahulmhopare@rediffmail.com

**१.१. शोधनिबंधाचे उद्देश:**

सदरच्या शोधनिबंधाचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

१) भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आकारमान पाहाणे.

२) भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारतुटीच्या प्रवृत्तीचा अभ्यास करणे.

३) भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात सर्वाधिक हिस्सा असणारी राष्ट्रांचा अभ्यास करणे.

४) भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची तूट कमी करण्यास उपाय सुचविणे.

**१.२. संशोधन पद्धती:**

सदरचा शोधनिबंध हा दुय्यम साधनसामग्रीवर आधारित आहे. काही संदर्भ ग्रंथ आणि आर्थिक पाहाणी अहवाल यांचा वापर केला आहे. तसेच भारत सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या वेब पोर्टलवरून आंतरराष्ट्रीय व्यापाराची आकडेवारी हेतूभिमुख नमुना निवड पद्धतीने घेतली आहे. उपलब्ध सांख्यिकीय माहितीवर संस्करण करून आलेखांचा वापर करून निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**१.३. भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारतुटीची समस्या:**

भारताची आंतरराष्ट्रीय व्यापारतूट वाढत आहे. प्रथम व्यापारतूट म्हणजे काय ते आपण थोडक्यात समजून घेऊ. 'जेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापारात निर्यात मूल्यापेक्षा आयातीचे मूल्य जास्त असते तेव्हा त्याला व्यापारतूट असे म्हणतात.' म्हणजेच निर्यात मूल्यापेक्षा आयात मूल्य जास्त असल्यामुळे निव्वळ देणे शिल्लक राहाते. उदाहरणार्थ, सन २०१९-२० साली भारताचे एकूण निर्यात मूल्य २२,१९,८५४ कोटी रुपये आणि भारताचे आयात मूल्य ३३,६०,९५४ कोटी रुपये इतके होते. तर भारताची व्यापारतूट पुढीलप्रमाणे मांडता येईल.

व्यापारतूट = निर्यात मूल्य - आयात मूल्य

-११,४१,१०० = २२,१९,८५४ - ३३,६०,९५४

**१.३.१. सन १९९१ नंतर भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आकारमान आणि व्यापारतूट-**

सन १९९१ नंतर भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आकारमान आणि व्यापारतूट कशी वाढत निघाली आहे ते पुढील तक्ता क्र.१ मध्ये दाखविले आहे.

तक्ता क्र. १ वरून विविध निष्कर्ष निघतात ते पुढीलप्रमाणे आहेत-

१) सन १९९०-९१ साली व्यापारतूट १०६३५ कोटी रुपये होती, ती सन १९९१-९२ साली ३८०९ कोटी रुपये इतकी झाली. मागील वर्षाच्या तुलनेत ही व्यापारतूट घटली. कारण नवीन आर्थिक सुधारणांना सुरुवात झाली होती. त्यामुळे निर्यात वाढीसाठी प्रयत्न आणि आयात पर्यायीकरण धोरणाचा स्वीकार केला गेला. त्याच वेळी रुपयाचे अवमूल्यनही केले गेले. परिणामी, आंतरराष्ट्रीय व्यापारतूट कमी झाली.

२) सन १९९१-९२ ते सन १९९५-९६ या पाच वर्षांच्या काळात व्यापारतूट ३८०९ कोटी रुपयांवरून १६३२५ कोटी रुपयांपर्यंत वाढली. सन १९९३-९४ साली मागील वर्षाच्या तुलनेत व्यापारतूट कमी झाली होती.

३) सन १९९६-९७ ते सन १९९९-२००० या काळात व्यापारतूट ३६,१८२ कोटी रुपयांवरून ५५,६७५ कोटी रुपयांपर्यंत वाढली.

४) सन २०००-०१ ते २००४-०५ या पाच वर्षांत व्यापारतूट २७,३०२ कोटी रुपयांवरून १,२५,७२५ कोटी रुपयांपर्यंत वाढली. या पाच वर्षांत व्यापारतुटीत चौपटीपेक्षाही जास्त वाढ झाली.

५) सन २००५-०६ ते २००९-१० या पाच वर्षांच्या काळात व्यापारतुटीत अडीचपटीपेक्षाही जास्त वाढ झाली.

६) सन २०१०-११ ते २०१४-१५ या पाच वर्षांच्या काळात आंतरराष्ट्रीय व्यापारतुटीत दीडपटीपेक्षाही

**तक्ता क्र. १ : सन १९९१ नंतर भारताच्या विदेशी व्यापाराचे आकारमान आणि व्यापारतूट**

(आकडे कोटी रुपये)

| अ.क्र. | वर्ष | निर्यात | आयात | एकूण व्यापार | व्यापारतूट |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९९०-९१ | ३२५५८ | ४३१९३ | ७५७५१ | -१०६३५ |
| २ | १९९१-९२ | ४४०४२ | ४७८५१ | ९१८९३ | -३८०९ |
| ३ | १९९२-९३ | ५३६८८ | ६३३७५ | ११७०६३ | -९६८७ |
| ४ | १९९३-९४ | ६९७५१ | ७३१०१ | १४२८५२ | -३३५० |
| ५ | १९९४-९५ | ८२६७४ | ८९९७१ | १७२६४५ | -७२९७ |
| ६ | १९९५-९६ | १०६३५३ | १२२६७८ | २२९०३१ | -१६३२५ |
| ७ | १९९६-९७ | २०९०१८ | २४५२०० | ४५४२१८ | -३६१८२ |
| ८ | १९९७-९८ | १३०१०१ | १५४१७६ | २८४२७७ | -२४०७५ |
| ९ | १९९८-९९ | १३९७५३ | १७८३३२ | ३१८०८५ | -३८५७९ |
| १० | १९९९-२००० | १५९५६१ | २१५२३६ | ३७४७९७ | -५५६७५ |
| ११ | २०००-०१ | २०३५७१ | २३०८७३ | ४३४४४४ | -२७३०२ |
| १२ | २००१-०२ | २०९०१८ | २४५२०० | ४५४२१८ | -३६१८२ |
| १३ | २००२-०३ | २५५१३७ | २९७२०६ | ५५२३४३ | -४२०६९ |
| १४ | २००३-०४ | २९३३६७ | ३५९१०८ | ६२२४७५ | -६५७४१ |
| १५ | २००४-०५ | ३७५३४० | ५०१०६५ | ८७६४०५ | -१२५७२५ |
| १६ | २००५-०६ | ४५६४१८ | ६६०४०९ | १११६८२७ | -२०३९९१ |
| १७ | २००६-०७ | ५७१७७९ | ८४०५०६ | १४१२२८५ | -२६८७२७ |
| १८ | २००७-०८ | ५६५८६४ | १०१२३१२ | १६६८१७६ | -३५६४४८ |
| १९ | २००८-०९ | ८४०७५५ | १३७४४३६ | २२१५१९१ | -५३३६८१ |
| २० | २००९-१० | ८४५५३४ | १३६३७३६ | २२०९२७० | -५१८२०२ |
| २१ | २०१०-११ | ११३६९६४ | १६८३४६६ | २८२०४१८ | -५४६५०२ |
| २२ | २०११-१२ | १४६५९५९ | २३४५४६३ | ३८११३६० | -८७९५०३ |
| २३ | २०१२-१३ | १६३४३१८ | २६६९१६१ | ४३०२६५९ | -१०३४८४३ |
| २४ | २०१३-१४ | १९०५०११ | २७३५४७४ | ४६२०४८५ | -८१०४६२ |
| २५ | २०१४-१५ | १८९६३४८ | २७३६६७६ | ४६३३०१४ | -८४०३२८ |
| २६ | २०१५-१६ | १७१६३८४ | २४९०३०३ | ४१९८७६५ | -७७३९१९ |
| २७ | २०१६-१७ | १८४९४३३ | २५७७६७१ | ४४१७८४७ | -७२८२३७ |
| २८ | २०१७-१८ | १९५६५१४ | ३००१०२८ | ४९५७२२९ | -१०४४५१४ |
| २९ | २०१८-१९ | २३०७७२६ | ३५९४६७४ | ५९०२३४५ | -१२८६९४८ |
| ३० | २०१९-२० | २२१९८५४ | ३३६०९५४ | ५५८०७०८ | -११४११०० |
| ३१ | २०२०-२१ | २१५९०४३ | २९१५९५७ | ५०७४९८७ | -७५६९१४ |
| ३२ | २०२१-२२ | ३१४७०२१ | ४५७२७७० | ७७१९६५५ | -१४२५७४९ |
| ३३ | २०२२-२३ (एप्रिल ते सप्टें.) | १५३४९०० | २४९५४४७ | ४०३०१०७ | -९६०५४६ |

(सदर्भ: भारत सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या वेब पोर्टलवरील सांख्यिकीय माहिती दिनांक-१०/१०/२०२२.
लिंक- https://tradestat.commerce.gov.in/eidb/iecnttopnq.asp)

जास्त वाढ झाली.


७) सन २०१५-१६ ते २०१९-२० या पाच वर्षांत आंतरराष्ट्रीय व्यापारतुटीतसुद्धा दीडपट वाढ झाल्याचे आढळते.

८) सन २०२०-२१ या काळात मागील वर्षाच्या तुलनेत आंतरराष्ट्रीय व्यापारात घट झाली. त्यामुळे व्यापारतूटसुद्धा घटली. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे जागतिक कोरोना महामारी होय.

९) सन २०२१-२२ या काळात भारताची आयात-निर्यात आणि एकूणच व्यापारतूटसुद्धा मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसून येते. कोरोना काळात कमी झालेला आंतरराष्ट्रीय व्यापार वेगाने वाढला.

१०) एकंदरीत आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आकारमान वेगाने वाढत निघाले आहे. परिणामी, व्यापारतूट वाढत आहे. ही बाब अधिक चिंताजनक आहे.

**आकृती क्र. १**




आकृती क्र. १ वरून असे दिसून येते की, सन २००३-०४ पासून भारताच्या व्यापारतुटीत वाढ होत निघाली आहे. सन २०१५-१६ साली आयात आणि निर्यात मागील वर्षाच्या तुलनेत घटलेली दिसून येते. परंतु पुढे त्यामध्ये सतत वाढ होत आहे. सन २०१८-१९ पासून पुन्हा आयात आणि निर्यातीत घट होताना दिसत आहे. सन २०१८-१९ साली आंतरराष्ट्रीय व्यापारतूट मात्र इतर वर्षांपेक्षा जास्त असलेली दिसून येते. सन २०२० मध्ये कोविड-१९ च्या जागतिक महामारीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आकारमान घटले आहे. परंतु व्यापारतूट मात्र जास्त असलेली दिसून येते. कोरोना महामारीच्या दोन लाटा झाल्यानंतर मात्र आंतरराष्ट्रीय व्यापारात वेगाने वाढ झालेली दिसून येत आहे. या काळात निर्यातीपेक्षा आयातीमध्ये अधिक वेगाने वाढ होऊन व्यापारतूट वाढण्याची प्रवृत्ती पाहावयास मिळत आहे. सन २०२१-२२ साली आयात

आणि निर्यात वरच्या पातळीवर स्थिरावलेली दिसून येत आहे. एकंदरीत व्यापाराचे आकारमान वाढत असून, आयात आणि निर्यातीमधील अंतर अधिकच वेगाने वाढताना दिसून येत आहे.

**१.३.२. सन १९९१ नंतरच्या तीन दशकांतील भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आकारमान:**

सन १९९१ नंतर भारतात खऱ्या अर्थाने जागतिकीकरणाला सुरुवात झाली. आज भारताने नवीन आर्थिक धोरण स्वीकारून तीन दशकांचा काळ ओलांडला आहे. सन १९९१ ते २००० हे प्रथम दशक तर सन २००१ ते २०१० दुसरे दशक आणि सन २०११ ते २०२० हे तिसरे दशक होय. या तीन दशकांतील आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आकारमान व व्यापारतूट तक्ता क्र. २ मध्ये सविस्तर दिली आहे.

**तक्ता.क्र. २ : सन १९९१ नंतरच्या तीन दशकांतील भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आकारमान**

(आकडे कोटी रुपयात)

| दशक | निर्यात | आयात | एकूण व्यापार | व्यापारतूट |
|---|---|---|---|---|
| दशक - १ (१९९०-९१ ते १९९९-२०००) | १०२७४९९ | १२३३११३ | २२६०६१२ | -२०५६१४ |
| दशक - २ (२०००-०१ ते २००९-१०) | ४६१६७८३ | ६८८४८५१ | ११५६१६३४ | -२१७८०६८ |
| दशक - ३ (२०१०-११ ते २०१९-२०) | १८०८८५११ | २७१९४८७० | ४५२४४८३० | -९०८६३५६ |

सदर्भ: संशोधकाने संकलित केलेल्या माहितीच्या आधारे.

तक्ता क्र. २ वरून पुढील निष्कर्ष निघतात.

१) सन १९९१ ते २००० या पहिल्या दशकात एकूण निर्यात १०२७४९९ कोटी रुपये तर आयात १२३३११३ कोटी रुपये इतकी होती. एकूण व्यापार २२६०६१२ कोटी रुपये, तर व्यापारतूट २०५६१४ कोटी रुपये होती.

२) सन २००१ ते २०१० या दुसऱ्या दशकात निर्यात ४६१६७८३ कोटी रुपये तर आयात ६८८४८५१ कोटी रुपये होती. एकूण व्यापार मागील दशकाच्या तुलनेत ५१ टक्क्यांनी वाढला तर व्यापारतूट १०.५ टक्क्यांनी वाढली.


३) सन २०११ ते २०२० या तिसऱ्या दशकात व्यापारातील वाढ मागील दोन्ही दशकापेक्षा सर्वाधिक असलेली दिसून येते. परंतु व्यापारतूट मात्र वेगाने वाढत आहे.


आकृती क्र. २ वरून असे दिसून येते की, प्रथम आणि द्वितीय दशकापेक्षा तिसऱ्या दशकात निर्यात आणि आयात या दोहोंमध्ये वेगाने वाढ होते आहे. आयातीपेक्षा निर्यात मात्र अधिक वेगाने वाढत आहे. सतत निर्यात वक्र हा आयात वक्राच्या वरच्या बाजूला असलेला दिसून येतो.

**१.३.३. सन १९९१ नंतरच्या तीन दशकांतील भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील व्यापारतूट:**

सन १९९१ ते २०२० या तीन दशकांत भारताच्या व्यापारतुटीत वाढ झाल्याची दिसून येते. प्रथम दशकात व्यापारतूट २०५६१४ कोटी रुपये होती. दुसऱ्या दशकात २१७८०६८ कोटी रुपये इतकी झाली. एकंदर तिसऱ्या दशकात व्यापारतूट मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसून येते. आकृती क्र. २ मध्ये ही बाब सविस्तर दर्शविली आहे.

आकृती क्र. २


सन १९९१ नंतरच्या तीन दशकातील निर्यात-आयात व्यापार (कोटी रुपयात)
30000000
25000000
20000000
15000000
10000000
5000000
0
दशक - 1
दशक - 2
दशक - 3
निर्यात
आयात


सन १९९१ नंतरच्या तीन दशकातील व्यापार तुट
0
-1000000
-2000000
-3000000
-4000000
-5000000
-6000000
-7000000
-8000000
-9000000
-10000000
कोटी रुपयात
दशक - १
दशक - 2
दशक - 3
व्यापार तुट

एकंदरीत सन १९९१ला नवीन आर्थिक धोरण स्वीकारून तीन दशके झाली. तिसऱ्या दशकांत व्यापारतूट सर्वाधिक वाढलेली दिसून येते. दीर्घकाळाचा विचार केल्यास भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार सतत तुटीचा राहाणे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहे. सन २०११ ते २०२० या काळात व्यापारतूट प्रचंड वेगाने वाढली आहे. ही बाब भविष्यकाळात अर्थव्यवस्थेला धोकादायक ठरू शकते. त्यामुळे व्यापारतूट नियंत्रणात आणणे अत्यंत गरजेचे आहे.

**१.४. भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील सर्वाधिक हिस्सा असणारी अनुक्रमे प्रथम पंचवीस राष्ट्रे :**

भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील सन १९९७-९८, २००१-०२, २०११-१२, २०२१-२२ आणि २०२२-२३ (एप्रिल ते ऑगस्ट) या कालावधीतील सर्वाधिक हिस्सा असणारी अनुक्रमे प्रथम पंचवीस राष्ट्रांचे विश्लेषण तक्ता क्र. ३ मध्ये दिले आहे. मागील तीन दशकांत भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार कोणत्या देशाशी कशाप्रकारे बदलत गेला ते दिसून येते.

आर्थिक उदारीकरणाच्यानंतर तीन दशकांतील भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या बाबतीत एकूण विदेशी व्यापार आकारमान सर्वाधिक असणाऱ्या अनुक्रमे प्रथम पंचवीस राष्ट्रांचा तक्ता क्र. ३ दिला आहे. सदरच्या तक्त्यावरून विविध निष्कर्ष निघतात ते पुढीलप्रमाणे आहेत-

१. सन १९९७-९८ साली भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात यु.एस.ए.शी हिस्सा सर्वाधिक होता. सन २००१-०२ मध्ये तो व्यापार दुसऱ्या क्रमांकावर, तर २०११-१२ मध्ये तो प्रथम क्रमांकावर आला आहे. म्हणजे भारताचा सर्वाधिक व्यापार यु.एस.ए. देशांशी होत आहे.
२. यु.के. शी (युनायटेड किंग्डम) भारताचा व्यापार सन १९९७-९८ साली दुसऱ्या क्रमांकावर सन २००१-०२ साली तिसऱ्या क्रमांकावर तर २०११-१२ साली १९ व्या क्रमांकावर सन २०२१-२२ आणि २०२२-२३ (एप्रिल ते सप्टें.) साली अनुक्रमे सतराव्या क्रमांकापर्यंत घसरत गेलेला दिसून येतो. म्हणजे भारताचा यु.के.शी व्यापार आकारमान कमी होताना दिसत आहे.
३. तक्ता क्र. ३ मध्ये दाखविलेल्या कालखंडात जर्मनी आणि जपान याही देशांशी भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार घटताना दिसून येत आहे.
४. उदारीकरणानंतरच्या तीन दशकांत भारताचा चीनशी व्यापार वाढताना दिसून येत आहे. सन १९९७-९८ मध्ये चीनचा तेरावा क्रमांक होता. तो सन २००१-०२ साली दहावा क्रमांक झाला. सन २०११-१२ साली प्रथम क्रमांक तर सन २०२१-२२ साली दुसरा क्रमांक होता.
५. अरब अमिराती देशाशी भारताचा व्यापार वाढत आहे.
६. स्वित्झर्लंडशी भारताचा व्यापार कमी होताना दिसत आहे.
७. सौदी अरबशी भारताचा व्यापार वाढताना दिसून येत आहे.
८. इंडोनेशियाशी भारताचा व्यापार वाढताना दिसून येत आहे.
९. सिंगापूर आणि दक्षिण आफ्रिकेशी भारताचा व्यापार मागील तीन दशकांत वाढताना दिसून येत आहे.
१०. हाँगकाँगशी सर्वसाधारण कायम असलेला दिसून येतो.

**१.५. भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारतुटीची समस्या दूर करण्यासाठी उपाय:**

भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची तूट कमी करण्यासाठी सरकार वेळोवेळी उपाययोजना करीत आहे. परंतु ते काळाच्या ओघात निरूपयोगी ठरतात. व्यापारतूट नियंत्रणात आणण्यासाठी काही उपाय सांगता येतील.

**तक्ता.क्र. ३ : सन १९९१ नंतरच्या तीन दशकांतील भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील सर्वाधिक हिस्सा असणारी अनुक्रमे प्रथम पंचवीस राष्ट्रे**

| अ.क्र. | १९९७-९८ | २००१-०२ | २०११-१२ | २०२१-२२ | २०२२-२३ (एप्रिल ते ऑगस्ट) |
|---|---|---|---|---|---|
| १. | यु.एस.ए. | अनिर्दिष्ट | चीन | यु.एस.ए. | यु.एस.ए. |
| २. | यु.के. | यु.एस.ए. | अरब अमिराती | चीन | चीन |
| ३. | जर्मनी | यु.के. | यु.एस.ए. | अरब अमिराती | अरब अमिराती |
| ४. | जपान | बेल्गीम | सौदी अरब | सौदी अरब | सौदी अरब |
| ५. | बेल्गीम | जर्मनी | स्वित्झर्लंड | इराक | इंडोनेशिया |
| ६. | पेट्रोल उत्पादक देश | जपान | सिंगापूर | सिंगापूर | इराक |
| ७. | अरब अमिराती | अरब अमिराती | जर्मनी | हाँगकाँग | रशिया |
| ८. | स्वित्झर्लंड | स्वित्झर्लंड | हाँगकाँग | इंडोनेशिया | सिंगापूर |
| ९. | सौदी अरब | हाँगकाँग | इंडोनेशिया | कोरिया | ऑस्ट्रेलिया |
| १०. | हाँगकाँग | चीन | इराक | ऑस्ट्रेलिया | हाँगकाँग |
| ११. | इटली | सिंगापूर | जपान | जर्मनी | कोरिया |
| १२. | ऑस्ट्रेलिया | इटली | ऑस्ट्रेलिया | स्वित्झर्लंड | जर्मनी |
| १३. | चीन | मलेशिया | कुवैत | जपान | नेदरलँड |
| १४. | सिंगापूर | दक्षिण आफ्रिका | बेल्गीम | बेल्गीम | मलेशिया |
| १५. | मलेशिया | फ्रान्स | नायजेरिया | मलेशिया | दक्षिण आफ्रिका |
| १६. | रशिया | ऑस्ट्रेलिया | कोरिया | बांग्लादेश | जपान |
| १७. | फ्रान्स | कोरिया | अनिर्दिष्ट | यु.के. | यु.के. |
| १८. | कोरिया | इंडोनेशिया | इराण | दक्षिण आफ्रिका | बेल्गीम |
| १९. | नायजेरिया | रशिया | यु.के. | नेदरलँड | कतार |
| २०. | नेदरलँड | नेदरलँड | दक्षिण आफ्रिका | थायलंड | थायलंड |
| २१. | इंडोनेशिया | सौदी अरब | कतार | कतार | ब्राझील |
| २२. | कुवैत | कॅनडा | मलेशिया | नायजेरिया | स्वित्झर्लंड |
| २३. | दक्षिण आफ्रिका | बांग्लादेश | नेदरलँड | व्हिएतनाम | बांग्लादेश |
| २४. | तैवान | थायलंड | ब्राझील | इटली | ओमान |
| २५. | कॅनडा | तैवान | इटली | रशिया | कुवैत |

(संदर्भ: भारत सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या वेब पोर्टलवरील सांख्यिकीय माहिती दिनांक-१०/१०/२०२२. लिंक- https://tradestat.commerce.gov.in/eidb/iecnttopnq.asp)

त्यांचे वर्गीकरण दोन गटात केले जाते. ते खालीलप्रमाणे-

**अ) निर्यात वाढीस प्रोत्साहन:**

भारताची आंतरराष्ट्रीय व्यापारतूट कमी करण्यासाठी निर्यात वाढीसाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. त्यासाठी सरकारने विविध निर्यात-आयात धोरणांच्या माध्यमातून उपाययोजना वेळोवेळी केलेल्या आहेत. ढोबळमानाने काही उपाययोजना आपणास सुचविता येतील.

१) व्यापार व सेवांच्या परदेशी व्यापारासाठी स्थिर आणि टिकाऊ धोरण वातावरण प्रदान करणे गरजेचे आहे. त्यामुळे निर्यात करताना व्यापाऱ्यांना उत्पन्नाची शाश्वती मिळेल.

२) निर्यातीस चालना देण्याच्या उद्देशाने भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांना जागतिक स्पर्धात्मकता मिळून देणे.

३) भारताच्या निर्यातीस चालना देण्यासाठी निर्यातीत विविधता आणणे.

४) निर्यातीसाठी अर्थव्यवस्थेतील उद्योग शेती सेवा आणि व्यापार क्षेत्रांना पायाभूत सुविधा पुरविणे.

५) मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया आणि कौशल्य भारत यासारख्या उपक्रमांच्या साहाय्याने निर्यात प्रोसाहन देणे.

६) निर्यात संवर्धन मिशनची प्रभावी अंमलबजावणी करणे.

**ब) आयात पर्यायीकरण:**

आयात पर्यायीकरणाचे विविध उपाय अवलंबणे गरजेचे आहे. त्यामध्ये काही उपाय आपणास सुचविता येतील.

१) आयातीचे तर्कसंगत आणि व्यापारातील असंतुलन कमी करण्यासाठी नियमित मूल्यमापनासाठी यंत्रणा पुरविणे.

२) मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया आणि कौशल्य भारत यासारख्या उपक्रमांच्या साहाय्याने आयात पर्यायीकरण करणे.

३) आत्मनिर्भर भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करून आयात पर्यायीकरण करणे.

४) स्वदेशी वस्तूंचा वापर ही लोकचळवळ बनवणे.

**१.६. सारांश:**

एकंदरीत भारताचा व्यापार हा ऋणात्मक असलेला दिसतो. भारताच्या आर्थिक विकासात आंतरराष्ट्रीय व्यापार अत्यंत महत्त्वाचा आहे. म्हणजेच येण्यापेक्षा भारताचे देणेच अधिक किंवा वाढत निघाले आहे. भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात सतत तूट आहे. तसेच व्यापारतूट वाढत आहे. उदारीकरणानंतरच्या तीन दशकांचा विचार केल्यास गेल्या दशकात व्यापारतूट वेगाने वाढली आहे. यासाठी त्यावर वेळीच उपाययोजना करून आत्मनिर्भर भारत बनविणे अत्यंत गरजेचे आहे. यात आपल्या सर्वांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**१.७. संदर्भसूची :**


१) Bhagwati J. (1981), "International Trade Slelected Realing', Cambridge University Press Mass.

२) Datt, Mahajan (2015), "Indian Economy' S. Chand Co. Ltd. New Delhi.

३) Economic Survey of India 2018-19, Volume- 12.

४) https://commerce.gov.in/international-trade/sixth-trade-policy-review-of-india/(Dated-10/10/2022)

५) https://tradestat.commerce.gov.in/eidb/iecnttopnq.asp (Dated-10/10/2022)

६) https://www.dgft.gov.in/CP/?opt=dgft-organization (Dated-10/10/2022)


◆

# होमो ड्युस (Homo Deus)

**शि. ना. माने** †

अर्थसंवादच्या जुलै-सप्टेंबर २०२१ च्या अंकात आपण स्मिथ यांच्या इकॉनॉमिक मॅन (अर्थपरायण पुरुष), होमो सॅपियन्स व होमो ड्युस अशा तीन टप्प्यांचा उल्लेख केला. आता होमो ड्युस या तिसऱ्या टप्प्यातील संज्ञेचा विस्ताराने विचार करू.

२१व्या शतकातील तंत्रविज्ञानाने एक चमत्कार घडविला. कवी कल्पनेचे (Fiction) तथ्यात रूपांतरण केले. 'सायन्स फिक्शन' या नव्या संज्ञेला मूर्त रूप दिले. तथाकथित संधिसाधुला (Homosapiens) बढती मिळवून दिली. संगणित्रचलित उपकरण प्रणालीने (Computer algorithms) यंत्रमानवाचे नर्व पर्व शक्य झाले. विज्ञान व कवि कल्पना यांच्यातील तफावत दूर झाली. विदा (Data) व औद्योगिक अभिकल्प (Design) यांच्या माध्यमातून नव-प्रज्ञाचलित एका नव्या सजीवाचा अमल (अंमल नव्हे) शक्य झाला. त्याचे दूरगामी परिणाम झाले. त्यापैकी एक परिणाम म्हणजे होमो ड्युस ही संज्ञा, तिच्याविषयी सखोल चर्चा ऑक्सफर्डचे संशोधक कार्ल बेनेडिक्ट फ्रे व मायकेल अे. ऑस्नोर्न यांनी केली आहे. ''द फ्युचर ऑफ अनएम्प्लॉयमेंट'' (२०१३) प्रसिद्ध करून अमेरिकेतील निवडक ४७ व्यवसायांवर यंत्रचलित उपकरण प्रणालीचे कोणते परिणाम संभवतात याविषयी निष्कर्ष काढले. त्यासाठी त्यांनी २०१३ ते २०३३ हा कालखंड निवडला. येथे एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. आतापर्यंतच्या अर्थपरायण पुरुष व संधिसाधु यांच्या जगात रोजगारीला अग्रस्थान देण्यात आले. आजच्या होमो ड्युस यांच्या युगात बेकारीला प्राथमिकता देणे भाग आहे. त्याची कारणे आहेत, निवडलेल्या ४७ व्यवसायांना, निदान सुरुवातीच्या काळात, बेकारीच्या मोठ्या जोखमीला तोंड द्यावे लागणार आहे. उदाहरण म्हणून ४७ पैकी पुढील काही व्यवसायनिहाय बेकारीविषयी माहितीचा उल्लेख करू :

| **व्यवसाय** | **टक्केवारी** |
|---|---|
| दूर बाजार व्यवसायी व विमा हमीदार | ९९ |
| क्रीडा पंच | ९८ |
| रोकडपाल | ९७ |
| खानावळ / स्वयंपाकी | ९६ |
| खान-पान गृहातील वाढपी | ९४ |
| विधीसल्लागार | ९४ |
| पर्यटन वाटाडे | ९१ |
| बेकरीतील पाव भाजक | ८९ |

पुढे चालू

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, निवृत्त प्राध्यापक, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा.
आजीव सभासद क्र.१०८, भ्रमणध्वनी : ७७३८३५६७८१

| | |
|---|---|
| बस चालक | ८९ |
| बांधकाम मजूर | ८८ |
| पशुवैद्यक सहायक | ८६ |
| सुरक्षा रक्षक | ८४ |
| नाव वाहक (नावाडे) | ८३ |
| बारवाले | ७७ |
| सुतारकाम | ७२ |

अर्थात, हे आकडे संभवनीयता दर्शक आहेत. प्रत्यक्षात जुन्या व्यवसायांची जागा पर्यायी व्यवसाय घेणार. त्यांच्यात निर्मितीक्षम व कुशल कर्मचाऱ्यांची गरज भासणार. या संदर्भात युवल नोटाहरारि त्यांच्या प्रक्षोभक पुस्तकात म्हणतात त्याप्रमाणे कळीचा प्रश्न नोकऱ्या निर्मितीचा नाही. किमान संगणित्रचलित उपकरण प्रणाली एवढ्या कार्यदक्षतेने काम करणाऱ्या कुशलकर्मचाऱ्यांचा ताबडतोब पुरवठा कसा करावयाचा हा खरा कळीचा प्रश्न आहे. नव्या नोकऱ्या, नवे मनुष्यबळ हा या युगाचा मंत्र आहे. हा संशोधकद्वयांचा निष्कर्ष आहे.

अशा प्रकारे एका बाजूला अर्थशास्त्रज्ञांच्या परिभाषेत 'रोजगाररहित वृद्धी' होते. ही झाली तोट्याची बाजू. दुसऱ्या बाजूला संसाधनांचा अपव्यय, संप, रस्ते वाहतूक अपघात, श्रम व वेळ यांचा दुरुपयोग यांना फाटा दिला जातो. ही झाली फायद्याची बाजू. 'कैद्यांच्या शृंगापत्तीचा' (Prisoners Ditemma) प्रश्न म्हणून तो प्रसिद्ध आहे. त्या प्रश्नांचा रोजमेळ कसा घालावयाचा? या प्रश्नांची सविस्तर चर्चा करण्याची ही जागा नव्हे. तरी परंतु तडजोडीच्या नियमानुसार एक गोष्ट मान्य करावी लागते. नवी तंत्रविद्या जरूर प्रश्न निर्माण करते. परंतु त्याचबरोबर ती प्रश्न सोडविण्याचा उपायही देते, ते असो.

आता होमो ड्युस या संज्ञेची व्युत्पत्ती व तिचा मराठी पर्याय यांचा विचार करू. हा शब्द ऑक्सफर्ड डिक्शनरीच्या २००६ पर्यंतच्या आवृत्तीत उपलब्ध नाही. मात्र deus ex machina हा मूळ लॅटिन जोडशब्द उपलब्ध आहे. त्याचा उपयोग करू. An unexpected event saving a seemingly hopeless situation (God from the machinery). त्याचा अनुवाद पुढे दिला आहे. होमो सॅपियन्सच्या काळातील निराशावादी स्थितीपासून सुटका करणारी अनपेक्षित गोष्ट (यंत्रोद्‌भव परमेश्वर). युवल नोहा हरारि त्यांच्या Homo Deus (२०१६) पुस्तकात पुढील खुलासा करतात. होमो ड्युस म्हणजे होमो सॅपियन्स प्राण्यांचे प्रवर्तन किंवा पदोन्नती होय. तो स्वभावतः यंत्रोद्‌भव भल्यासाठी आहे. म्हणजे तो होमो सॅपियन्सची सुधारित स्थिती होय, असे म्हणता येईल. त्यांच्यामुळे माणसांच्या जीवनात अभूतपूर्व चमत्कार घडत आहेत. मृत्यू हा दैवी प्रकोप नसून तो प्राणीशास्त्रीय अभियांत्रिकीचा विषय आहे. हृदयाच्या स्नायुंना होणारा रक्तपुरवठा बंद पडणे म्हणजे मृत्यू होय. आज तो पूर्ववत सुरू करणे शक्य झाले. कर्करोगाचे झेल्स केमोथेरपी व नॅनो-रोबो यांच्या साहाय्याने त्या मारणे शक्य झाले. दुष्काळ व युद्ध यांच्यापेक्षा शुगर, सॉल्ट व स्टार्च (थ्री एस्) यांच्या अतिरिक्त सेवनाने मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. आतापर्यंत दुष्काळ ही आर्थिक समस्या होती. आता तो होमो ड्युस यांच्यापुढील प्रश्न झाला आहे. असा हा होमो ड्युस माणसांच्या जीवनात सर्वत्र संचार करतो. तसा तो सर्वज्ञ आहे. त्याच्यासाठी विश्वात्मक महामानव हा पर्याय सुचवू इच्छितो.

युवल नोहा हरारि यांच्यासारख्या भाष्यकाराने होमो ड्युसचे चित्र रेखाटले. माझ्या आकलनानुसार मी त्याचे एका मर्यादित हेतुने आरेखन केले. त्यात त्रुटी राहाण्याची शक्यता नाकारता येत नाही. ...उणें तें मज देइजे... या उदार दृष्टिकोनातून त्याचा वाचकांनी विचार करावा, अशी विनंती.

✻ सदरच्या चर्चेसाठी युवल नोहा हरारि यांच्या होमो ड्युस (अ ब्रीफ हिस्टरी ऑफ टुमारो) पेंग्विन रँडम हाऊस यु. के., २०१६ या पुस्तकाचा आधार घेतला आहे.

◆

**अर्थ शब्दांची वाट पाहे...**

# मूनलाईट - चोर रोजगार, हायडोपोनिक्स - जलशेती, एरोपोनिक्स - वातशेती

**जे. एफ. पाटील** †

या टिप्पणात तीन शब्दांची चर्चा केली आहे.

१) मूनलाईटिंग (Moonlighting) - चोर रोजगार

२) हायड्रोपोनिक्स (Hydroponics) - जलशेती

३) एरोपोनिक्स (Aeroponics) - वातशेती

**१) मूनलाईटिंग** (Moonlighting) **चोर-रोजगार :**

श्रम बाजारात काही अपवादात्मक गोष्टी घडत असतात. त्यापैकी एक म्हणजे नोकरदारांच्यामध्ये विशेषत: कमी पगाराच्या व जास्त जबाबदारीच्या नोकरामध्ये नेहमीच्या नोकरीच्या कामाखेरीज, आजूबाजूला मिळणारे, अधिक उत्पन्नाचे काम, मूळ मालकाच्या (नियोक्त्याच्या) माहितीशिवाय करण्याची प्रवृत्ती दिसते.

अशा नियमित कार्यबाह्य रोजगाराला प्रच्छन्न रोजगार (Diguises) असा तांत्रिक शब्द देता येईल. नेहमीचा रोजगार कायदेशीर करारातून तयार होतो. पण प्रच्छन्न रोजगार त्या कराराबाहेर असतो. म्हणून याला 'चोर - रोजगार' असे नाव (Moonlighting) देता येईल. नियमित शिक्षकाने शिकविण्या घेणे, नियमित नोकरदार सुतार, गवंडी, लोहार, तंत्रज्ञ यांनी मोकळ्यावेळी खंडून काम घेणे, माहिती तंत्रविज्ञान कंपनीतील कुशल सेवकांना नोकरीबाह्य काम घेणे. टंकलेखकांनी नोकरीच्या बाहेर काम करणे, नोकरदार दिवाणजीने सुट्टीच्या दिवशी इतरांचे हिशोब लिहिणे ही सर्व चोर रोजगाराची उदाहरणे आहेत. जेव्हा वेतनावर आधारित सामाजिक संबंधात मालक-कामगार नाते निर्माण होते व कामगाराला श्रमाचे पर्याय बंद करण्यात येतात तेव्हा सक्तीचे श्रम निर्माण होतात.

माहिती तंत्रविज्ञान क्षेत्रात वेतन कालबद्ध प्रकल्पावर आधारित असते तेव्हा नियमित कामापेक्षा प्रकल्प संबंधित अधिक उत्पन्नाच्या रोजगाराचे महत्त्व वाढते. माहिती तंत्रविज्ञान क्षेत्रात वेतन ठरताना ३०-४५ % वेतन विक्री रकमेशी संलग्न असते. साहजिकच वेतनदर कमी होतात. परिणामी, या क्षेत्रात अनेक कर्मचारी चोर-रोजगार करतात. महामारीच्या काळात वेतनघट, कार्यस्थगिती, कामगार कपात अशा गोष्टी घडल्या. परिणामी, बहुतेक ज्येष्ठ कर्मचाऱ्यांनी पूरक रोजगार, प्रच्छन्न रोजगार म्हणजेच चोर-रोजगार करणे आवश्यक मानले.

थोडक्यात, इंग्रजीतील Moonlighting या शब्दासाठी मराठीत प्रच्छन्न रोजगार वा चोर रोजगार असा शब्द देणे योग्य ठरेल. कायद्याच्या मर्यादा लक्षात घेता त्याला चोर रोजगार म्हणणे अधिक सोपे व सयुक्तिक वाटते.

† माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष व विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद
आजीव सभासद क्र.६२, भ्रमणध्वनी : ९४२२०४६३८२, ई-मेल : jfpatil@rediffmail.com

**२) हायड्रोपोनिक्स - जलशेती**

काही पिके अधिक पाणी वापर करणारी असतात. काही पिकांच्या बाबतीत बीजधारणा, वाढ, फलधारणा यासाठी मुळाशी सतत पाणी, ओलावा, चिखल, दलदल असावी लागते. भातशेतीचा प्राथमिक काळ तसाच असतो. अजूनही अनेक ठिकाणी परसाच्या जागेत केळी करतात. त्याचे मुख्य कारण कायमचा चिखल, ओलावा, पाणी हेच असते. म्हणून हायड्रोपोनिक्सला दलदल शेती, चिखल शेती, जलशेती, असे पर्याय देता येतील. प्रस्तुत लेखकाच्या मते 'जलशेती' हा पर्याय अधिक थेट, सोपा व म्हणून योग्य वाटतो. यात पिकासाठी फक्त मातीचा वापर होत नाही.

**३) एरोपोनिक्स (Aeroponics) - वातशेती**

एरोपोनिक्सचा शब्दश: अर्थ हवेत पीक घेणे. अर्थात, वातशेती असा छोटा शब्द करता येईल. खरे तर, कंदमुळे सोडली तर सर्वच पिके हवेत तयार होतात. जे पीक हवेवर तरारते-वाढते त्याच्या बाबतीत एरोपोनिक्स हा शब्द वातशेती योग्य ठरतो. फक्त हवेतच पिकणारी पिके फारच अल्प असली पाहिजे. ज्या पिकांचे सत्व बुरशीचे असते ते हवेतील पीक म्हणता येईल. पण वातशेतीचे ठळक उदाहरण देता येत नाही. तांत्रिक कार्याने एरोपोनिक्स म्हणजे 'वातशेती' असा पारिभाषिक शब्द वापरता येईल.

◆

---

समस्या अशी आहे की उत्सर्जन उत्पादीत करणारे लोक त्या विशेषाधिकारांसाठी पैसे देत नाहीत आणि ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना मोबदला मिळत नाही.

**- विल्यम डी. बॉर्डहॉस**

---

**निवेदन : अर्थसंवाद**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

पुस्तक परिचय

# मुस्लीम विमेन इन इंडिया: एज्युकेशन अँड एक्सपोजर टू मीडिया

**सुभाष पाटील** †

Muslim Women In India: Education And Exposure To Media
(मुस्लीम विमेन इन इंडिया: एज्युकेशन अँड एक्सपोजर टू मीडिया),
लेखिका : डॉ. मलिका मिस्त्री,
प्रकाशक : Institute of Objective Studies, New Delhi,
प्रकाशन वर्ष : प्रथम आवृत्ती-२०२१, पृष्ठ संख्या : XV + २१२ , किंमत : रुपये ८९५/-
ISBN:978-93-91659-07-3

अर्थव्यवस्था कोणत्याही प्रकारची असो, विकसित अथवा विकसनशील. तिचा सर्वांगीण विकास हा त्या अर्थव्यवस्थेतील मानवी संसाधनाच्या गुणात्मकतेवर अधिकांश अवलंबून असतो आणि त्यात शिक्षण हाच निर्णायक घटक ठरतो. आज भारतीय अर्थव्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्थेतील महासत्तेच्या स्पर्धेत आहे. तसे पाहाता भारतीय अर्थव्यवस्था केवळ आर्थिकदृष्ट्याच नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही संमिश्र स्वरूपाची आहे. विविध धर्म, जाती, पंथ, परंपरा, भाषा, बोलीभाषा यासम सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, भौगोलिक, शैक्षणिक वैविध्यतेचे प्रतिबिंब भारतीय अर्थव्यवस्थेच्या साकलिक विकासावर होताना नक्कीच दृष्टिपथास येतो. एकूण मानव संसाधनातील ज्यांचा हिस्सा जवळपास निम्मा आहे (जनगणना अहवाल २०११ नुसार ४८.५ टक्के) असा महिला वर्गाचा उत्पादक कार्यातील प्रत्यक्ष सहभाग नाममात्र आहे. शिवाय धर्मनिहाय ही विभिन्नता प्रचंड जाणवते. डॉ. मलिका मिस्त्री यांचा गेल्या शतकाच्या अंतिम दशकापासून ते चालू शतकातील प्रारंभिक दोन दशकाच्या काळातील विशेषत: मुस्लीम महिलांमधील शिक्षणाचा अभ्यास हा एक अग्रगण्य शैक्षणिक प्रयत्न आहे. याचे मुख्य कारण म्हणजे आजही भारतीय समाजात सर्वसाधारणपणे भारतीय महिला विशेषत: मुस्लीम महिला हा उपेक्षित गट आहे. Institute of Objective Studies, New Delhi यांनी हा अभ्यास प्रायोजित करण्याचे एक बहुपयोगी काम केले आहे. प्रस्तुत अभ्यास मुख्यत: एकूण दहा प्रकरणांमध्ये विभागला असून सांख्यिकीय तसेच गुणात्मक प्रस्तुतीसाठी एकूण ७१ सारणी, ११० आलेख, प्रगल्भ संदर्भसूची आणि दोन परिशिष्टे यांची जोडणी लाभली आहे.

† प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख, एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, कर्वे पथ, पुणे.
आजीव सभासद क्रमांक : ११६०, भ्रमणध्वनी : ९८५०४३४५८९, ई-मेल: subhash.patil09@rediffmail.com

सदर अभ्यासात राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या १९९२-९३ ते २०१५-१६ या कालावधीतील एकूण चार (I ते IV) फेऱ्या आणि जनगणना अहवाल २००१ व २०११ या प्रमुख दोन स्रोतांवर आधारित अन्य धर्मांच्या तुलनेत मुस्लीम महिलांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक स्थितीसंबंधित विशेषतः शैक्षणिक मागासलेपणाचा दृष्टिकोन, साक्षरता दर, शाळेतील उपस्थिती, सामान्य नोंदणी प्रमाण (GER), शैक्षणिक प्राप्ती या संबंधित ठळक निष्कर्षांचे पद्धतशीरपणे संकलित आणि समीक्षकीय विश्लेषण केले आहे की, जे इतर सर्वेक्षणापेक्षा अधिक अचूक आहे.

लेखिका अभ्यासाची सुरुवात मुस्लीम समाजाची आर्थिक व सामाजिक स्थिती, त्यांची एकूण लोकसंख्या व त्यातील बदल आणि अन्य अल्पसंख्यांक समुदायाची स्थिती यापासून करतात. एकूण मुस्लीम लोकसंख्या विचारात घेता भारत जागतिक पातळीवर चौथ्या क्रमांकावर आहे. त्यांच्या मते, विस्तीर्ण दारिद्र्य केवळ अनुसूचित जातीजमातीमध्येच नाही, तर मुस्लीम समाजामध्येही आढळते. अन्य समुदायाच्या तुलनेत मुस्लीम महिलांची आर्थिक व सामाजिक स्थिती अत्यंत वाईट आहे. बहुतांश मुस्लीम शहरी भागात घर, पाणी, वीज आणि स्वच्छता या मूलभूत सुविधांशिवाय वस्ती आणि झोपडपट्ट्यामध्ये वास्तव्यास आहेत. शिवाय सामाजिक कठोरपणा आणि हिंसाचाराचा सातत्याने त्यांना सामना करावा लागतो. तसेच त्यांना सामाजिक सुरक्षा आणि राज्य कल्याणकारी योजनांचा मिळणारा लाभदेखील अत्यंत मर्यादित स्वरूपाचा आहे.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या १९९२-९३ ते २०१५-१६ या कालावधीतील एकूण चार ( I ते IV) फेऱ्याच्या अभ्यासावरून ठळक निष्कर्ष म्हणजे मुस्लीम महिलांचा शैक्षणिक स्तर सर्वात निम्न आहे. किंबहुना, मुस्लीम आणि बिगर मुस्लीम महिला जसजशा उच्च शैक्षणिक स्तरावर पोहचतात, तसतसे त्यांच्यातील शिक्षणाच्या पातळीतील दरी अधिकच रुंदावत जाते. २००१ आणि २०११ च्या जनगणनेची सांख्यिकीदेखील हेच प्रस्तुत करते. NFHSA I, II, III आणि IV मधील शिक्षणाच्या स्तरांबद्दलचे निष्कर्ष असे दर्शवतात की, सर्वच समुदायातील महिलांमध्ये याबाबत सकारात्मक प्रवृत्ती आहे. परंतु सकारात्मक प्रवृत्ती असूनही, मुस्लीम महिला इतर सर्व समुदायांच्या तुलनेत मागे आहेत.

लेखिकेच्या मते, मुस्लीम समाजात, विशेषतः महिलांच्या शिक्षणात अनेक घटक अडथळे आणतात. पत्नी आणि आई या भूमिकेसाठी महिला अधिक सुयोग्य असतात असा एक सामान्य समज बहुतेक कुटुंबांना मुलींना शाळा आणि महाविद्यालयांमध्ये दाखल करण्यापासून परावृत्त करतो. घरांपासून शाळा व महाविद्यालयाचे अंतर हे सामान्यतः मुलींची नोंदणी प्रतिबंधित करणारे घटक आहेत. मुस्लीमबहुल भागात शाळा आणि महाविद्यालयांचा अभावदेखील त्रासदायक ठरते. मुस्लीम विद्यार्थ्यांचे सरासरी वार्षिक गळतीचे प्रमाण ९.१ टक्के इतके असून ते सर्व सामाजिक समुदायांपेक्षा सर्वाधिक आहे. हिंदीबहुल राज्यातील मुस्लीम शैक्षणिकबाबतीत सर्वात मागे आहेत. अभ्यासात नमूद केल्याप्रमाणे, बिहार, उत्तर प्रदेश, झारखंड आणि मध्यप्रदेश या चार गरीब राज्यांमध्ये भारतातील १९६ दशलक्ष किंवा बहु-आयामी गरिबी निर्देशांक (Multi-dimensional Poverty Index) च्या अर्ध्याहून अधिक गरीब लोक आहेत. त्यामुळे या राज्यांमधील शैक्षणिक मागासलेपण हिंदूसमुदाय सोबतच मुस्लीमांमध्येही मोठ्या प्रमाणावर असल्याचे लक्षात येते. हरियाणा राज्यातील स्थिती आणखीच निराशाजनक आहे. या राज्यातील मुस्लीम समुदाय शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून सर्वात जास्त लांब आहेत. २०११ मधील मुस्लीम समुदायाचा साक्षरता दर आणि या राज्याचा सरासरी साक्षरता दर यामध्ये जवळपास २३ टक्के

अंतर आहे. याउलट केरळ आणि तामिळनाडूसारख्या राज्यांमध्ये साक्षरता, शाळांमधील उपस्थिती, नावनोंदणी आणि शैक्षणिक प्राप्ती याबाबत मुस्लीम महिला या हिंदू आणि ख्रिश्चन महिलांच्या बरोबरीने आहेत. कर्नाटक, राजस्थान, तेलंगणा, आंध्रप्रदेश या राज्यांमधील या बाबतीतले प्रमाण वाढत आहे. दर्जेदार शिक्षणाला चालना देण्यासाठी तेलंगणा सरकारने स्थापन केलेल्या विशेष शाळांचे हे चांगले परिणाम आहेत.

२०११च्या जनगणनेनुसार मुस्लीम लोकसंख्या साक्षरतेचा दर ५८%, हिंदू लोकसंख्या साक्षरता दर ६३%, ख्रिश्चन लोकसंख्या साक्षरता दर ७४.३%, साक्षरता दर शीख लोकसंख्या साक्षरता दर ६७.५% होता. उच्च शैक्षणिक प्राप्ती हा लोकांच्या गुणवत्तेचा अधिक मजबूत निर्देशांक आहे. केवळ २.८% मुस्लीम पदवीधर असल्याचे आढळले, की जे हिंदूच्या (६%) निम्मे आहे. जैन लोकसंख्येत २५.६% पदवीधर होते. ख्रिश्चन लोकसंख्येत हा आकडा ८.८% तर शीख लोकसंख्येत ६.४% होता. महिलांची अवस्था अजूनच वाईट आहे. पण चांगली बाब अशी आहे की, अलीकडच्या काळात, मुस्लीम महिला नागरी भागात त्यांच्या पुरुष सहकार्यांपेक्षा चांगले काम करत आहेत आणि उच्च शिक्षणात एकूणच समुदायासाठी नावनोंदणीचा वेग खूपच वाढला आहे.

मुस्लीम समाजातील स्वयंसेवी संस्थांचा पुढाकार आणि राज्य हस्तक्षेप यामुळे उत्साहवर्धक परिणाम मिळाले आहेत. अल्पसंख्याक-केंद्रित (MCDs) ९० जिल्ह्यांमध्ये जेथे पंतप्रधानांचा १५-सूत्री कार्यक्रम आणि बहू-क्षेत्रीय विकास कार्यक्रम (MSDP) सुरू करण्यात आले होते, तेथे मुस्लीम साक्षरता दर २००१ ते २०११ या कालावधीमध्ये ५२.४% वरून ६३.५% वर पोहोचला आहे. तथापि, मुस्लीम साक्षरतेच्या सरासरी दरातील अंतर याच जिल्ह्यात याच कालावधीत ४.२% वरून ४.५ पर्यंत वाढले. गेल्या पाच वर्षांत, मुस्लीम महिलांची नोंदणी ४६%ने वाढली, तर सर्व श्रेणींसाठी एकूण आकडेवारी २४% ने वाढली. मुस्लीम महिलांचे नोंदणी प्रमाण एकूण मुस्लीम नोंदणीचे सर्वसाधारण प्रमाणापेक्षा एक अंकाने जास्त आहे. उच्च शिक्षणासाठी नोंदणी केलेल्या मुस्लिमांपैकी ४९% महिला होत्या, तर सर्व समुदायांसाठी एकत्रित प्रमाण ४८% होते.

लेखिकेच्या मते, मुस्लीम विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची संख्या वाढली असली, तरी ती अपुरी आहे. शिवाय त्यांचे वितरणही विलंबाने होत आहे. अल्पसंख्यांकांशी संबंधित अधिकार आणि कायद्यांबद्दल जागरूकता, त्यांचा समावेश आणि शिक्षण लक्षात घेणे आवश्यक आहे. समाजाला एकत्रित करण्यासाठी व शिक्षणासाठी चैतन्यशील वातावरण निर्माण करण्यासाठी नागरी कृती केली पाहिजे. तेलंगणा अल्पसंख्याक निवासी शैक्षणिक संस्था योजनामुळे तेथील शिक्षण क्षेत्र आणि मुस्लिमांमधील शैक्षणिक स्तर बदलत असल्याचे लेखिका समाधानाने नमूद करतात. या नावीन्यपूर्णतेची संपूर्ण देशात पुनरावृत्ती केली जाऊ शकते. त्यांनी सच्चर समितीच्या कल्पनेचे कौतुक केले की विविधता निर्देशांक (Diversity Index) हा भारतीय समाजात तसेच मुस्लीम समाजातील प्रारंभिक दृष्टिकोन बदल मोजण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. मुस्लिमांचे विस्परण आणि जनतेने त्यांना स्वीकारल्याने त्यांना त्यांच्या वस्तीतून बाहेर पडण्यास प्रोत्साहन मिळेल. तसेच, सच्चर समितीने सुचविल्याप्रमाणे समान संधी आयोगाची स्थापना करणे आवश्यक आहे.

मीडिया एक्सपोजर संदर्भात, वर्तमानपत्राचे नियमित वाचन करणे, टी. व्ही. पाहाणे, रेडिओ ऐकणे, चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहाणे या बाबतीतली मुस्लीम महिलांची कामगिरी इतर समुदायांच्या तुलनेत खूपच सुमार आहे. हिंदू महिलांची कामगिरी त्यांच्यापेक्षा चांगली असली, तरी जैन आणि ख्रिश्चन महिलांपेक्षा खूपच मागे होती. १९९८-९९ मध्ये २०.२% हिंदू महिला आणि १७.२%

मुस्लीम महिला वर्तमानपत्रे आणि मासिके वाचत होत्या. ही टक्केवारी २०१५-१६ मध्ये अनुक्रमे २६.४ आणि २२ पर्यंत हळूहळू वाढली.

मुस्लीम समाज आणि मुस्लीम महिलांना इतर समाजाच्या बरोबरीने आणायचे असेल, तर त्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारला पाहिजे. सर्वसाधारणपणे मुस्लिमांच्या आणि विशेषतः मुस्लीम महिलांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी लेखिकेने काही ठळक शिफारसी केल्या आहेत. मुस्लीम समाजाने स्वतःच्या भल्यासाठीही काम केले पाहिजे, त्यांनी आधुनिक वैज्ञानिक शिक्षणाचे स्वागत केले पाहिजे. त्यांचा दृष्टिकोन इतर समुदायांसारखा असला पाहिजे. जसे की, शीख आणि ख्रिश्चन ज्यांना सूक्ष्म स्तरावर त्यांच्या समुदायाशी संबंधित असल्याची भावना आहे. समुदायाच्या नेत्यांनी मुस्लीम लोकांसाठी सरकारद्वारे राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांबद्दल स्वतःला परिचित केले पाहिजे आणि त्यांच्या प्रगतीचे नियमित निरीक्षण व परीक्षण केले पाहिजे. मुस्लीम विद्यार्थी बाहेर पडणार नाहीत, याची दक्षता घेतली पाहिजे. बहुतांश जण स्वयं-रोजगारीत असून युवा पिढीला रोजगार निर्मितीच्या दृष्टीने औद्योगिक व व्यावसायिक प्रशिक्षणाची नितांत गरज आहे. भारतीय समाजात मुस्लीम महिलांना स्पर्धात्मक बनवायचे असेल, तर एकत्रित आणि दीर्घकालीन प्रयत्न करून त्यांना उच्चशिक्षण देण्याची गरज आहे. मुस्लीम पुरुष आणि महिलांना काही बाबतीत सक्रियता प्रदान करणे आवश्यक आहे. जेणेकरून त्यांना जाणीव होईल की साक्षरता, शिक्षण आणि प्रसारमाध्यमांसमोर येणे हे त्यांचे हक्क आहेत आणि ते त्यांना सन्माननीय जीवन जगण्यास सक्षम बनवतील.

लेखिका मुस्लीम समुदायास ख्रिश्चन आणि शीख समुदायांच्या यशस्वी मॉडेलचे अनुकरण करण्यास सुचवतात की, ज्यांनी संबंधित समुदायांचे शैक्षणिक दर्जा उंचावण्यामध्ये जबरदस्त यश मिळवले आहे. साक्षरतेचा वेग वाढवण्यासाठी आणि समाजातील शिक्षणाचा दर्जा वाढवण्याच्या रणनीतीकडे लक्ष द्यावे लागेल. मुलींसाठी अधिक निवासी शाळा गरजेच्या असून, त्या सुरक्षितता आणि प्रवासाच्या कारणास्तव चिंता दूर करतील. शाळा गळतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची संख्या बरीच वर्षे शाळांमध्ये टिकवून ठेवण्यासाठी समाजाने सुधारात्मक उपाय योजण्याची नितांत गरज आहे. मुस्लीम महिलांना वाजवी कालावधीत इतर धर्मातील महिलांशी संपर्क साधण्यास सक्षम करण्याचा शिक्षणातील सकारात्मक कृती हा सर्वोत्तम मार्ग आहे. यासाठी स्पष्ट दृष्टी, भरपूर नियोजन, कठोर परिश्रम आणि मुस्लीम समुदायाच्या आणि त्यांच्या नेतृत्वाच्या मिशनरी आवेशाची आवश्यकता आहे.

सदर पुस्तकातील सविस्तर सामग्री प्रस्तुती, तत्सम सांख्यिकीय माहिती, त्याची प्रस्तुतता, आलेखीय मांडणी, अन्वयार्थ, संदर्भसूची या कारणांनी हे पुस्तक एक शैक्षणिक संशोधन पुस्तक ठरते की जे विद्यार्थी, शिक्षक, संशोधक, शिक्षणसंस्था आणि आम नागरिकांना नक्कीच उपयोगी ठरेल. एकूणच, मुस्लीम आणि बिगर -मुस्लीम महिलांबद्दल लोकसंख्याशास्त्रीय आणि सामाजिक-आर्थिक माहिती देण्याचा डॉ. मिस्त्री यांचा प्रयत्न भारतातील मुस्लीम महिलांना शैक्षणिक मुख्य प्रवाहात आणण्यास नक्कीच सहाय्यक ठरेल आणि विविध समुदायांच्या आणखी अनेक अभ्यासांचा मार्ग मोकळा करण्यास निश्चितच मदत करेल, यात शंका नाही.

◆

पुस्तक
परिचय

# पूर्वसुरींचे अर्थचिंतनः आर्थिक विचारांचा समृद्ध मागोवा

**माधव शिंदे** †

ग्रंथाचे नावः अर्थचिंतन एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील आर्थिक विचार
लेखकः डॉ. उत्तम पठारे
प्रकाशकः सनय प्रकाशन, नारायणगाव, पुणे.
वर्षेः २०२१
पृष्ठेः ४५६ किंमतः रु.६००/-
ISBN: 978-93-84600-73-0

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत प्रचंड दारिद्र्य, बेरोजगारी, महागाई यांसारख्या गंभीर, आर्थिक समस्या घेऊन स्वतंत्र झाला. या आर्थिक समस्या इतक्या गंभीर स्वरूपाच्या आहेत ज्या गेल्या ७५ वर्षांतही दूर करण्यात भारत सरकारला यश येऊ शकलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. काही शतके गुलामीत राहिलेल्या देशाची आजची मानसिकतादेखील गुलामगिरीचीच असल्याचे दिसून येते. म्हणजेच देश स्वतंत्र झाला. मात्र देशातील गुलामी प्रवृत्ती अजूनही मूळ धरून आहे, तर दुसरीकडे देशातून परकीय सत्ताधीश हद्दपार झाले असले, तरी जुलमी सरंजामशाही प्रवृत्ती अजूनही टिकून आहे. हेच खऱ्या अर्थाने ७५ वर्षांतील स्वतंत्र भारताच्या आर्थिक मागासलेपणाचे मूळ राहिलेले आहे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. खरे तर भारतावर परकीय आक्रमणे होण्यापूर्वी देशाची आर्थिक स्थिती उत्तम होती. भारतातून निघणारा धूरसुद्धा सोन्याचा असायचा असे म्हटले जाते. मात्र देशावर झालेल्या अनेक परकीय आक्रमकांनी केलेल्या लुटीमुळे देशाची आर्थिक स्थिती प्रचंड खालावली. एकेकाळी जगाच्या बाजारपेठेवर वर्चस्व असणारा देश परकीय सत्ताधाऱ्यांच्या शोषणामुळे आर्थिक समस्याग्रस्त बनला आहे. देशामध्ये निर्माण होणाऱ्या आर्थिक समस्यांमुळे देशाची अर्थव्यवस्था कमकुवत बनली. त्यासाठी देशावर राज्य केलेल्या परकीय सत्ताधाऱ्यांची आर्थिक धोरणे कारणीभूत राहिली आहेत. या परकीय सत्ताधाऱ्यांपैकी देशातील संपत्तीची सर्वाधिक लूट केली ती ब्रिटिशांनी. विशेषतः १९व्या शतकात ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी देशातील संपत्तीची केलेली लूट देशाच्या आर्थिक विकासावर दीर्घकालीन परिणाम करणारी ठरली आहे. हे होत असताना त्याला समाजातून विरोध झाला नाही असे नाही. या कालखंडात देशात विविध राजकीय-आर्थिक अभ्यासकांनी आपले विचार मांडत ब्रिटिश सत्तेकडून देशाच्या व महाराष्ट्राच्या होत असलेल्या लुटीवर प्रखर टीका करत देशातील आर्थिक समस्यांवर अभ्यासपूर्ण उपाययोजना सुचवलेल्या आहेत.

† सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर.
आजीव सभासद क्रमांक : १४३२, भ्रमणध्वनीः ९४२०४७०५३४, इमेल : madhavshinde.1@rediffmail.com

यामध्ये न्या. रानडे, दादाभाई नौरोजी, गोपाळ कृष्ण गोखले, आगरकर, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू, सयाजीराव गायकवाड यांसारख्या थोर विचारवंतांचा समावेश होतो. वास्तविकत: महाराष्ट्र वा देशाच्या १९व्या शतकातील आर्थिक स्थितीचे विचारमंथन करणारे साहित्य अतिशय तोकड्या स्वरूपात उपलब्ध आहे. त्यामुळे समाजासमोर तत्कालीन आर्थिक स्थितीचे चिंतन येत नाहीत. अशा प्रकारचे चिंतन अभ्यासकांसाठी, वाचकांसाठी उपलब्ध व्हावे, या दृष्टीने डॉ. उत्तम पठारे यांनी परिश्रम घेतले आहेत. अर्थचिंतन एकोणविसाव्या शतकातील महाराष्ट्रातील आर्थिक विचार या आपल्या अतिशय सुंदर, माहितीपूर्ण आणि वाचनीय अशा ग्रंथाची निर्मिती करून वाचकांसाठी १९व्या शतकातील आर्थिक स्थितीचे ज्ञान भांडार खुले करून दिले आहे. एकूण ४५६ पृष्ठांच्या या ग्रंथातून १९व्या शतकातील भारताच्या आर्थिक स्थितीचा आणि विचारमंथनाचा इतिहास उलगडण्यास मदत झाली आहे. भारताच्या व विशेषकरून महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा भविष्यकालीन अंदाज बांधण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या आर्थिक इतिहासाचा हा दस्तऐवज अभ्यासकांसाठी मोलाचा ठरणार आहे.

अर्थचिंतन: एकोणविसाव्या शतकातील महाराष्ट्रातील आर्थिक विचार या नावाने प्रकाशित झालेल्या या ग्रंथात डॉ.पठारे यांनी १९व्या शतकात महाराष्ट्रातील आर्थिक विचारवंतांनी दिलेल्या वैचारिक योगदानाची सखोल मांडणी केली आहे. हा ग्रंथ एकूण पाच प्रकरणांमध्ये विभागलेला आहे. पहिल्या प्रकरणात डॉ. पठारे यांनी जगातील आर्थिक विचारांचा विस्तृत असा आढावा घेतला आहे. डॉ. पठारे यांनी पूर्वसुरींचे अर्थचिंतन या दुसऱ्या प्रकरणात महाराष्ट्रातील विचारवंतांच्या आर्थिक विचाराचे अर्थचिंतन केले आहे. तिसऱ्या प्रकरणात महाराष्ट्राच्या व पर्यायाने देशाच्या आर्थिक स्थितीचे बहुजनवादी विचारवंतांनी केलेल्या अर्थचिंतनाचा आढावा घेतला आहे. तर चौथ्या प्रकरणात आर्थिक सिद्धांत आणि सामाजिक विचारवंतांचे अर्थचिंतन करत पाचव्या प्रकरणात डॉ. पठारे यांनी १९व्या शतकाअखेर देशात आणि महाराष्ट्रातील अर्थचिंतनावर प्रकाश टाकला आहे. एकंदरीतच, प्रस्तुत ग्रंथाच्या माध्यमातून डॉ. पठारे यांनी अतिशय दुर्मिळ; पण तेवढ्याच महत्त्वपूर्ण विषयावर केलेली मांडणी वाचकांसाठी मोलाची ठरणार आहे.

पहिले प्रकरण आर्थिक विचारांचा ऐतिहासिक आढावा घेणारे आहे. यामध्ये व्यापारवादी, निसर्गवादी, अभिमतपंथी, समाजवादी, राष्ट्रवादी यांसारख्या विचारधारांबरोबरच इतिहासवादी संप्रदायाची आर्थिक विचारधारा विस्ताराने मांडली आहे. १९व्या शतकातील आर्थिक धोरणांची पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी या विचारधारांचा अभ्यास महत्त्वपूर्ण राहाणार आहे. तसेच भारतातील ब्रिटिश सत्तेची स्थापना आणि वसाहतवादी ध्येयधोरणांची अंमलबजावणी यांची सखोल चर्चा पहिल्या प्रकरणात करण्यात आली आहे. ब्रिटिश सत्तेच्या विविध अवस्था स्पष्ट करत देशाच्या विदेशी व्यापार आणि महसुलाचे आकडेवारीसह स्पष्टीकरण देत डॉ. पठारे यांनी ब्रिटिशांनी भारताचे केलेले आर्थिक शोषण सखोलपणे मांडले आहे. ब्रिटिशांनी भारतातून निर्यात होणाऱ्या कापडाच्या किमतीत घट तर आयात केल्या जाणाऱ्या कापडाच्या किमतीत वाढ केल्यामुळे भारताला आर्थिक नुकसान सहन करावे लागल्याचे डॉ. पठारे यांनी दाखवून दिले आहे. याबरोबरच, इंग्रजांनी भारतातील विविध सुविधा उदा. रेल्वे, सिंचन आणि शिक्षणावर केलेल्या खर्चाची आकडेवारी दिली आहे. त्यानुसार रेल्वे आणि शिक्षणावरील खर्चात १८७५ ते १९०१ या कालावधीत वाढ झाल्याचे तर सिंचानावरील खर्चात घट झाल्याचे पाहावयास मिळते. भारताचे दरडोई उत्पन्न खर्चाचे प्रमुख घटक आणि देशातील भांडवली गुंतवणुकीवर डॉ. पठारे प्रकाश टाकतात. एकंदरीत डॉ.

पठारे यांनी पहिल्या प्रकरणात दिलेल्या मूलभूत माहितीमुळे १९व्या शतकातील ब्रिटिश सत्तेच्या विविध अवस्था आणि त्यादरम्यान भारतात निर्माण झालेल्या आर्थिक स्थितीचे विविधांगी स्वरूप उलगडण्यास मदत होते.

ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये डॉ. पठारे यांनी भारताच्या आर्थिक शोषणाची विस्तृत मीमांसा केली आहे. देशाच्या आर्थिक शोषणाचे वास्तव समोर आणत या शोषणाची शास्त्रशुद्ध मांडणी करणाऱ्या तत्कालीन समाजसुधारक आणि अर्थशास्त्र अभ्यासकांनी दिलेल्या योगदानाची विस्तृत चर्चा केली आहे. यामध्ये दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर आणि त्यांच्या अभ्यासू आणि देशप्रेमाने भारावलेल्या विद्यार्थ्यांनी दिलेले विचार मोलाचे आहेत. त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये दादोबा पांडुरंग, भास्कर पांडुरंग तर्खडकर, भाऊ महाजन, कृष्णशास्त्री चिपळूणकर, भाऊ दाजी लाड, दादाभाई नौरोजी यांसारख्या विचारवंत मंडळींचा समावेश होतो. बाळशास्त्री जांभेकरांनी आधुनिक विचारसरणीचा स्वीकार करीत आपले सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व आर्थिक विचार मांडले आहेत. त्यांनी देशातील शेतकऱ्यांना शास्त्रशुद्ध शेती आणि आर्थिक उत्पादनाला प्राधान्य देण्याचा सल्ला दिला. याबरोबरच, प्रशासनात भारतीयांच्या नेमणुकांबाबत आग्रही भूमिका मांडली. भारतीय प्रशासन व्यवस्थेला लागलेला कलंक म्हणजे भ्रष्टाचार. यांवर जांभेकरांनी भाष्य केलेले आहे. याव्यतिरिक्त जांभेकर ब्रिटिशांच्या कर आणि जकातविषयक धोरणांचेदेखील विश्लेषण करतात. ब्रिटिशांनी चालवलेल्या आर्थिक शोषणावर परखड भाष्य करणाऱ्या विचारवंतांमध्ये गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांचाही समावेश होतो. लोकहितवादींनी भारताची शोषणमीमांसा करत आर्थिक अभ्युदयाचा मार्ग दाखवला आहे. तर डॉ. भाऊ दाजी लाड यांनी कापसाच्या गिरणीची कल्पना मांडून स्वदेशी कापड वापरण्यास प्राधान्य देण्याची भूमिका घेतलेली दिसून येते. डॉ.पठारे यांनी अशा प्रकारे महाराष्ट्रातील आघाडीच्या समाजसुधारकांनी ब्रिटिश सत्तेद्वारे खुलेआम सुरू असलेल्या आर्थिक शोषणाला वाचा फोडून त्यावर घेतलेल्या परखड भूमिकेचा सखोल आढावा घेतला आहे. दुसरीकडे, देशबांधवांवरील अन्यायाची दाद मागण्यासाठी आणि त्यांच्या अडीअडचणींची सोडवणूक करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या सामाजिक संस्थांचा आढावा डॉ. पठारे यांनी आपल्या ग्रंथात घेतलेला आहे. १९व्या शतकात भारतात सुरू झालेल्या सामाजिक संस्थांमध्ये पुण्यात मोरशास्त्री साठे यांनी पुण्यात १८४० ला स्थापन केलेली कल्याणोन्नायक सभा, १८५२ ला स्थापन झालेली दक्षिणी प्रांतस्थ मंडळी, बॉम्बे असोसिएशन, १८६२ साली स्थापन झालेली वसई असोसिएशन तर १८७० साली स्थापन झालेली सार्वजनिक सभा यांसारख्या संस्थांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा विस्तृत आढावा डॉ. पठारे यांच्या ग्रंथात वाचायला मिळतो.

भारतीय समाजामध्ये उल्लेख केला जाणारा बहुजन हा शब्द राजकारण आणि समाजकारणात मोठ्या प्रमाणात प्रभावी ठरला आहे. समाजरचनेतील उच्च वर्गाला वगळून उर्वरित समाजासाठी हा शब्द सर्रासपणे वापरात असला, तरी बहुजनवादाचे मूळ असलेल्या सत्य, समता आणि सामाजिक न्यायाचा पुरस्कार करणाऱ्या पुरोगामी विचारधारेला मोठी ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. विशेषतः महाराष्ट्रातील ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकारामादी संत परंपरेने या विचारधारेचा प्रचार आणि प्रसार केला. ज्येष्ठ समाजसुधारक आणि भारतातील स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते म. जोतिबा फुले यांनी सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून बहुजन विचारांना फुंकर दिली. ब्रिटिश सत्तेने भारतातील विविधांगी स्वरूपाचे शोषण चालवलेले असताना उच्च वर्गाच्या शोषणाविरुद्ध आवाज

उठविणाऱ्या विचारवंतांची मोठी फळी देशात आणि महाराष्ट्रात कार्यरत होती. मात्र समाजरचनेतील सर्वाधिक दुर्लक्षित आणि शोषित अशा शुद्रातिशुद्र बहुजन समाजावर आणि स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविणाऱ्या विचारवंतांची निर्माण झालेली पोकळी क्रांतिकारी विचारवंत म. फुले यांनी भरून काढत या वर्गाच्या ब्रिटिशांपासून ते धार्मिक आणि सांस्कृतिक चालीरीतीच्या आडून सुरू असलेल्या आर्थिक शोषणास कारणीभूत ठरणाऱ्या व्यवस्थांवर प्रखर हल्ला चढविलेला दिसून येतो. त्यामुळेच म. फुलेंना शुद्रातिशुद्र आणि पीडित स्त्री वर्गाचे उद्धारक म्हणून ओळखले जाते. डॉ. पठारे यांनी आपल्या या ग्रंथात बहुजन वर्गाच्या आर्थिक शोषण आणि प्रशासकीय भ्रष्टाचाराविरुद्ध म. फुले यांनी केलेल्या अभ्यासू मांडणीवर विस्तृत चर्चा केली आहे. याबरोबरच, म. फुले यांनी आपल्या लेखणीतून समाजातील शेतकरी आणि शेतमजूर वर्गाच्या अन्यायाला वाचा फोडत शेतकरी वर्गाचा सर्वांगीण उद्धाराचा कार्यक्रम मांडला. त्यादृष्टीने म. फुले यांनी मांडलेल्या विविधांगी आर्थिक विचारांचा मागोवा या ग्रंथात घेतला आहे. तसेच, अर्थव्यवस्थेतील मूलभूत घटक असलेल्या कामगारांच्या शोषणाला कामगार संघटनेच्या स्वरूपात वाचा फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या नारायण मेघाजी लोखंडे, दीनबंधुकार कृष्णाजी भालेकर, यांच्या कार्याचा आढावा डॉ. पठारे यांनी घेतला आहे. तसेच समाजाचा महत्त्वपूर्ण घटक असलेल्या स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध आवाज उठविणाऱ्या ताराबाई शिंदे यांनी दिलेल्या 'वैचारिक योगदानाचे चिंतन' या ग्रंथात करण्यात आलेले आहे. थोडक्यात, या ग्रंथाच्या माध्यमातून डॉ.पठारे यांनी १९व्या शतकातील ब्रिटिश सत्तेद्वारे महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या अन्याय, अत्याचार आणि शोषणाविरुद्ध तत्कालीन विचारवंतांनी केलेली दुर्मिळ अशी अभ्यासपूर्ण मांडणी वाचकांसाठी उपलब्ध करून दिली आहे.

१९व्या शतकातील भारताच्या आर्थिक शोषणाची मीमांसा करीत असताना ब्रिटिश सत्तेने भारतातील राष्ट्रीय संपत्तीचा वापर इंग्लंडची अर्थव्यवस्था विकसित करण्यासाठी कशा प्रकारे केला याची सैद्धांतिक मांडणी होणे आवश्यक होते. इंग्रजांच्या या धोरणामुळे भारतात दारिद्र्य मोठ्या प्रमाणात वाढले. तसेच देशाची आर्थिक स्थिती मोठ्या प्रमाणात खालावली आणि अशाच स्थितीत १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. आज भारताला स्वतंत्र होऊन ७५ वर्षे पूर्ण झाली. मात्र आजही देशातील दारिद्र्य, बेरोजगारी, विषमता यांसारख्या समस्या संपलेल्या नाहीत. याची कारणं खऱ्या अर्थाने ब्रिटिशांनी भारताचे जे प्रचंड आर्थिक शोषण केले त्यामध्ये सापडू शकतात. भारताच्या याच आर्थिक शोषणाला आणि आर्थिक दुर्दशेला इंग्रज सरकारची धोरणे कशा प्रकारे कारणीभूत आहेत याची सैद्धांतिक मांडणी करणारे १९व्या शतकात जे आर्थिक अभ्यासक होऊन गेले त्यामध्ये दादाभाई नौरोजी आणि न्या. रानडे यांची नावे अग्रभागी राहिली आहेत. डॉ.पठारे यांनी या दोन्ही अर्थतज्ज्ञांच्या विचारांची सखोल चर्चा आपल्या ग्रंथातील चौथ्या प्रकरणात केली आहे.

खरे तर दादाभाई नौरोजी यांना आधुनिक भारताचे पितामह म्हणून संबोधले जाते. याबरोबरच एक राष्ट्रवादी अर्थतज्ज्ञ आणि ब्रिटिश वसाहतवादाचे कठोर टीकाकार म्हणूनही ओळखले जाते. त्यांनी भारतीय अर्थशास्त्रामध्ये दिलेले वैचारिक योगदान आजही महत्त्वपूर्ण ठरते आहे. ब्रिटिशांनी केलेल्या शोषणामुळे भारतामध्ये निर्माण होणाऱ्या आर्थिक समस्यांची तपशीलवार आकडेवारी मिळवून त्याचे शास्त्रशुद्ध विश्लेषण करण्याची प्रथा त्यांनी देशात सुरू केली. ब्रिटिशांनी चालवलेल्या पिळवणुकीमुळे देशात दारिद्र्याचा प्रश्न (Problem of Poverty) कशा प्रकारे गंभीर बनत चालला आहे, याचे शास्त्रशुद्ध विश्लेषण त्यांनी केले आहे. याबरोबरच नौरोजी यांनी ब्रिटिशांनी भारतातील संपत्तीच्या बळावर

इंग्लंडचा आर्थिक विकास साधण्याच्या चालवलेल्या धोरणाचा बारकाईने अभ्यास करत आर्थिक नि:सारणाचा सिद्धांत (Theory of Economic Drain) मांडला. यामध्ये त्यांनी आर्थिक नि:सारणाच्या अंतर्गत आणि बाह्य घटकांची आकडेवारीसह तपशीलवार चर्चा करत त्याचे परिणाम स्पष्ट केले आहेत. ब्रिटिशांच्या या धोरणामुळेच भारतात दारिद्र्यासारखी गंभीर समस्या निर्माण झाल्याचे त्यांनी विश्लेषण केले आहे.याबरोबरच राष्ट्रीय उत्पन्नाचे महत्त्व, चलनविषयक प्रश्न, अफूचा प्रश्न यांसारख्या विषयावर त्यांनी केलेले लिखाण मूलभूत स्वरूपाचे आहे. दादाभाईंनी अर्थशास्त्रात दिलेल्या सैद्धांतिक योगदानामुळे त्यांची आघाडीच्या अर्थतज्ज्ञांमध्ये गणना केली जाते. डॉ. पठारे यांनी दादाभाई यांच्या आर्थिक योगदानाचा आढावा आपल्या ग्रंथात घेतला असून, दादाभाई नौरोजी यांचे अमूल्य विचार वाचकांसाठी उपलब्ध करून दिले आहेत.

१९ व्या शतकात भारतातील आर्थिक विचारवंतांमध्ये आघाडीचे दुसरे नाव म्हणजे न्या. महादेव गोविंद रानडे. न्या. रानडे राष्ट्रवादी विचारांचे समाजसुधारक आणि प्रतिष्ठित न्यायमूर्ती म्हणून ओळखले जात. न्या. रानडे यांनी भारताच्या अर्थव्यवस्थेचा बारकाईने अभ्यास करून भारताच्या मागासलेपणाची कारणमीमांसा केली आहे. तसेच भारताला आर्थिकदृष्ट्या बळकट करण्यासाठी मूलभूत उपाययोजना सुचवलेल्या आहेत. भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची तपशीलवार आकडेवारी देत त्यांनी भारताचा व्यापार वाढला असल्याचे स्पष्ट केले. तसेच त्यांनी शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया असल्याचे स्पष्ट करत शेती विविध प्रकारच्या समस्यांनी ग्रस्त झाली असल्याचे निदर्शनास आणून देत शेतकऱ्यांच्या समस्यांवर महत्त्वपूर्ण उपाययोजना सुचवल्या. याबरोबरच त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका पार पाडणाऱ्या उद्योग क्षेत्रावरही आर्थिक विश्लेषण केल्याचे दिसून येते. आर्थिक विश्लेषणामध्ये मूलभूत असलेल्या बचत, गुंतवणूक आणि रोजगाराच्या मुद्द्यांवर न्या. रानडे यांनी मांडलेल्या मूलभूत विचारांवर डॉ.पठारे यांनी आपल्या ग्रंथात प्रकाश टाकला आहे. तसेच लोकसंख्येचा प्रश्न, भारतीय स्थलांतरितांचा प्रश्न यावर त्यांनी विचारमंथन केले आहे. आर्थिक विकासाची संकल्पना स्पष्ट करताना आर्थिक विकासाचे घटक विस्ताराने विषद केले आहेत. एकंदरीत,१९व्या शतकातील दादाभाई नौरोजी आणि न्या. रानडे या दोन महान अर्थतज्ज्ञांच्या आर्थिक विचारांचे विस्तृत विवेचन डॉ. पठारे यांनी आपल्या ग्रंथात केले आहे.

प्रस्तुत ग्रंथातील पाचवे प्रकरण हे १९व्या शतकाअखेरच्या अर्थचिंतनावर बेतलेले आहे. या प्रकरणात डॉ. पठारे यांनी १९व्या शतकाच्या शेवटच्या टप्प्यात देशातील आर्थिक विचारवंतांनी दिलेल्या आर्थिक विचारांच्या योगदानाची सखोल चर्चा केली आहे. यामध्ये गणेश वासुदेव जोशी, गणेश व्यंकटेश जोशी, न्या. काशिनाथ तेलंग, दिनशा वाच्छा, विष्णू मोरेश्वर महाजनी, नारायण चंदावरकर, गो. ग. आगरकर, लोकमान्य टिळक, गोपाळ कृष्ण गोखले आणि शाहू महाराज यांसारख्या महान समाजसुधारकांनी दिलेल्या वैचारिक योगदानाची चर्चा या प्रकरणात करण्यात आली आहे. उपरोल्लिखित आर्थिक विचारवंतांनी देशातील शेती, उद्योगांच्या समस्या आणि विकासात येणारे अडथळे आणि त्यासाठी ब्रिटिश सरकारची आर्थिक धोरणे कशी जबाबदार आहेत यासंदर्भात प्रखर टीका करणारे लिखाण करून जनजागृती करण्याचे कार्य केले. याबरोबरच, ब्रिटिश सरकारच्या अन्यायकारक अशा खर्च आणि कर धोरणावर टीका केली आहे. देशातील उत्पादनाला बाजारपेठ करण्यासाठी लोकांनी स्वदेशी वस्तूंच्या वापरास प्राधान्य द्यावे अशी भूमिका १९व्या शतकातील आर्थिक विचारवंतांची असल्याचे दिसून येते. डॉ. पठारे यांनी या विचारवंतांनी दिलेल्या योगदानाची आपल्या ग्रंथात

सखोल चर्चा केली आहे. यामध्ये देशातील आरक्षण धोरणाचे जनक राहिलेल्या छत्रपती शाहू महाराजांनी दिलेले योगदान अतिशय प्रभावी ठरले असल्याचे डॉ. पठारे नमूद करतात. त्यांनी आपल्या राज्यात आरोग्य, शिक्षण, रेल्वे, रस्ते, जलसिंचन यांवर होणाऱ्या खर्चात वाढ करून राज्यातील कृषी, उद्योगांच्या विकासाला चालना दिल्याचे दिसून येते. छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राज्यात राबविलेल्या प्रभावी आर्थिक धोरणांचा आढावा डॉ. पठारे यांनी आपल्या ग्रंथात घेतला आहे.

एकंदरीत, अर्थचिंतन : एकोणविसाव्या शतकातील महाराष्ट्रातील आर्थिक विचार या ग्रंथात डॉ.उत्तम पठारे यांनी केलेले अर्थचिंतन निश्चितच अतिशय मोलाचे आहे. १९व्या शतकातील दुर्मिळ अशा आर्थिक विचारांचा आकडेवारीसह तपशीलवार आढावा घेत तो ग्रंथरूपाने वाचकांसाठी उपलब्ध करून देणे हे मोठे जिकिरीचे काम होते, याबाबत शंका नाही. त्यासाठी डॉ.पठारे यांनी कठोर मेहनत घेतल्याचे स्पष्ट होते. त्यांनी दिलेल्या ४५६ पृष्ठांच्या या ग्रंथामुळे अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना १९व्या शतकातील आर्थिक विचारांची ऐतिहासिक शिदोरी एकाच ग्रंथात उपलब्ध झाली आहे. डॉ. पठारे यांच्या या ग्रंथामुळे पूर्वसुरींच्या आर्थिक विचारांविषयीचे अर्थशास्त्र अभ्यासकांचे ज्ञान वृद्धिंगत होण्यास निश्चितच मदत होईल. त्यादृष्टीने डॉ. उत्तम पठारे यांनी केलेल्या ग्रंथरूपी अर्थचिंतनास वाचक आणि अभ्यासक वर्गाचा उदंड प्रतिसाद लाभेल, अशी अपेक्षा आहे.

◆

## निवेदन : अर्थसंवाद वर्गणी

अर्थसंवाद अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / व्यावसायिक संस्था/ग्रंथालये यांच्यासाठी **त्रैवार्षिक वर्गणी रु. २०००/- तर पंचवार्षिक वर्गणी रु. ३०००/-** आहे. ही वर्गणी कृपया 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा संपादकांशी संपर्क साधून NEFT (मराठी अर्थशास्त्र परिषद, बँक ऑफ इंडिया, राजारामपुरी, कोल्हापूर. खाते क्र. : 09472011000368, IFSC : BKID0000947) द्वारे पाठवावी. **मनिऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.** सदर वर्गणी कृपया प्रमुख संपादकाच्या पुढील पत्त्यावर कव्हरिंग लेटरसह पाठवावी.

**डॉ. राहुल शं. म्होपरे**
'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२, प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी, दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे, उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर - ४१६ ००४ भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

**पुस्तक परिचय**

# कोरोनाच्या महामारीचा चित्तथरारक वेध घेणारे पुस्तकः कोरोनायन

**संजय दादासाहेब ठिगळे** †

ग्रंथाचे नाव : कोरोनायण
लेखक : प्रा.डॉ.अनिलकुमार वावरे व प्रा.किशोर सुतार
प्रकाशक : एज्युकेशन पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद.
पृष्ठसंख्या : ५८९ मूल्य : ४९५/-
ISBN: 978-93-90005-30-7

**प्रास्ताविकः**

गेल्या अनेक वर्षांपासून माणसाला निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित समस्यांना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः मानवनिर्मित समस्यांनी माणसाला अक्षरशः बेजार करून सोडले आहे. त्यामुळे फार मोठे अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे आपणास नाकारता येणार नाही. आपणच काढलेल्या खड्ड्यात आपणच पडलो आहोत की काय अशी अवस्था निर्माण झाली आहे. जगभरात अनेक संकटे आली. अनेक प्रकारच्या साथी आल्या माणसाने आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या जोरावर त्यावर मात केली. हे जरी खरे असले, तरी २०व्या शतकातील आणि २१व्या शतकाच्या पूर्वार्धातील सर्वात मोठे संकट म्हणजे कोरोना.

जवळपास गेली दोन वर्षे संपूर्ण जगाला कोरोनाच्या महामारीमुळे हैराण करून सोडले आहे. संपूर्ण जगाला हादरवून सोडणाऱ्या कोरोनामुळे संपूर्ण जग सर्व अर्थाने बदलले आहे. फक्त जगच बदलले नाही, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात एक वेगळे वातावरण निर्माण झाले आहे. एवढेच नव्हे, तर एकमेकांच्या मनात संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा विचित्र परिस्थितीत संपूर्ण जग लॉकडाऊन झाले होते. मात्र सामाजिक भान असणाऱ्या लोकांची विचारप्रक्रिया लॉक झाली नव्हती. अशीच दोन माणसे म्हणजे प्रा.डॉ.अनिलकुमार वावरे आणि प्रा.किशोर गजानन सुतार या लेखकद्वयांनी एका जग बदलविणाऱ्या महामारीचा चित्तथरारक वेध घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न 'कोरोनायण' या पुस्तकाच्या माध्यमातून केलेला दिसून येतो.

पुस्तकाचे मुखपृष्ठ बरेच काही सांगून जाते. कोरोनाचा विषाणू ज्या पद्धतीने मुखपृष्ठावर दाखविला आहे त्यातून त्याचे काटेरी परिणाम दिसून येतात. पुस्तकाला प्रस्तावना ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ मा. डॉ.जे.एफ.पाटील यांची लाभलेली असल्यामुळे

† अर्थशास्त्र विभाग प्रमुख, भारती विद्यापीठाचे मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव, सांगली.
आजीव सभासद क्रमांक : ११६०, मोबाईल क्रमांक :९४२२०४१९२९, इमेल : thigalesanjaygmail.com

पुस्तकाला एक वेगळे मूल्य निर्माण झाले आहे. कोरोनायण पुस्तकाने संख्यात्मक आणि गुणात्मकदृष्ट्या एक वेगळेपण निर्माण केले आहे.

**कोरोनायण शब्दबद्ध करणाऱ्यांच्याविषयी**

महामारीच्या काळात कोरोनाच्या महामारीचे विश्लेषण करणारे अनेक लेख वृत्तपत्रातून, मासिकामधून प्रकाशित झाले. अनेक लेखकांनी आपले सामाजिक भान जागे ठेवून पुस्तके लिहिली. कोरोनायण पुस्तकाचे लेखक डॉ.अनिलकुमार वावरे हे नव्या पिढीतील संशोधन क्षेत्रातील एक उगवते नेतृत्व आहे असे म्हटले तर फारसे वावगे होणार नाही. सातारा येथील रयत शिक्षण संस्थेच्या शिवाजी कॉलेजमध्ये अर्थशास्त्र विषयाचे विभाग प्रमुख असून नुकतेच त्यांना शिवाजी विद्यापीठाच्यावतीने संशोधन क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. सध्या ते शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष आहेत. पुस्तकाचे दुसरे लेखक प्रा.किशोर गजानन सुतार हे त्यांच्या विभागाचे सहकारी प्राध्यापक असून, दोघांच्या अपार कष्टाचा परिपाक म्हणजे कोरोनायण पुस्तक आहे. कोरोनाच्या काळात शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे बंद होती.

याच कालावधीत लेखकांनी शिक्षण क्षेत्रावरील झालेला परिणाम त्यांनी जवळून पाहिला. त्यामुळेच की काय म्हणून त्यांना कोरोनायण पुस्तक लिहिण्याची प्रेरणा मिळाली असावी. एवढेच नव्हे, तर कोरोनाचे अर्थव्यवस्थेवरील परिणाम त्यांच्या लक्षात आले असल्यामुळे त्यांच्यातील अर्थशास्त्राचा शिक्षक त्यांना गप्प बसू दिला नसेल. त्यामुळेच लेखनप्रपंच शक्य झाला. कोरोनाच्या महामारीच्या परिस्थितीत लोकांचे मानसिक स्वास्थ्य बऱ्यापैकी हरवीत चाललेले असताना दृढनिश्चय करून, वेळे सत्कारणी लावून तन, मन आणि धन एकवटून ५८९ पानी पुस्तक लिहिण्याचे केलेले धाडस वाखाणण्याजोगे आहे. एवढेच नव्हे, तर ते छापण्याचे धाडस प्रकाशकांनी केले ही गोष्ट नक्कीच प्रशंसनीय आहे.

**ग्रंथाने घेतला एका जग बदलविणाऱ्या महामारीचा चित्तथरारक वेध :**

कोरोना महामारीच्या उगमापासून ते सध्याची स्थिती वास्तववादी अशा तथ्यावर मांडण्याचा प्रयत्न पुस्तकात केला असून, पुस्तकाची विभागणी जाणीवपूर्वक १२ भागांत केली असून, त्यांनी कोरोना काळाचा पट अलगदपणे उलगडलेला दिसून येतो. हे करीत असताना साधा फ्ल्यूचा ताप माणसाला कोरोनाकडे कसा घेऊन गेला हे त्यांनी खूप चांगल्या पद्धतीने समजावून सांगितले आहे. साधा ताप आणि सर्दीसुद्धा माणसाला कोरोनाच्या संकटात कसा ढकलून गेला हे त्यांनी सांगितले आहे. लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक असूनसुद्धा त्यांनी कोरोनाची वैद्यकीय बाजू खूप चांगल्या पद्धतीने मांडली आहे. कोरोनाच्या काळात जागतिक अर्थव्यवस्थेत झालेली सर्व प्रकारची स्थित्यंतरे खूप बारकाईने अभ्यासलेली दिसून येतात. या ग्रंथातील विविध प्रकरणामध्ये कोरोनाविषयी अतिशय साध्या, सोप्या आणि सुलभ भाषेत लिखाण केलेले आहे. कोरोना काळातील बदलांचा वेध घेत असताना त्यांनी सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक बदलांच्या अभ्यास केला आहे. तेवढ्यावरच न थांबता त्यांनी जगाचे पर्यावरण कसे बदलले, कोरोनाचा कोणकोणत्या क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम झाले याचा सविस्तर अभ्यास केला असून, पर्यावरणावर झालेल्या परिणामांची नोंद घ्यायला लेखक विसरले नाहीत. काही वर्षांपूर्वी 'देऊळबंद' नावाचा चित्रपट निघाला. देऊळ बंद असणे ही कल्पना लोकांना न पटण्यासारखी होती. देऊळ बंद कधी असते का? मात्र कोरोनाच्या काळात देऊळ बंद करण्याचा पराक्रम कोरोनाने केला. याचा चिकित्सक अभ्यास करून त्यांनी सर्व वर्णन खूप कौशल्याने शब्दबद्ध केले आहेत.

कोरोनाच्या काळात मानवी संसाधनावर झालेला बदल, मानवी संसाधनाची स्थिती आणि बदललेली गती यांचा सखोल अभ्यास वाखाणण्यासारखा आहे. कोरोनाचा सर्वात जास्त परिणाम मजुरांच्यावर झाला. मजुरांना इच्छा नसताना करावे लागलेले स्थलांतर, त्यामुळे त्यांची झालेली घुसमट, त्याचा मुंबईसारख्या अनेक शहरावर झालेला परिणाम याचा अभ्यास अभ्यासकांनी करून त्याची निरीक्षणे विस्ताराने मांडलेली आहेत. कोणत्याही समस्येचा फक्त अभ्यास करून चालत नाही, तर त्यावर प्रतिबंध व उपचार शोधावे लागतात. अभ्यासकांनी कोरोना उपचार, आरोग्य क्षेत्रात नव्याने आलेले आरोग्य आप आणि टाळेबंदी याविषयी केलेला अभ्यास महत्त्वपूर्ण वाटतो. अर्थशास्त्राचे अभ्यासक म्हणून त्यांनी कोरोना काळातील जागतिक अर्थव्यवस्था, टाळेबंदीमुळे शेती आणि कापड उद्योगामध्ये निर्माण झालेली आव्हाने, आर्थिक पॅकेज, मौद्रिक धोरण, जागतिक आणि भारतीय अर्थव्यवस्थेपुढील नवीन संधी याचाही साकल्याने अभ्यास केला आहे. विशेषतः कोरोना काळात क्रीडा व मनोरंजन क्षेत्रात झालेले बदल, लोकांनी कोरोनाच्या महामारीच्या काळात अवलंबलेले मनोरंजनाचे मार्ग सविस्तरपणे मांडलेले दिसून येतात. एवढेच नव्हे, तर क्रीडा व मनोरंजन क्षेत्रात झालेले आर्थिक बदल त्यांनी अभ्यासलेले आहेत. जगभर प्रसिद्ध असलेल्या क्रिकेटचा कसा खेळखंडोबा झाला, याचा सविस्तर अभ्यास केलेला दिसून येतो. कोरोनाचा काळ नियंत्रित करणाऱ्या व्यवस्था आणि त्याचा फायदा व गैरफायदा घेणाऱ्या यंत्रणेचा सविस्तर अभ्यास केलेला दिसून येतो. कोरोनाच्या महामारीच्या काळात निर्माण झालेले गंभीर प्रश्न आणि त्याकाळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाची लागलेली कसोटी, त्याबरोबरच मन की बातच्या माध्यमातून त्यांनी जनतेला संबोधून केलेली भाषणे यांचा अभ्यास केलेला दिसून येतो. कोरोनाच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला वेळोवेळी सहकार्य करण्यासाठी दिलेली हाक याचा उल्लेख पुस्तकात दिसून येतो. जनतेने केलेले सहकार्य यांचाही खास उल्लेख ग्रंथात कथन केलेला आहे. कोरोनाच्या महामारीच्या काळात जनतेने केलेला त्याग त्याचे झालेले मानसिक परिणाम लेखणीतून शब्दबद्ध झालेत.

पुस्तक लिहीत असताना लेखकांनी शेवटी संज्ञा देणे, काही संकल्पनांचा अर्थ सांगणे गरजेचे असते. बऱ्याचवेळा लेखकाकडून हे होत नाही. मात्र कोरोनायण पुस्तकामध्ये समारोप करीत असताना लेखकांनी आधार सामग्री जवळपास २८ पानांमध्ये दिली असून, त्यामध्ये महत्त्वाची संक्षिप्त शब्दांची दीर्घरूपे दिली आहेत. त्याबरोबरच महत्त्वाच्या संज्ञा व संकल्पना दिल्या आहेत. त्यामुळे पुस्तकाचे वेगळेपण सिद्ध होते. एवढेच नव्हे, तर वाचकांना पुस्तक वाचत असताना अनेक समस्यांची उकल होणे सोपे होईल.

**समारोप :**

अलीकडच्या काळात अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि संरक्षण या मूलभूत गरजा जेवढ्या महत्त्वाच्या वाटतात. त्याहीपेक्षा आरोग्य फार महत्त्वाचे वाटू लागले आहे, हे आपणास कोरोनाच्या महामारीच्या काळात दिसून आले. मानवी कल्याणाचा अनेक योजनांचा आपण विचार करीत आहोत त्यासाठी युद्धपातळीवर आपण कार्यरत आहोत, तर दुसऱ्या बाजूला कोरोनाने लोकांना हैराण करून सोडले आहे. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेने नव्या जोमाने प्रवेश केला आहे. परिणामी, प्रत्येकाला आर्थिक व आरोग्यविषयक सतर्क राहाणे गरजेचे होऊन बसले आहे. कोरोनामुळे निर्माण झालेले अनिश्चिततेचे वातावरण विचारात घेता कोरोनायण पुस्तक अभ्यासकांना, संशोधकांना विशेषतः सर्वसामान्य वाचकाला आणि देशातील तरुणाईला नक्कीच मार्गदर्शक ठरेल, असे वाटते.

◆

# महाराष्ट्र शासन
## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)

**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५**

दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१ ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in

संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in


**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना-विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित-संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व – डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) – स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास-रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश – संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला- के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) – स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज – श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई-बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोंदिया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी ॲन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३९१०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

# अर्थसंवादसाठी

# हार्दिक शुभेच्छा

डॉ. अनिल कृ. वावरे
सातारा

डॉ. जयश्री दि. भंगाळे
भुसावळ

डॉ. कृतिका खंदारे
औरंगाबाद

डॉ. शशिकांत शिंदे
बार्शी

डॉ. वर्षा क. नेहे
भालोड

प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी
इस्लामपूर

प्राचार्य डॉ. कैलास व प्रा. सौ. रत्ना निंबाळकर
कल्याण

डॉ. कुमुदिनी भा. जोगी
अचलपुर

डॉ सुरेश घुमटकर
बीड

प्रा. एम. जी. पाटील
मिरज

डॉ. विठ्ठल ठावरी
भिसी

शी. ना. माने
सातारा

डॉ. भास्कर ह. जंगले
दौंड

प्राचार्य ढगे एस. के.
पुणे

रविंद्र दा. इच्छे
असेगाव पूर्णा

डॉ. संतोष कदम
मंद्रुप

डॉ. क्रांती बोरावके
पुणे

विशाल वा. मळेकर
कोरपन

डॉ. वनिता चौरे
चांदूरबाजार

डॉ. उषा पाटील
उमरखेड

डॉ. आशिष कृ. महातळे
चंद्रपूर

प्राचार्या डॉ. मंगला जंगले
भुसावळ

डॉ. अमृता अ. सूर्यवंशी
पुणे

प्रा. डॉ. शिवाजी सांगळे
औरंगाबाद

डॉ. छाया करकरे
नांदेड

डॉ. एस. यु. मंडले
लातूर

प्राचार्या सुषमा देशमुख
अमरावती

डॉ. एम. एन. शिंदे
इस्लामपूर

डॉ. महेंद्र व्ही. मेटे
अमरावती

डॉ. आर. जी. रसाळ
प्रवरानगर

कुलगुरु डॉ. विनायक देशपांडे
अमरावती

मूल्य : रु. १०/- (सभासदांकरिता विनामूल्य)

भारती मुद्रणालय, कोल्हापूर